Reg. No. MCS/069/2018-20 R. N. I. Reg. No. 1591/57
वर्ष ७९, अंक १९९, ६ रुपये, शहर आवृत्ती, पृष्ठे १२+ चतुरंग

मुंबई, शनिवार, ५ सप्टेंबर २०२६ WWW.LOKSATTA.COM

# लोकसत्ता

मुंबई, पुणे, नागपूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकमान्य, लोकशक्ती!

**शनिवारचे संपादकीय**

**वर्दीत विरणारी विकासवाट...**

कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या नावावर नागरिकांच्या अधिकाराचे हनन होणे हा राष्ट्रीय प्रगतीतला मोठा अडथळा ठरतो, हे राज्यकर्त्यांना मान्यच नसल्याचे दिसते...







# पेपरफुटीचे धागेदोरे मंत्री कार्यालयापर्यंत?

## झिरवाळांचे विशेष कार्य अधिकारी आरोपीचे भाडेकरू

**अशोक अडसूळ, लोकसत्ता**

**मुंबई :** राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागातील 'औषध निरीक्षक' परीक्षेतील पेपरफुटीप्रकरणी या विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ यांचे कार्यालय पुन्हा चर्चेत आले आहे. पेपरफुटी प्रकरणातील आरोपीच्या नंदूरबार येथील घरी झिरवाळ यांचे विशेष कार्य अधिकारी गणेश देवरे हे भाडेकरू असून पेपरफुटी प्रकरण समोर आल्यापासून ते मंत्री कार्यालयात फिरकलेले नाहीत.

राज्य लोकसेवा आयोगाने औषध निरीक्षक गट- ब पदाची २२ मार्च रोजी चाळणी परीक्षा घेतली. मुलाखती होऊन २२ जुलै रोजी पात्र ४८८ उमेदवारांची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध झाली. त्या परीक्षेतील प्रश्न काही उमेदवारांना मिळाल्याचे आयोगाला काहींनी त्याच दिवशी ई-मेलद्वारे कळवले. २७ जुलै रोजी आयोगाकडून गुन्हा नोंद करण्यात आला. मुंबई गुन्हे अन्वेषण शाखेकडून या प्रकरणाचा तपास चालू आहे. याप्रकरणी सात व्यक्तींना अटक झालेली आहे. यामध्ये राज्य लोकसेवा आयोगाचे तीन कर्मचारी असून पाच आरोपी नंदूरबारचे आहेत. आयोगाने ही भरती प्रक्रिया रद्द केली आहे.

या प्रकरणात नंदूरबारच्या कौटिल्य अकादमीचे प्रवीण पाटील तसेच परीक्षार्थी ऋतुजा पाटील, गौरव पाटील *(पान ५वर)*



### महिनाभर गायब

देवरे यांचा मंत्री कार्यालयातील नेमणुकीचा रीतसर आदेश नव्हता. मात्र ते मंत्री कार्यालयात कार्यरत होते. एक महिना झाले ते मंत्री कार्यालयात आलेले नाहीत. ते उसनवारी तत्त्वावर इथे कार्यरत असल्याने २५ ऑगस्ट रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे त्यांना कार्यमुक्त केलेले आहे, असे मंत्री नरहरी झिरवाळ यांचे खासगी सचिव सतीश जाधव यांनी 'लोकसत्ता'ला सांगितले.

**दुसरा कर्मचारी अडचणीत :** या विशेष कार्य अधिकाऱ्याचा मूळ विभाग कृषी विभाग आहे. झिरवाळ विधानसभा उपाध्यक्ष होते, तेव्हापासून ते त्यांच्याकडे काम करतात. मंत्री कार्यालयातील विशेष कार्य अधिकारी आरोपीच्या घरी भाडेकरू आहे, याची माहिती आमच्याकडे आहे. मात्र अद्याप संबंधितांची पोलीस चौकशी केलेली नाही, असे या प्रकरणाचा तपास करणाऱ्या मुंबई गुन्हे शाखेतील सूत्रांनी सांगितले. चार महिन्यांपूर्वी मंत्री झिरवाळ यांच्या कार्यालयातील लिपिकास लाच घेताना अटक झाली होती. त्यानंतर हा प्रकार समोर आल्याने झिरवाळ यांचे कार्यालय चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे.

महत्त्वाचे निर्णय आता अधिकारी स्तरावर

# शिक्षणमंत्र्यांच्या अधिकारांना कात्री

**रेश्मा शिवडेकर, लोकसत्ता**



**मुंबई :** राज्य सरकारच्या प्रशासकीय कारभारात सुधारणा आणि गतिमानता आणण्याकरिता शिवसेनेकडे (शिंदे गट) असलेल्या शालेय शिक्षण खात्याशी संबंधित मंत्र्यांच्या महत्त्वाच्या अधिकारांना कात्री लावण्यात आली आहे. स्वयंअर्थसहाय्यित शाळांमध्ये अतिरिक्त तुकड्यांना, शाखांना मान्यता देण्याचे, सीबीएसई, आयसीएसईसारख्या विविध मंडळांच्या अभ्यासक्रमांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचे तसेच नव्या तुकड्या व शाखांना मान्यता देण्यासारखे महत्त्वाचे अधिकार शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडून काढून घेऊन विभागाचे सचिव आणि शिक्षण आयुक्तांकडे सोपविण्यात आले आहेत.

राज्यात जवळपास ३१ हजार स्वयंअर्थसहाय्यित म्हणजे खासगी शाळा आहेत. पूर्वी शाळांना एकदा मान्यता मिळाली की पहिली ते सातवीपर्यंतच्या वर्गांना नैसर्गिक तत्त्वाने मान्यता मिळत होती. मात्र महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आल्यानंतर जुनी पद्धत निकालात काढण्यात आली. नवीन तुकडी वा शाखेला मान्यता देण्याकरिता शाळांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत का, हे तपासणे आवश्यक असल्याचे कारण देत ही पद्धत बदलली गेली होती, तसेच मोफत व सक्तीच्या शिक्षण अधिकारानुसार शाळांमधील भौतिक व शैक्षणिक निकषांचे कठोर मूल्यांकन आवश्यक आहे, हे कारणही दिले गेले होते. त्यामुळे प्रत्येक खासगी शाळेला प्रत्येक नवीन वर्ग किंवा तुकडी वाढविण्याकरिता इरादा किंवा मान्यतापत्र हवे असल्यास राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या कार्यालयात पर्यायाने मंत्र्याकडे खेपा माराव्या लागत होत्या.

आता महत्त्वाचे अधिकार प्रधान सचिव आणि आयुक्तांकडे सोपविण्यात आले आहेत. स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नव्या तुकडी किंवा शाखेला मान्यता देण्याचे अधिकार शिक्षण आयुक्तांना *(पान ५वर)*

### संस्थाचालकांकडून स्वागत

- शाळाचालकांकडून मात्र या निर्णयाचे स्वागत होत आहे. 'महाराष्ट्र इंग्लिश स्कुल ट्रस्टीज असोसिएशन'चे संस्थापक अध्यक्ष संजय तायडे-पाटील यांनी, प्रत्येक मान्यता आणि इरादापत्राकरिता शाळांची अडवणूक केली जात असल्याचा आरोप केला.
- वरच्या वर्गांना पूर्वी नैसर्गिक तत्त्वाने मान्यता मिळत होती. आता इरादा पत्राकरिता प्रत्येक वेळेस शासनाकडे अर्ज करावा लागतो. शालेय शिक्षण विभागाच्या प्रत्येक स्तरावर शाळांची कोंडी केली जाते.
- या विभागात इतका भ्रष्टाचार बोकाळला आहे की मंत्र्यांचे अधिकार काढून घेण्याच्या निर्णयाचे स्वागतच व्हायला हवे, अशी प्रतिक्रिया तायडे-पाटील यांनी 'लोकसत्ता'ला दिली.

| Vencobb | |
|---|---|
| ब्रॉयलर विकनया दर (पोल्ट्रीफार्मवर) | ७६ रु. प्रति किलो |
| किरकोळ विक्रीया दर जिवंत कोंबडी | १०४ रु. प्रति किलो |
| ड्रेस कोंबडी (चिकनचा) दर | १२७ रु. प्रति किलो |
| अंडी किरकोळ विक्री दर | ७४ रु. प्रति १२ अंडी |

**तापमान**

कमाल ३१° से | किमान २६° से

**हवामानाचा अंदाज**
आकाश ढगाळ, तुरळक पावसाची शक्यता.

### काय चाललंय काय!

प्रशांत कुलकर्णी




मला वाटतं हा असा 'वैधानिक इशारा' दिल्यानंतर कुणाचीच तक्रार राहणार नाही!!

### उद्या रविवार विशेषमध्ये

- दणदणाटाविरुद्ध खणखणाट - लोकसत्ता टीम
- हेअरकट की चकोट? - विवेक वेलणकर
- विद्यार्थी आंदोलने- कॅम्पसपासून शाळेच्या मैदानापर्यंत! - रेश्मा शिवडेकर

### सोनिया गांधींच्या आत्मचरित्राचे नवे प्रकाशक

**नवी दिल्ली :** काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांचे बहुप्रतीक्षित आत्मचरित्र 'बिलाँगिंग : अ जर्नी ऑफ लव्ह' हे भारतात १० नोव्हेंबरला प्रकाशित होणार आहे. 'हार्परकॉलिन्स इंडिया'ने शुक्रवारी या पुस्तकाच्या प्रकाशनाची घोषणा केली. - पान ४

### नाशिक म्हाडा घोटाळा; १३ जणांचे निलंबन

**नाशिक :** सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेंतर्गत नाशिकमध्ये झालेल्या बहुचर्चित म्हाडा घोटाळ्याच्या चौकशीत धक्कादायक बाबी उघड होत आहेत. सकृतदर्शनी सहभाग निष्पन्न झाल्याने महसूल विभागातील चार आणि भूमी अभिलेख विभागातील नऊ, अशा एकूण १३ अधिकारी-कर्मचाऱ्यांना निलंबित केले. - पान ५

# डीजेविरोधातील आवाजाला बळ

**पुण्यामध्ये विद्यानंद बापट यांनी सण-उत्सवांमधील ध्वनिप्रदूषणाचा मुद्दा ठामपणे मांडल्यानंतर राज्यातील अनेक शहरांमध्ये यासंदर्भात भूमिका घेतली जात आहे. नागपूरपाठोपाठ आता मुंबई, नवी मुंबई, सांगली या शहरांमध्ये डीजेबंदीचा निर्णय घेण्यात आला असून अनेक जिल्ह्यांमध्ये याबाबत मागणी करण्यात येत आहे.**

**मुंबई**

गणेशोत्सव मंडळांनीच आवाजाची पातळी मर्यादित ठेवण्याचे मान्य केले आहे. अन्यथा पोलिसांकडून कारवाई केली जाईल, याची त्यांना कल्पना आहे. मुंबईत डीजेच्या वापरावर २०१५ पासून बंदी आहे, असे पोलीस आयुक्त देवेन भारती यांनी सांगितले.

**सांगली**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मिरवणुकीमध्ये 'डीजे', 'लेझर लाइट'वर बंदी घालण्यात आल्याचे आदेश जिल्हा पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांनी लागू केले.

**सातारा**

गणेशोत्सवासह वर्षभर विविध सण-उत्सव आणि जयंती सोहळ्यात 'डीजे', 'लेझर लाइट'वर बंदी घालण्याची मागणी साताऱ्यातील ज्येष्ठ नागरिकांनी केली. याबाबत जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन दिले.



आपले सण आणि उत्सव साजरे करताना ते जास्तीत जास्त परंपरा पाळून साजरे व्हावेत. डीजेसारख्या काही पद्धती वर्षानुवर्षे सुरू आहेत. डीजेमुळे लोकांना खूप त्रास होतो. त्यांचे स्तोम लोकसहभागाने कमी करावे लागणार आहे. तोपर्यंत पारंपरिक पद्धतीने आणि कमीत कमी ध्वनिप्रदूषण करून गणेशोत्सव साजरा करावा.
**- देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

**नागपूर**

भाजपचे माजी आमदार संदीप जोशी यांनी डीजेबंदी दोन महिन्यांसाठी नव्हे तर कायमस्वरूपी करावी, अशा मागणीचे निवेदन पोलीस व महापालिका आयुक्तांना दिले. त्यानंतर भाजपचे शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनीही पोलीस आयुक्तांना निवेदन देत बंदीच्या निर्णयावर पुनर्विचार करण्याची मागणी केली. त्यामुळे शहरात भाजपविरुद्ध भाजप असे चित्र निर्माण झाले आहे.

**नवी मुंबई**

गणेशोत्सवातील ध्वनिप्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रात डीजे, लेझर लाईटचा वापर न करण्याचे आवाहन मंडळांना करण्यात आले. तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या मंडळांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

■ मारहाणीमुळे निश्चय ढळणार नाही- बापट
■ ध्वनिमर्यादा उल्लंघनाबद्दल मंडळ पदाधिकाऱ्यांना शिक्षा/५



भारतीय अवकाश संशोधन संस्थेने (इस्रो) शुक्रवारी देशातील पहिल्या 'इमेजिंग' उपग्रहाचे अंतराळात यशस्वी प्रक्षेपण केले. 'इस्रो'ने सतीश धवन अवकाश केंद्रातून पहाटे २.५५ वाजता 'जीएसएलव्ही' रॉकेटच्या सहाय्याने २३०० किलो वजनाचा उपग्रह अवकाशात यशस्वीपणे सोडून त्याला भू-समकालिक (जिओसिंक्रोनस) कक्षेत स्थिर केले. - संबंधित / पान ४

तिघांचा मृत्यू, मुलगी जखमी, कौटुंबिक वादातून आत्महत्या

# नळदुर्ग किल्ल्यावरून महिलेची तीन मुलांसह उडी

**लोकसत्ता वार्ताहर**

**धाराशिव :** नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्ल्यातील उपळी बुरुजावरून एका महिलेने आपल्या तीन लहान मुलांसह उडी मारली. त्यात महिला आणि एका मुलाचा जागीच मृत्यू झाला, तर एका मुलीचा गुरुवारी रात्री उपचारादरम्यान मृत्यू झाला. आणखी एक मुलगी धाराशिव येथे उपचार घेत आहे.

उमरगा तालुक्यातील वंताळा येथील रहिवासी असलेल्या अश्विनी मनोहर पोळ (३०, रा. वंताळा, सासर-अंबुलगा, ता. निलंगा, जि. लातूर) या गुरुवारी दुपारी तीन मुलांसह नळदुर्ग किल्ल्यावर आल्या होत्या. त्यांच्याबरोबर मुलगा अजिंक्य (५) आणि अडीच वर्षांच्या जुळ्या मुली क्रांती आणि वीरा होत्या. अश्विनी यांनी तिन्ही लेकरांना किल्ल्यावरून कडेलोट करून स्वतःही उडी मारली. या दुर्घटनेत अश्विनी आणि अजिंक्य यांचा मृत्यू झाला, तर जुळ्या मुली गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने नळदुर्ग उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर प्रकृती चिंताजनक असल्याने धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलवण्यात आले. गुरुवारी रात्री उपचारादरम्यान क्रांतीचा मृत्यू झाला. तर वीरावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

कौटुंबिक कलह आणि मानसिक तणाव यातून आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती असल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी अश्विनी यांचे वडील तानाजी मोहिते यांच्या फिर्यादनुसार अश्विनी यांचा पती मनोहर आणि सासरच्या लोकांवर गुन्हा दाखल झाला आहे.

# प्रदूषणकारी गृहप्रकल्पांना यापुढे १०० टक्के दंड!

**निशांत सरवणकर, लोकसत्ता**

**मुंबई :** हवेतील प्रदूषणाबाबत न्यायालयाच्या निर्णयानंतर नियोजन प्राधिकरणांकडून कठोर उपाय आखण्याबरोबरच त्यांची अंमलबजावणीही केली जात आहे. मुंबई महापालिकेनेही याबाबत नव्याने परिपत्रक जारी केले असून बांधकामासाठी आवश्यक असलेल्या सुरुवातीच्या परवानग्या (आयओडी) आणि ज्यांची बांधकामे सुरू आहेत अशा प्रकल्पांच्या सुधारित आराखड्यात विशेष अटीचा समावेश करण्याचा निर्णय घेतला. या अटीची पूर्तता न केल्यास गृहप्रकल्पांवर १०० टक्के अधिमूल्य स्वरुपात दंड आकारण्यात येणार आहे.

**वाढत्या हवा प्रदूषणाची दखल घेऊन न्यायालयाने संबंधित प्राधिकरणांना उपाययोजनांचे आदेश दिले होते. त्यानुसार मुंबईत पालिकेने गृहप्रकल्पांसाठी विशेष अट ठेवली आहे.**

गृहप्रकल्पांचे काम सुरू असताना मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते. याबाबत कुठल्याही उपाययोजना केल्या जात नसल्याच्या तक्रारी उच्च न्यायालयात याचिकांद्वारे करण्यात आल्या होत्या. काही प्रकरणांत उच्च न्यायालयाने स्वतःहून कारवाई सुरू केली होती. प्रदूषणाबाबत उपाययोजना करण्यासाठी न्यायालयाने उच्चस्तरीय समिती नेमण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थापन झालेल्या समितीने गृहप्रकल्पाशी संबंधितांच्या अनेक बैठका घेतल्या. या बैठकांनंतर समितीने मार्गदर्शक सूचना करत त्यांची कठोर अंमलबजावणी करण्याची जबाबदारी नियोजन प्राधिकरणांवर *(पान ५वर)*




- इमारतीच्या सुरुवातीच्या परवानग्या तसेच ज्यांची बांधकामे सुरू आहेत त्यांच्या सुधारित आराखड्यात प्रदूषण रोखण्याबाबत हमीपत्र घेण्याची विशेष अट टाकण्याचे ठरविण्यात आले आहे. त्यानुसार महापालिकेने परिपत्रक जारी केले आहे. या धर्तीवर म्हाडा व 'झोपु' प्राधिकरणाकडूनही कारवाई केली जाणार आहे.
- महापालिकेच्या विकास प्रस्ताव विभागाने २ सप्टेंबर रोजी याबाबतच्या अंतर्गत सूचना इमारत प्रस्ताव विभागाला जारी केल्या आहेत. यानुसार प्रदूषण केल्याप्रकरणी काम थांबविण्याची नोटिस जारी केली जाईल.
- नोटीस दिल्यानंतरही सूचनांची पूर्तता न केल्यास व्यवसाय परवाना तसेच संबंधित गृहप्रकल्पाची विकास परवानगी रद्द करणे आणि जे अनधिकृत काम केले, त्याबद्दल दंड स्वरूपात १०० टक्के अधिमूल्य अदा करण्यास तयार आहे, असे हमीपत्र द्यावे लागणार आहे. ही अट 'आयओडी' तसेच सुधारित आराखड्यातही टाकण्यात येणार आहे.

# 'डेक्कन'मध्ये माळढोकसाठी १६ संवर्धन क्षेत्रे निश्चित

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** देशातील अतिदुर्मिळ आणि गंभीरपणे संकटग्रस्त माळढोक पक्ष्याच्या संवर्धनासाठी डेक्कन भूप्रदेशातील १६ क्षेत्रे प्राधान्य संवर्धन क्षेत्रे म्हणून निश्चित करण्यात आली आहेत. सुमारे १८ हजार चौरस किलोमीटर क्षेत्रफळाच्या या क्षेत्रांचा विस्तार महाराष्ट्रासह कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातील ३५ जिल्ह्यांमध्ये आहे. यासंदर्भातील अभ्यास 'प्लॉज वन' या नियतकालिकात प्रकाशित झाला. या १६ क्षेत्रांत २२ जिल्हे महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगणातील प्रत्येकी सहा आणि आंध्र प्रदेशातील एका जिल्ह्याचा समावेश आहे.

डेहरादून येथील भारतीय वन्यजीव संस्थेच्या संशोधकांनी हा अभ्यास *(पान ५वर)*



### माळढोकची संख्या १०० ते १५०

- जगातील सर्वांत वजनदार उडणाऱ्या पक्ष्यांपैकी एक असलेल्या माळढोकचे वजन १५ किलोपर्यंत असू शकते. हा पक्षी 'इंटरनॅशनल युनियन फॉर कन्झर्वेशन ऑफ नेचर'च्या लाल यादीत गंभीरपणे संकटग्रस्त म्हणून नोंदवला आहे.
- एकेकाळी भारत आणि दक्षिण पाकिस्तानच्या विस्तीर्ण भागात आढळणाऱ्या या पक्ष्याची जंगलातील संख्या आता केवळ १०० ते १५० इतकीच उरल्याचे संशोधकांनी नमूद केले आहे.

# अभियांत्रिकीच्या चौथ्या फेरीत ८८ हजार विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाने २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी अभियांत्रिकी (बीई-बी.टेक) अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची चौथी यादी गुरुवारी जाहीर केली. या यादीत तब्बल ८८ हजार ४८ विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळाली असून, त्यापैकी ८ हजार १२८ विद्यार्थ्यांना प्रथमच महाविद्यालय मिळाले आहे.

अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी यावर्षी राज्यात एकूण २ लाख ३ हजार २९३ जागा उपलब्ध होत्या, त्यापैकी १ लाख ८१ हजार २८३ विद्यार्थ्यांना चार फेऱ्यांमध्ये जागावाटप झाले आहे. यामध्ये पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या फेरीत ९३,२३५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले. यामुळे ८८,०४८ जागा चौथ्या फेरीसाठी उपलब्ध असून २२,०१० जागा रिक्त आहेत. या जागा व चौथ्या फेरीमध्ये प्रवेश न होणाऱ्या जागा या संस्थात्मक फेरीसाठी उपलब्ध असतील. चौथ्या फेरीत महाविद्यालय मिळालेल्या विद्यार्थ्यांनी ४ ते ७ सप्टेंबरदरम्यान संबंधित महाविद्यालयामध्ये प्रत्यक्ष हजर राहून आवश्यक ती कागदपत्रे सादर करून, शुल्क भरून प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे. यानंतर ८ ते १५ सप्टेंबरदरम्यान संस्थात्मक फेरीचे प्रवेश होतील.

## ६०,८९३ विद्यार्थ्यांना 'बेटरमेंट' नाही

तिसऱ्या फेरीनंतर महाविद्यालय बदलण्याचा पर्याय स्वीकारून चौथ्या फेरीत सहभागी झालेल्या ६० हजार ८९३ विद्यार्थ्यांनी त्यांच्या महाविद्यालयाच्या पसंतीक्रमामध्ये कोणताही बदल केला नाही. त्यामुळे या विद्यार्थ्यांना तिसऱ्या फेरीत मिळालेले महाविद्यालयच पुन्हा देण्यात आले. दरम्यान, चौथ्या फेरीतील जागावाटपामुळे प्रवेश प्रक्रियेचा पुढील टप्पा संस्थास्तरीय फेरीकडे वळणार आहे.

# शिक्षक : समाजमन घडवणारे आणि भविष्याचे शिल्पकार...

**शिक्षक विद्यार्थ्यांचे** भवितव्य साकारत असतात. या शिक्षक दिनानिमित्त, आपल्या कोट्यवधी विद्यार्थ्यांचे जीवन ज्ञान, कौशल्ये, मूल्यांनी परिपूर्ण करणाऱ्या आणि त्यांना प्रेरणा देणाऱ्या शिक्षकांबद्दल सर्व भारतीयांच्या वतीने, मी कृतज्ञता व्यक्त करते.

भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आंतरराष्ट्रीय ख्यातीचे विद्वान, प्रसिद्ध लेखक आणि आदरणीय मुत्सद्दी होते; मात्र तरीही त्यांनी शिक्षक म्हणून असलेली आपली भूमिका इतर सर्व भूमिकांपेक्षा सर्वात महत्त्वाची मानली. राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना एकदा विचारण्यात आले होते की, लोक त्यांना वैज्ञानिक म्हणून अधिक लक्षात ठेवतील की राष्ट्रपती म्हणून? त्यावर डॉ. कलाम यांनी उत्तर दिले होते की, त्यांना एक शिक्षक म्हणून लोकांच्या स्मरणात राहायला आवडेल.

आपले कौशल्य आणि चारित्र्यामुळे वंदनीय ठरणारे आणि ज्यांच्याप्रति समस्त विद्यार्थी समर्पित असतात असे शिक्षक नेहमीच आपले आदर्श राहिले आहेत. शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांवर स्वतःच्या मुलांप्रमाणे प्रेम केले पाहिजे, त्यांनी सर्वांना समान आणि न्याय्य वागणूक दिली पाहिजे, त्यांनी विद्यार्थ्यांवर रागवू नये, त्यांनी संयम बाळगावा, विद्यार्थ्यांच्या कल्याणाला प्राधान्य द्यावे आणि विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेनुसार त्यांना शिकवावे, अशी आपल्या प्राचीन ग्रंथांची शिकवण आहे. अशा शिक्षकांविषयी असलेल्या अतिशय सखोल आदराच्या भावनेतूनच, सुमारे तीन सहस्र वर्षांपूर्वी तैत्तिरीय उपनिषदातील 'शिक्षावल्ली'ने 'आचार्यदेवो भव' हा कालातीत संदेश दिला होता.

ज्ञानी तसेच अतिशय आपुलकीने मार्गदर्शन करणाऱ्या अनेक शिक्षकांचे मार्गदर्शन लाभणे हे माझे परमभाग्य राहिले आहे. सातवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर, पुढील शिक्षणासाठी गावाबाहेर पडणारी मी गावातली पहिली मुलगी होते. नंतर भुवनेश्वरमध्ये शिकत असतानाही मला माझ्या शिक्षकांकडून उदंड प्रेम आणि प्रोत्साहन लाभले. माझ्या शिक्षकांचे जीवन एका सखोल सत्याचे दर्शन घडवते. प्रेमळ आणि समर्पित असा कोणताही शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये असीम क्षमता आणि प्रेरणा जागृत करू शकतो. त्यांच्या प्रोत्साहनामुळे आयुष्यातील कठीण आव्हानांना तोंड देण्याचे धैर्य आणि सर्वोच्च ध्येय गाठण्याचा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये विकसित होतो. शिक्षक केवळ अभ्यासक्रमच शिकवत नाहीत, तर करण्याची क्षमताही असते.

संस्कृतमधील एक प्रसिद्ध सुभाषित आपल्याला सांगते : 'सर्वत्र विजयम् इच्छेत्, शिष्यात् इच्छेत् पराजयम्' - माणसाने सर्वत्र विजयाची इच्छा बाळगावी, परंतु स्वतःच्या शिष्याकडून मात्र पराभूत होण्याची इच्छा ठेवावी. विद्यार्थ्यांच्या स्वतंत्र विचारांना प्रोत्साहन देणे, त्यांची उत्सुकता जागवणे, प्रश्न विचारण्याच्या वृत्तीला खतपाणी घालणे, त्यांची तर्क आणि निर्णयाची क्षमता तीक्ष्ण



आज ५ सप्टेंबर. भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा हा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या लेखात शिक्षकांचे महत्त्व उलगडून दाखवले आहे.

ते विद्यार्थ्यांना यशस्वी तसेच अर्थपूर्ण जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेल्या कलाकौशल्यांनी परिपूर्ण बनवतात. ते विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक असतातच, पण त्याचबरोबर, ते विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनाच्या प्रवासातील शुभचिंतक, मित्र आणि सहप्रवासीही असतात.

'एक चांगला शिक्षक कसा असावा' याविषयी प्राचीन काळापासून आपल्या संस्कृती आणि परंपरेतून मिळालेला दृष्टिकोन आजही तितकाच महत्त्वपूर्ण आहे. अनेक शतकांपूर्वी महाकवी कालिदासांनी त्यांच्या 'मालविकाग्निमित्रम्' या नाटकात लिहिले आहे की, चांगल्या शिक्षकाकडे सखोल ज्ञान असते आणि ते प्रभावीपणे संक्रमित करणे, आणि त्यांना एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून घडण्यास मदत करणे हे अध्यापनाचे सर्वात उपयुक्त आणि सन्माननीय पैलू आहेत. अशाच प्रेरणादायी शिक्षणाच्या माध्यमातून आपण यशस्वी उद्योजक, तल्लख शास्त्रज्ञ, सर्जनशील कलाकार आणि तत्कालीन आव्हानांवर नावीन्यपूर्ण उपाय शोधण्यास सक्षम असलेल्या नागरिकांच्या पिढ्या घडवू शकू.

अध्यापन हा केवळ एक व्यवसाय नाही, तर ते एक व्रत आहे. ही केवळ एक कारकीर्द किंवा नोकरी नाही, तर मानवतेला आकार देण्याचे एक पवित्र कार्य आहे. येणाऱ्या पिढ्यांचा मार्ग प्रकाशित करण्याची ही एक उदात्त जबाबदारी आहे.

अध्यापनाशी जोडलेल्या माझ्या आठवणी मला एका विशेष समाधानाची अनुभूती देतात. मी ओदिशातील रायरंगपूर येथील श्री ऑरोबिंदो इंटेग्रल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना शिकवले आहे. विविध विषय शिकवण्याव्यतिरिक्त, मुलांचे संगीत कार्यक्रम, क्रीडा उपक्रम आणि नाटकांच्या तयारीसाठी मी मदत करत असे. स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यांची तयारी आणि कार्यक्रमांदरम्यान मुलांमधील आनंदी उत्साहाच्या आठवणी माझ्यासाठी आजही अतिशय सुखावह आहेत. विद्यार्थ्यांना सुंदर नैसर्गिक वातावरणात सहलीला नेण्यात आणि खेळ तसेच शोधाच्या माध्यमातून त्यांना प्राणी, पक्षी, झाडे आणि वनस्पतींच्या जगाची ओळख करून देण्यात मला खूप समाधान लाभले आणि जीवनाचा अर्थ सापडला.

शाळा सोडल्यानंतर अनेक वर्षांनीही माझे विद्यार्थी मला त्यांच्या कौटुंबिक कार्यक्रमांना आदरपूर्वक आमंत्रित करतात. मला माझ्या अनेक विद्यार्थ्यांची नावेच नव्हे, तर आम्ही त्यांना प्रेमाने ज्या टोपणनावांनी हाक मारायचो ती टोपणनावेही स्पष्टपणे आठवतात. मी ज्या विद्यार्थ्यांना शिकवले त्यांच्याकडून मीसुद्धा खूप काही शिकले आहे. मुलांची उत्स्फूर्तता आणि चिकित्सक वृत्तीमधून शिक्षकही खूप काही शिकत असतात. म्हणूनच विद्यार्थ्यांना भेटण्यासाठी आणि त्यांचे विचार व कल्पना समजून घेण्यासाठी मी नेहमीच उत्सुक असते.

साधारण अकरा वर्षांपूर्वी, मी माझ्या गावच्या घरी एका निवासी शाळेची स्थापना केली. या शाळेत वंचित कुटुंबांतील विद्यार्थी आणि ज्यांनी आपले आई-वडिलांचे छत्र गमावले आहे अशी बालके शिक्षण घेतात. मी या बालकांना भेटण्यासाठी वेळोवेळी या शाळेला भेट देत असते. या वर्षी, २० जून रोजी माझ्या वाढदिवसाच्या दिवशी या बालकांना भेटून मला खूप आनंद झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही माझ्याबरोबर या शाळेला भेट दिली आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. त्यांना भेटण्याचा हा असाधारण अनुभव या विद्यार्थ्यांसाठी कायमस्वरूपी प्रेरणास्रोत बनेल. त्या मुलांना प्रगती करताना पाहून माझ्या मनात एका विशेष अर्थपूर्णतेची भावना निर्माण होते.

आपल्या विद्यार्थ्यांना एक चांगला माणूस बनवण्यासाठी मार्गदर्शन करणे हे शिक्षकांचे पवित्र कर्तव्य आहे. आपला देश सामाजिक समावेशनाला केंद्रस्थानी ठेवून विकसित भारत बनण्याच्या ध्येयाकडे एका निश्चित गतीने वाटचाल करत आहे. या प्रवासात शिक्षकांनी अशा विद्यार्थ्यांच्या पिढ्या घडवाव्यात, ज्या आपल्या सांस्कृतिक वारशाच्या आणि परंपरेच्या समृद्धीला जपतील; वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करतील आणि मानवतेच्या कल्याणासाठी कार्य करतील; 'अंत्योदय'च्या आदर्शाचे पालन करतील; पर्यावरण आणि सर्व सजीवांचे रक्षण करतील; वैयक्तिक आणि सामूहिक उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करतील आणि 'राष्ट्र प्रथम'च्या भावनेने पुढे जातील.

आपल्या ध्येयाला वाहून घेतलेल्या आणि अतिशय प्रामाणिकपणे काम करणाऱ्या शिक्षकांचा नेहमीच आदर करा, असे माझे देशातील प्रत्येक नागरिकाला आवाहन आहे. अशा ध्येयनिष्ठ शिक्षकांच्या योगदानामुळेच भारत जगाचे नेतृत्व करत राहील, अशी मी मनापासून कामना करते.




# व्यवस्थापनशास्त्राची चौथी फेरी जाहीर

**मुंबई :** व्यवस्थापनशास्त्र (एमबीए/ एमएमएस) अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची चौथी यादी सीईटी कक्षाने शुक्रवारी जाहीर केली. यात ५,७०८ विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळाली आहे. चौथ्या यादीमध्ये १,८९९ विद्यार्थ्यांना प्रवेशाची प्रथमच संधी उपलब्ध झाली आहे.

व्यवस्थापनशास्त्र प्रवेशासाठी राज्यभरामध्ये ५८ हजार २६७ जागा उपलब्ध होत्या. पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या फेरीमध्ये ४१ हजार ६५७ विद्यार्थ्यांना जागावाटप करण्यात आले. ज्या विद्यार्थ्यांना चौथ्या फेरीमध्ये महाविद्यालय मिळाले आहे त्यांनी ७ सप्टेंबरपर्यंत प्रत्यक्ष हजर राहून आवश्यक ती कागदपत्रे सादर करून व शुल्क भरून प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे.




टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
प्रस्तुत




लोकसत्ता यशस्वी भव! ८१

# एस.एस.सी. मार्गदर्शन - Science & Technology Part I

## "Effects of Electric Current"

**Dear Students,**

Electricity is an essential part of our everyday life, and its effects can be observed in many electrical devices around us. The chapter "Effects of Electric Current" helps students understand the important effects produced when electric current passes through a conductor. In this chapter, students will learn about the heating effect, magnetic effect and chemical effect of electric current and their applications in daily life. These concepts are also important from the point of view of the SSC Board examination. Understanding the principles behind these effects will help students answer conceptual and application-based questions confidently. In this article, we will focus on important questions that may be asked in the Board examination and learn how to write their expected answers in a clear, precise and systematic manner. A proper understanding of the concepts, along with accurate diagrams, definitions and explanations, can help students score better marks.

**Q No. 1) Choose the correct alternative.**

i) When electric current is passed through the solenoid, it shows magnetic lines of force similar to a -------------------. [July 2019]
a) bar magnet b) horse shoe magnet
c) disk magnet d) spherical magnet
**Ans - a) bar magnet**

ii) The device used for producing current is called -------. [March 2023]
a) A voltmeter b) An ammeter
c) A generator d) A galvanometer
**Ans - c) A generator**

iii) When current I flows through a circuit with resistance R, the heat roduced in the resistor in time t will be --------- [September 2021]
a) IRt b) $IR^2t$ c) $I^2Rt$ d) $IRt^2$
**Ans - c) $I^2Rt$**

iv) Heating effect of electric current is not observed in -----------
a) electric oven b) electric iron c) electric motor d) fuse
**Ans - c) electric motor**

**Q No. 2) Find the odd one out.**

i) Fuse wire, bad conductor, rubber gloves, generator.
**Ans - Generator** It converts mechanical energy into electric energy the remaining three do not.

ii) Voltmeter, ammeter, galvanometer, thermometer [March 2020]
**Ans - Thermometer** It measures temperature, the remaining three convert one form of energy.

iii) Loud speaker, microphone, electric motor, magnet [March 2023]
**Ans - Magnet** Others are devices in which convert energy from one form to another while magnet is not used as a device for energy conversion.

iv) Live wire, Neutral wire, Fuse wire, Earth wire
**Ans - Fuse wire** Fuse wire protects the electric circuit from short circuit whereas others types of wires are used in home electrical connections.

**Q No. 3) Select the appropriate options and complete the following paragraph. (no loss, loss, direct current, 50 Hz, 0 Hz, alternating current, 220 Hz, Infinite)**

The electric current in which direction of current is constant is called as -------------------- whereas electric current in which direction of current reverses after equal intervals of time is called ----------------------------. When direct current is transmitted over long distances, there is ------------------ of energy whereas there is -------------------- of energy for transmitting alternating current. The frequencies of direct current and alternating current (in India) are --------------- and ------------------ respectively.

**Ans :**
The electric current in which direction of current is constant is called as direct current whereas electric current in which direction of current reverses after equal intervals of time is called alternating current. When direct current is transmitted over long distances, there is loss of energy whereas there is no loss of energy for transmitting alternating current. The frequencies of direct current and alternating current (in India) are 0 Hz and 50 Hz respectively.

**Q No. 4) State whether the following statements are true or false.**
**(If a statement is false,correct it and rewrite it)**

i) Magnetic field increases as we go away from a magnet.
**Ans - False** (Magnetic field decreases as we go away from a magnet.)

ii) The production of magnetism by an electric current is called electromagnetism.
**Ans -** True

iii) The electricity metre in the domestic electric circuit measures electrical energy consumption in kilowatt – hours.
**Ans -** True

iv) Split rings are used in a DC generator and in an electric motor.
**Ans -** True

**Q No. 5) Name the following**

1) The negatively charged particle considered as a free particle moving in a metallic conductor.
**Ans -** Electron
2) The quantity expressed in ampere.
**Ans -** Electric current
3) A component used to control the current.
**Ans -** Resistor
4) An instrument used to measure electric current.
**Ans -** Ammeter
5) An instrument used to measure electric potential difference.
**Ans -** Voltmeter

**Q No. 6) Scientific reasoning questions.**

**1) For electric power transmission, copper or aluminium wire is used. [March 2023]**
i] Copper and aluminium are good conductors of electricity.
ii] Copper and aluminium offer low resistance to the flow of current. Therefore, veryless heat is produced.
iii] Hence, aluminium and copper are used for electric power transmission.

**2) Tungsten metal is used to make a solenoid type coil in an electric bulb. [July 2023, Mar 2024]**
OR
**A tungsten wire is used in an electric bulb.**
i] Electric bulb works on the principle of heating effect electric of current.
ii] The solenoid type coil of bulb has high resistivity. Hence, it can be heated by passing current through it.
iii] The melting point of tungsten is very high. So, when the tungsten filament is heated at very high temperature, it does not melt.
iv] The intensity of light emitted by filament depends on the temperature. Hence, when current is passed through the bulb, the filament gets heated to high temperature (upto 3400 °C) and starts glowing.
v] Hence, tungsten metal is used to make a solenoid type coil in an electric bulb.

**3) We should not use many electrical appliances simultaneously.**
i] Electrical appliances like geyser, heater, motor, oven, washing machine, etc. have high power consumption.
ii] If such appliances are connected simultaneously, large amount of current flows in the circuit.
iii] This current may exceed permissible value and cause overloading.
iv] It can result in causing fire.
iv] Hence, we should not use many electrical appliances simultaneously.

**Q No. 7) Distinguish between Alternating current and Direct current.**

| Alternating current | Direct current |
|---|---|
| Alternating current varies in magnitude continuously i.e. oscillatory. | Magnitude of direct current from a source remains same. i.e. non- oscillatory. |
| Alternating current flows in periodic manner. | Direct current flows in one direction only. |
| Frequency of A.C in India is 50 Hz It can be transmitted over a long distance. | Frequency of D.C is zero Hz It cannot be transmitted over a long distance. |

**Q No. 7) An electric iron rated 750 W is operated for 2 hours/day. How much energy is consumed by the electric iron for 30 days?**

**Ans :** Data : Power (P) = 750 W
Time (t) = 2 hours/day for 30 days
= 2 x 30 hours
Energy consumed = Power x time
= 750W x 60 hours
= 45000 watt.hours
= 45 kWh or 45 units
**The energy consumed by the electric iron for 30 days = 45 kWh**

**Questions for Homework**

1) Explain the construction and working of an electric motor. Draw a neat diagram and label it.
2) State the right hand thumb rule.
3) Write Fleming's left hand rule.
4) Explain the construction and working of an electric generator (AC). Draw a neat diagram and label it.

विनोद शालिनी सुधाकर टेंबे
ज्ञानदीप विद्यामंदिर, भडगाव, खेड, जि. रत्नागिरी

उद्याचा विषय : Mathematics Part II

समन्वयक - सी. डी. वडके

# वैयक्तिक प्रगतीवरही जनुकांचा प्रभाव

आरोग्य वार्ता

**नवी दिल्ली :** माणसाचे व्यक्तिमत्त्व आणि आयुष्यभरातील महत्त्वाच्या घडामोडींमागे जनुकीय घटक (जिनोम) मोलाची भूमिका बजावतात, असा दावा एका संशोधनात करण्यात आला आहे. 'रिव्हाइव्हड जिनोमिक्स ऑफ पर्सनॅलिटी कन्सॉर्टियम'च्या संशोधकांनी जगभरातील ४६ वेगवेगळ्या समूहांचा अभ्यास करून 'नेचर' या नियतकालिकात हा अहवाल प्रसिद्ध केला आहे.

माणसाच्या व्यक्तिमत्त्वातील मुख्य पाच पैलूंशी (ओपननेस, कॉन्शसनेस, एक्स्ट्राव्हर्जन, एग्रीएबलनेस आणि न्यूरोटिसिझम) तब्बल १,२०० हून अधिक 'जीन व्हेरियंट्स' (जनुकीय प्रकार) जोडलेले असल्याचे या अभ्यासात समोर आले आहे. माणसांमधील ९९.९ टक्के डीएनए समान असतो, परंतु उर्वरित ०.१ टक्का जनुकीय फरकच मानवी स्वभाव, आरोग्य, शिक्षण आणि करिअरच्या वाटा ठरवण्यास मदत करतो, असे या संशोधनातून समोर आले आहे.

हे संशोधन स्पष्ट करते की, जनुकांचा हा प्रभाव केवळ एका प्रदेशापुरता मर्यादित नसून तो जगभरात समान रीतीने काम करतो. तरीही, व्यक्तिमत्त्व घडवण्यात पर्यावरणाचा आणि आजूबाजूच्या परिस्थितीचा वाटा अत्यंत महत्त्वाचा मानला गेला आहे. जनुकांचा हा प्रभाव मानवी आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर दिसतो. मानसिक व शारीरिक आरोग्य, दीर्घायुष्य, उत्पन्न आणि नोकरी बदलण्याच्या निर्णयांपर्यंत या जनुकांचा संबंध आढळतो.






# वन्यजीव मंडळात व्यावसायिकांचा वरचष्मा?

## पर्यटनासंबंधित व्यक्तींच्या नियुक्तीने नव्या रचनेवर प्रश्नचिन्ह

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नागपूर :** वन्यजीव संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वाचे निर्णय घेणाऱ्या राज्य वन्यजीव मंडळाची नव्याने झालेली रचना पुन्हा चर्चेत आली आहे. मंडळात वन्यजीव सफारी आयोजक, रिसॉर्ट आणि 'होम स्टे' क्षेत्राशी संबंधित व्यक्तींसह व्यावसायिकांचा समावेश झाल्याने वन्यजीव संवर्धन आणि पर्यटन यांच्यातील समतोलाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. शुक्रवारी जाहीर झालेल्या सदस्यांच्या यादीमुळे मंडळाच्या भविष्यातील भूमिकेबाबत वनखात्यात चर्चा सुरू झाली आहे.

वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ अंतर्गत राज्य वन्यजीव मंडळाच्या सदस्यांची निवड करताना विविध क्षेत्रांचे प्रतिनिधित्व अपेक्षित आहे. पर्यावरण आणि जैवविविधता क्षेत्रातील शासकीय अधिकाऱ्यांसह वन्यजीव संवर्धनाशी संबंधित व्यक्तींना मंडळावर स्थान दिले जाते. मात्र, यंदाच्या रचनेत वन्यजीव पर्यटनाशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध असलेल्या व्यक्तींची संख्या लक्षवेधी ठरली आहे. मंडळावर नियुक्त एका सदस्याचा 'होम स्टे' व्यवसायाशी संबंध आहे. तर एकाचे रिसॉर्ट आहे. एक सदस्य वन्यजीव सफारीचे आयोजन करणारा, तर एक व्यावसायिक आहे. तसेच एका मोठ्या संस्थेतील दोन पदाधिकाऱ्यांनाही मंडळावर स्थान देण्यात आले आहे. वन्यजीवांशी संबंधित संस्था, राजकीय मंडळी तसेच प्रसारमाध्यम प्रतिनिधींना यात स्थान मिळाले आहे. मात्र मंडळाच्या एकूण रचनेचा प्रश्न उपस्थित झाला आहे.

वन्यजीव पर्यटन हे आज वनक्षेत्रालगतच्या अर्थकारणाचा महत्त्वाचा भाग बनले असले, तरी पर्यटन वाढीबरोबर वन्यप्राण्यांचे संवर्धन, त्यांच्या मार्गिका यांच्या हिताचा समतोल राखणेही तितकेच आवश्यक आहे. त्यामुळे निर्णयप्रक्रियेत विविध क्षेत्रांचे प्रतिनिधित्व किती संतुलित आहे, हा मुद्दा महत्त्वाचा ठरतो.

### धोरणात समतोल राखण्याचे आव्हान

मागील काही वर्षांत मंडळाची भूमिका आणि प्रत्यक्ष कामकाज याबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत. अनेक महत्त्वाचे प्रकल्प आणि प्रस्ताव मंडळाच्या माध्यमातून पुढे गेले. मात्र, या निर्णयांमध्ये मंडळातील सदस्यांची भूमिका नेहमीच चर्चेचा विषय राहिली. वन्यजीव मंडळ हे केवळ विविध क्षेत्रांतील प्रतिनिधींना एकत्र आणणारे व्यासपीठ नसून राज्याच्या वन्यजीव धोरणाला दिशा देणारी संस्था आहे. त्यामुळे नव्या मंडळासमोर आता खरी कसोटी पर्यटनाला चालना देण्याची नव्हे, तर पर्यटन आणि संवर्धन यांच्यातील योग्य मर्यादा निश्चित करण्याची असेल.



# आश्रमशाळेतील विद्यार्थिनीचा मृत्यू

## नाशिकमध्ये दोन अधिकारी निलंबित

लोकसत्ता प्रतिनिधी

**नाशिक :** कळवण तालुक्यातील विसापूर येथील शासकीय आश्रमशाळेत इयत्ता दुसरीत शिक्षण घेणाऱ्या आठ वर्षांच्या विद्यार्थिनीला ताप, उलट्यांमुळे उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तेथे तिचा मृत्यू झाला. याप्रकरणी पालकांनी आश्रमशाळा प्रशासनास जबाबदार धरल्यानंतर आदिवासी विकास विभागाने शिक्षण विस्तार अधिकारी वसंत निकम आणि अधीक्षिका स्मिता गायकवाड यांना निलंबित केले. तसेच पालकांना दोन लाख रुपये सानुग्रह अनुदान जाहीर केले.

आश्रमशाळेतील सृष्टी सूर्यवंशी हिला गुरुवारी तापाबरोबर उलट्या होऊ लागल्याने मोकमभणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर पुन्हा आश्रमशाळेत नेण्यात आले. मात्र मध्यरात्री प्रकृती पुन्हा बिघडल्याने सृष्टीला उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पहाटे २.२७ वाजता तपासणीनंतर सृष्टीला मृत घोषित केले. सृष्टी सटाणा तालुक्यातील गोळवाड येथील रहिवासी आहे. दरम्यान, शिक्षक, कर्मचाऱ्यांनी मुलगी आजारी असल्याची वेळेवर माहिती दिली नाही, असा आरोप पालकांनी केला.

> सृष्टीला ताप आल्यानंतर दिवसभर तिची प्रकृती स्थिर होती. तिचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, यासाठी तेथील जेवण, पाणी याचे नमुने प्रयोगशाळेत पाठविण्यात आले. तसेच शवविच्छेदनानंतर मृत्यूचे नेमके कारण समजू शकेल.
> – **लीना बनसोड**, आदिवासी विकास आयुक्त


डॉ. मानसी Tanvi HERBALS क्लिनिक

फ्री चेकअप कॅम्प

डॉ. पुष्कराज धामणकर

आजच अपॉइंटमेंट बुक करा

लठ्ठपणा ? पायाला सूज ?

चालताना दम लागतोय ?

9833683021


# ऐन श्रावणात झेंडू, शेवंतीची फुले सुकली!

## आवक वाढल्याने दरात घट; शेतकरी संकटात

विनोद कामतकर, लोकसत्ता

**सोलापूर :** श्रावण महिन्यातील सण-उत्सव, सत्यनारायण आणि शिवपूजेमुळे फुलांना चांगला उठाव मिळून दोन पैसे हाती पडतील, ही शेतकऱ्यांची अपेक्षा यंदा फोल ठरली आहे. सोलापूरच्या बाजारात झेंडू आणि शेवंतीची आवक मोठ्या प्रमाणावर वाढल्याने दरात मोठी घसरण झाली आहे. उत्पादन खर्चही निघणे कठीण झाल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत. दुसरीकडे, श्रावणातील विशेष शिवपूजेसाठी पांढऱ्या आणि सुगंधी फुलांची मागणी कायम असल्याने निशिगंध व काकड्याचे भाव टिकून आहेत.

सोलापूर जिल्ह्यासह सीमाभागातील विजयपूर, कलबुर्गी (कर्नाटक) येथील शेतकऱ्यांनी श्रावणासाठी फुलांचे नियोजन केले होते. पावसाने विश्रांती दिल्याने सोलापूरच्या बाजारात झेंडू आणि शेवंतीची आवक अचानक वाढली. मात्र, त्या तुलनेत मागणी कमी राहिल्याने दरांवर परिणाम झाला.



> यंदा पाऊस नसल्याने उत्पादन चांगले झाले; मात्र आवक गरजेपेक्षा जास्त झाल्याने भाव कमी आहे.
> – **जावेद आवटे**, फुलांचे व्यापारी

> ऐन हंगामात झेंडू-शेवंतीचे दर गडगडल्याने मोठे आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे.
> – **पांडुरंग व्हनमाने**, शेतकरी, मंद्रूप

### सोलापूर बाजारातील दर

(प्रतिकिलो रुपयांत)

झेंडू : ८ ते १५

शेवंती : २५ ते ४०

गुलाब : ४० ते ५०

निशिगंध : २० ते ४०

काकडा : २०० ते २५०

# रेल्वे आरक्षण प्रणाली तीन तासांसाठी बंद

**मुंबई :** रेल्वेची मुंबई प्रवासी आरक्षण प्रणाली (पीआरएस) तांत्रिक देखभाल-दुरूस्तीसाठी शनिवारी रात्री तीन तासांसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे सलग सुट्ट्या आणि गणेशोत्सवानिमित्त बाहेरगावी जाण्याची तयारी करणाऱ्यांची काहिशी गैरसोय होण्याची चिन्हे आहेत.

सिस्टम पॅरामीटर ट्युनिंगच्या कामासाठी आरक्षण प्रणाली (पीआरएस) शनिवारी रात्री ११.४५ पासून ते मध्यरात्री ०२.४५ पर्यंत बंद राहील. यादरम्यान इंटरनेटवरून तिकीट आरक्षण करता येणार नाही. इंटरॲक्टिव्ह व्हॉइस रिस्पॉन्स सिस्टम, चार्ट डिस्प्ले, तात्काळ आरक्षण, टच स्क्रीन, रिफंड काउंटर्स व कोचिंग रिफंड टर्मिनल या सेवा उपलब्ध नसतील. तथापि, रिफंड नियमांनुसार परताव्यासाठी तिकीट जमा पावती जारी केले जाईल, अशी माहिती प्रशासनाने दिली.


**WANTED PREMISES FOR BANK**

**MBANK THE MUSLIM CO-OPERATIVE BANK LTD., PUNE**

**We are interested to purchase Commercial premises, on owner ship basis or on rental basis**

**Mumbai City : at following Area**

i) At Byculla OR Nagpada OR Sufia Zubair Road OR Temkar Mohalla OR Dunkan Road, Clair Road OR Madan Pura Surati Mohalla &
ii) At Bandra / Kurla :
**Bandra Area :** Jama Masjid OR Garib Nagar OR Pali Hill OR Bairam Nagar, OR Bharat Nagar Near Court OR Bazar Road OR Naupada
**Kurla Area :** Qureshi Nagar OR Bail Bazar, OR Kasai Wada OR LIG Colony. OR MIG Colony OR Kurla east OR Zarimar OR Anasagr Marg, OR Kapadiya Nagar OR Kamran Kalpana Theater, Kohinoor Hsg. Society area.

**Pune City : at following Area**

**Katraj Area** : Santosh Nagar OR Datta Nagar OR Near Shehnai Hall OR Near Katraj Bus stop
**Vishrantwadi** : Mohanwadi OR Tingre Nagar OR Vishrantwadi.
**Chakan** : Chakan City OR Kaziwada OR Shikilkar Wada OR Khandoba Mal.

**Required Area should be of 1200 to 1500 sq.feet.**

01. Preference will be given to Ground floor, and Exclusive Commercial Building.
02. Good accessibility. 03. Ample parking facility. 04. Other basic facilities.

**Interested parties including whose premises located on Ground or first floor can submit their offers with full details and plan of premises, within fifteen days from date of publication of this Advertisement, to: The Chief Executive Officer, The Muslim Co-Op. Bank Ltd; Pune** Administrative Office, Golden Jubilee Education Trust Building, 4th Floor, Opp. Ice Factory, 647, Bhawani Peth, Pune-411042. **Tel.: 26435007, 2643009, Fax-020-26448977, Mobile : 9890620900**
**e-mail:** admin@muslimcooperative.bank.in

**Place : Pune** **Date: 05.09.2026**



**MBANK दि मुस्लिम को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पुणे**

प्रशासकीय कार्यालय : ६४७ भवानी पेठ, पुणे ४११०४२.
फोन : ०२०-२६४३५००७/२६४३५००९/२६४४८९९३. email:admin@muslimcooperative.bank.in

**जाहिर सुचना**

बँकेच्या सर्व सभासदांना सुचित करण्यात येत आहे की, सहकार कायद्यानुसार रविवार दिनांक २०.०९.२०२६ रोजी १ दिवसीय प्रशिक्षण, सभासदांसाठी दुपारी १२ ते ४ सहकार आणि बँकींग व सायबर सुरक्षा प्रशिक्षण कार्यक्रम हाजी गुलाम एज्युकेशन ट्रस्टचे डॉ.ए.आर. शेख असेम्ब्ली हॉल, आझम कॅम्पस, पुणे येथे घेण्यात येणार आहे. बँकेच्या सभासदांना विनंती की त्यांनी प्रशिक्षण प्रवेश अर्ज आपल्या जवळच्या शाखेत बँक मॅनेजर कडे दिनांक ११.०९.२०२६ पर्यंत बँकेच्या कामकाजाच्या वेळेत सुपूर्द करावा. जेणेकरुन सभासदांच्या संख्येनुसार प्रशिक्षण शिबिराची व्यवस्था करता येईल व तशी सुचना सर्व सबंधितांना देता येईल. कृपया संधीचा लाभ घ्यावा व सहकार्य करावे.

आपला
तनवीर पी. इनामदार,
अध्यक्ष

दिनांक ०५.०९.२०२६



**MBANK दि मुस्लिम को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पुणे**

प्रशासकीय कार्यालय : ६४७ भवानी पेठ, पुणे ४११०४२.
फोन : ०२०-२६४३५००७/२६४३५००९/२६४४८९९३. email:admin@muslimcooperative.bank.in

**वार्षिक सर्व साधारण सभेची नोटीस (फक्त सभासदांकरिता)**

आपल्या बँकेची ९४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २०.०९.२०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता हाजी गुलाम मोहम्मद आझम एज्युकेशन ट्रस्टच्या डॉ. ए. आर. शेख असेम्ब्ली हॉल, कॅम्प, पुणे येथे पुढील विषयांवर विचार करुन निर्णय घेण्याकरिता आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी सदर सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

**-: सभेपुढील विषय :-**

१. मागील दि. २८.०९.२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत मंजूर करणे.
२. संचालक मंडळाच्या, बँकेच्या कार्याबद्दलचा वर्षाअखेरच्या अहवालावर विचार करणे व तो स्विकृत करणे.
३. सन २०२५-२०२६ सालाचा वैधानिक लेखापरिक्षण झालेल्या ताळेबंद व नफातोटा पत्रकास स्विकृत करणे.
४. सन २०२५-२०२६ सालाच्या लेखापरिक्षकांच्या, लेखापरिक्षण अहवालावर विचार करणे व स्विकृत करणे.
५. सन २०२४-२०२५ चा वैधानिक लेखा परिक्षक, मेसर्स एस. के. आय. ॲण्ड असोसिएट्स चार्टर्ड अकाउंटट्सच्या अहवालावर बँकेने दिलेला दुरुस्ती पुर्तता अहवाल वाचून मंजूर करणे.
६. माननीय संचालक मंडळाने सुचविलेली सन २०२५-२०२६ सालाकरिता, सहकार कायदा व नियम यांस अनुसरुन अहवालात जाहीर केल्याप्रमाणे नफा वाटपीस मंजूरी देणे.
७. सन २०२५-२०२६ सालाकरीता सभासदांसाठी लाभांश देणे बाबत निर्णय घेणे.
८. सन २०२६-२०२७ सालाकरीता माननीय संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाज पत्रकाची व प्रगतीच्या तक्त्यांची तसेच सन २०२५-२०२६ साली अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
९. बँकेच्या, संचालक मंडळाने सुचविलेल्या दिर्घकालीन, व्यवसायिक आणि वार्षिक योजनांची, भांडवली गुंतवणूक शाखा जागा खरेदी व विक्री, शाखा अंतर्गत बांधकाम/फर्निचर संगणक प्रणाली मध्ये गुंतवणूक आणि खर्च व ९३ व्या वार्षिक सर्व साधारण सभेत शाखा विस्तार, शाखा स्थलांतर करणे आणि बँकेचे कार्यक्षेत्र विस्तार बाबतीत RBI च्या परवानगीनुसार या विषयावर झालेल्या प्रगतीचा आढावा घेणे व इतर सर्व बाबींची नोंद घेणे व त्यास मान्यता देणे. तसेच बँकेची कॅम्प शाखा इमारत जीर्ण झाल्याने या इमारतीस पाहून संबंधित सरकारी कार्यालयाची व RBI ची पुर्व परवानगी घेऊन सदरहू इमारत नव्याने बांधण्याच्या संचालक मंडळाच्या निर्णयास तसेच या कामी येणाऱ्या संभावित खर्चास चर्चा करून मंजुरी देणे.
१०. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया च्या दिनांक ३० एप्रिल २०२६ च्या पत्रा नुसार बँकेस मिळालेल्या परवानगी अन्वये बँकेचे सद्य कार्य क्षेत्र वाढवून त्यात सातारा जिल्हा, सांगली जिल्हा, रायगड जिल्हा, छत्रपती संभाजीनगर जिल्हा आणि कोल्हापूर जिल्हा या इलाख्यांचा समावेश करणाऱ्याबाबत, विचार विमर्श करून बँकेच्या पोट नियम क्रमांक ३ मध्ये बदल करणे बाबत विचार करणे आणि त्यास स्वीकृत करणे बाबत निर्णय घेणे.
११. सन २०२६-२०२७ सालाकरिता माननीय सहकार आयुक्त व निबंधकांनी प्रमाणित केलेल्या पॅनलवरील वैधानिक लेखापरिक्षकाची RBIच्या मंजुरीनुसार नेमणूक करणे व त्याचा मेहनताना ठरविणे व त्यास मान्यता देणे.
१२. सन २०२६-२०२७ सालाकरीता अंतर्गत आणि सतत व समावर्तन (कंकरंट) लेखा परिक्षकाची नेमणूक करणे, त्यांचे मानधन ठरविणे व त्यास मंजूरी देणे.
१३. सन २०२६-२०२७ सालाकरीता संचालक मंडळाने सुचविलेल्या आणि बँकिंग व्यवसायासाठी खरेदी व विक्री करिता सादर केलेल्या स्थावर मालमत्तेच्या खरेदीच्या व्यवहाराच्या तरतुदींची नोंद घेणे व त्यास स्विकृती देणे.
१४. मा. संचालक मंडळाने व.८८,८९,९०,९१,९२ व ९३ व्या वार्षिक सभेने घेतलेल्या त्या त्या वर्षी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार त्या संदर्भात संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयास मंजूरी देणे.
१५. मा. संचालक मंडळा च्या निर्णयानुसार, बँकेच्या कामकाजात सतत अडथळा आणणारे आणि बँकेची कायम-वृत्तपत्र, दुरचित्र वाहीनींवर, विविध समाज माध्यमाद्वारे बदनामी करणारे बँकेचे सभासद श्री. मोहम्मद अझीम इस्लाम गुळाकुवाला, एस. एल. एफ. क्र. जुना १८२५८ आणि नवा एस. एल. एफ. क्र. १२४८०, यांचे सभासदत्व बँकेच्या हितासाठी बँकेच्या पोटनियम क्र. २३ नुसार, व एम.सी.एस. ॲक्ट १९६० क्र. सेक्शन ३५ आणि नियम क्र. २८ व २९ अन्वये निष्कासन/हकालपट्टी करणेबाबत, चर्चा करून निर्णय घेणे व त्यास स्वीकृत करून सहकार आयुक्त आणि आर.बी.आय.कडे मंजुरीसाठी पाठविण्या बाबत मा. संचालक मंडळास अधिकार देणे बाबत निर्णय घेणे.
१६. बँकेने सभासदांच्या प्रशिक्षणासाठी अहवाल साली केलेल्या प्रयत्नांची नोंद घेणे तसेच पुढील आर्थिक वर्षात यासाठी योजलेल्या नोंद घेणे.
१७. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम क्रमांक ४९ नुसार वसुलीचा हक्क अबाधित ठेवून मा. वैधानिक लेखा परिक्षकांनी प्रमाणित केलेल्या बुडीत कर्जाच्या निर्लेखनास मान्यता देणे.
१८. माननीय संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
१९. बँकेने सभासद व सेवक कल्याणा करिता केलेल्या प्रयत्नांची नोंद घेणे तसेच यासाठी केलेल्या कामकाजाचा आढावा घेणे.
२०. सदर वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित सभासदांच्या रजेस मान्यता देणे.
२१. सभासदांकडून येणाऱ्या सुचनांचा विचार करणे व बँकेचे कारभारासंबंधी सर्व साधारण चर्चा करणे.
२२. माननीय अध्यक्षांचे परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

मा.संचालक मंडळाचे आदेशावरुन
पुणे, दिनांक : ०५/९/२०२६ मो. रफीक अब्दुल शेख, मुख्य कार्यकारी अधिकारी

*** विशेष सुचना ***

१. वर नमुद केलेल्या दिवशी व वेळी गणपुर्ती (कोरम) अभावी सभा तहकूब झाल्यास सदरची सभा त्याच दिवशी व त्याच ठिकाणी सकाळी १०.३० वाजता घेतली जाईल व या तहकूब सभेस गणपूर्तीची (कोरम) आवश्यकता असणार नाही.
२. विषय क्र. २१ संबंधी प्रश्न अथवा सूचना सचिवाकडे दि. ११.०९.२०२६ चे आत सादर कराव्यात.
३. ९४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, तारीख, वेळ आणि स्थानाच्या तपशिलांसहित, ज्यांचे मोबाईल नंबर बँकेत रजिस्टर असेल, अशा बँकेच्या सर्व सभासदांना एस.एम.एस.द्वारे पाठविली आहे. तसेच बँकेचा वार्षिक अहवाल ज्या सभासदांचे मोबाईल नंबर बँकेत रजिस्टर्ड आहेत, त्यांना त्यांच्या मोबाईल नंबरवर जर त्यांचे हे बँकेस दिलेले नंबर, व्हाट्सॲपवर कार्यरत असेल तर, त्यांना सॉफ्ट कॉपीद्वारे पाठविला आहे. इतर सभासदांनी हा अहवाल, बँकेच्या वेब साईटवर पाहावा किंवा जवळच्या शाखेमध्ये जाऊन पहावा. यापूर्वीच्या सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार यापुढे सभासदांना छापील अहवाल पाठविला जाणार नाही, सबब आपले मोबाईल नंबर किंवा ईमेल आयडी आपापल्या शाखेमध्ये जाऊन रजिस्टर करावे, हि विनंती. तसेच वार्षिक अहवालाची प्रत दिनांक ५.०९.२०२६ पासून बँकेच्या सर्व शाखांमध्ये आणि प्रशासकिय कार्यालयात कार्यकालिन कामकाजाच्या वेळेत पाहण्यास उपलब्ध असेल तसेच बँकेच्या www.muslimcooperativebank.com या वेब साईटवर उपलब्ध असेल/आहे.
४. वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये पार पाडावयाचे कामकाज असलेली सूचना/विषयपत्रिका स्थानिक वृत्तपत्रात, बँकेच्या वेब साईटवर निर्धारीत वेळेत प्रसिद्ध केली आहे.



**कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

(मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)

**रजिस्टर्ड ऑफिस :** 'कॉसमॉस भवन', प्लॉट नं. ६, आयसीएस कॉलनी, गणेशखिंड रोड, पुणे-४११००७. **फोन :** ०२०-६७०८५३०८

**जाहीर नोटीस**

**नोटीस कलम १३(२) अन्वये दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांन्शिअल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२**

प्रती,

१) **श्री. बिलाल खान साबीर खान (गहाणदार/कर्जदार)**
**पत्ता :** मॉडर्न रोड, बाबला हॉटेल जवळ, जाम मोहल्ला, रझा टॉवर जवळ, भुसावळ, जि. जळगांव-४२५२०१.

२) **श्री. साबीर खान मोहम्मद खान (गहाणदार/सह-कर्जदार)**
**पत्ता :** बाबला हॉटेल जवळ, जाम मोहल्ला, रझा टॉवर जवळ, भुसावळ, जि. जळगांव-४२५२०१.

३) **सौ. फरीदा साबीर खान (गहाणदार/सह-कर्जदार)**
**पत्ता :** बाबला हॉटेल जवळ, जाम मोहल्ला, रझा टॉवर जवळ, भुसावळ, जि. जळगांव-४२५२०१.

४) **श्री. अल्ताफबेग नूरबेग मिर्झा (जामीनदार)**
**पत्ता :** अंजुमन रोड, जाम मोहल्ला, अंजुमन शाळा, भुसावळ, जि. जळगांव-४२५२०१.

५) **श्री. झईद खान साबीर खान (जामीनदार)**
**पत्ता :** मॉडर्न रोड, बाबला हॉटेल जवळ, जाम मोहल्ला, रझा टॉवर जवळ, भुसावळ, जि. जळगांव-४२५२०१.

वर नमूद केलेले कर्जदार आणि सह-कर्जदार यांनी 'कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लि.', स्टेशन रोड, भुसावळ शाखा यांच्याकडून गृहकर्ज **रू. २१,८५,०००/- (रूपये एकवीस लाख पंच्याऐंशी हजार फक्त)** घेतले असून त्यासाठी पुढील मालमत्ता तारण म्हणून दिलेली आहे. त्या मालमत्तेचा तपशील पुढीलप्रमाणे : पुढील मालत्तेचा सर्वसामाईक भाग, खडक, स.नं. ६/१, प्लॉट नं. १०, एकूण क्षेत्रफळ २१४.५ चौ.मी., दक्षिणोत्तर बाजूच्या प्लॉटचे क्षेत्रफह ६८.३४ चौ.मी. आणि त्यावरील बांधकाम क्षेत्रफळ ४०.३७ चौ.मी., सागर पार्क, न्यू इदगाह खडका रोड, खडका, गांव खडका, तालुका भुसावळ, जि. जळगांव-४२५२०१ येथे. **चतुःसीमा : पूर्वेस** : प्लॉट नं. १० चा उर्वरीत भाग, **पश्चिमेस** : प्लॉट नं. ९, **उत्तरेस** : १.२० मीटर रूंद सामाईक रस्ता, **दक्षिणेस** : स.नं. ६/२. तसेच तेथील जमीन आणि त्यावरील बांधकामासहीत आणि सर्व फर्निचर आणि फिक्श्चर्ससहीत ही मिळकत आहे. ही मालमत्ता ११.११.२०२० रोजीच्या गहाणखताद्वारे निर्माण झाली असून, त्याची नोंदणी भुसावळ येथील दुय्यम निबंधक कार्यालयात १२.११.२०२० रोजी अनुक्रमांक ४०६९/२०२० अन्वये करण्यात आली आहे.

सदर कर्ज खाते थकित असून ते दि. १२/०९/२०२५ रोजी आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार अनुत्पादित कर्ज म्हणून घोषित करण्यात आले आहे. आपणांस यानुसार कळविण्यात येते की, **रू. २०,२१,७१३.८१ (रुपये वीस लाख एकवीस हजार सातशे तेरा आणि पैसे एक्याऐंशी फक्त) अधिक त्यावरील व्याज, आकार** यांसहीत सर्व रक्कम ही नोटीस प्रसिद्ध करण्यात आल्यापासून ६० दिवसांच्या आत परत करावी. त्यात कसूर झाल्यास सरफेसी ॲक्ट, २००२ अन्वये पुढील कारवाई सुरु करण्यात येईल.

सरफेसी ॲक्ट २००२ च्या सेक्शन १३(२) नुसार दि. १२.०८.२०२६ रोजीची मागणी नोटीस आपणांस रजिस्टर्ड पोस्ट (आरपीएडी) द्वारा बँकेकडे उपलब्ध असलेल्या पत्त्यावर पाठविण्यात आली आहे मात्र, ती पोहोच न होता परत आल्यामुळे, ही पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे.

**श्री. सचिन श्रीकुमार रणभोर**
**अधिकृत अधिकारी आणि सहाय्यक महाव्यवस्थापक**
**कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

**दिनांक : ०५.०९.२०२६**
**ठिकाण : भुसावळ**



**Home First Finance Company India Limited**
**CIN: L65990MH2010PLC240703, Website: homefirstindia.com**
**Phone No.: 180030008425 Email ID: loanfirst@homefirstindia.com**

**सेक्शन १३(२) अंतर्गत मागणी सूचना**

तुम्ही, खाली नमूद केलेले ऋणको अनुसूचीत नमूद केलेली मालमत्ता गहाण ठेवून कर्ज सुविधेचा लाभ घेतला आहे आणि तुम्ही खाली नमूद केलेले कर्ज करारनाम्याकरिता ऋणको/ सह-ऋणको/ हमीदार म्हणून आहात. परिणामी, तुम्ही केलेल्या कसुरीमुळे तुमच्या कर्ज खात्याचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (संक्षिप्तात "सरफेसी ॲक्ट") च्या तरतुदीअंतर्गत **०३.०९.२०२६** रोजी नॉन-परफॉर्मिंग ॲसेट म्हणून वर्गीकरण करण्यात आले आहे. आम्ही "होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड"ने तुम्ही दिलेल्या पत्त्यावर सरफेसी ॲक्टच्या सेक्शन १३(१३) यासह वाचलेल्या सेक्शन १३(२) अंतर्गत मागणी सूचना निर्गमित केली आहे. उक्त सूचना **०३.०९.२०२६** रोजीप्रमाणे निर्गमित करण्यात आल्या आहेत आणि ह्या सूचनांमध्ये असे नमूद केले आहे की, तुम्हास मंजूर केलेल्या विविध कर्जांचे प्रदान करण्यात तुम्ही कसूर दाखविली आहे. त्यामुळे, सरफेसी ॲक्टच्या सेक्शन १३(२)च्या तरतुदीनुसार सूचना देण्याकरिता आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ३(१)च्या तरतुदींच्या अनुसार सद्य प्रसिद्धी देण्यात आली आहे :

| अ. क्र. | अकाऊंट, ऋणको व हमीदाराचे नाव व पत्ता | अंमलबजावणी करावयाच्या सुरक्षेचा तपशील | मागणी सूचनेच्या तारखेनुसार एकूण थकित रक्कम अधिक पुढील व्याज व अन्य खर्च (रु.'त) |
|---|---|---|---|
| 1 | अन्सार्खा पठाण, तस्लिमबानो चांद खा, नसरिन बानो मुबीन खान | रो हाऊस - प्लॉट नं. ३३ व ३४, ब्लॉक/ बिल्डिंग नं. - गॅट नं. १७५ मधील, ब्लॉक/ बिल्डिंगचे नाव - मौजे बडणापूर, पठाण एलएपी, प्लॉट नं. ३३ व ३४, गट नं. १७५, मौजे बडणापूर जालना, जालना - ४३१२०३, महाराष्ट्र. पुढीलप्रमाणे सिमित : पूर्व - ३ फू. नाली, पश्चिम - २० फू. रोड, उत्तर - इंटरनल रोड, दक्षिण- प्लॉट नं. ३५. | 956,084 |
| 2 | चंद्रशेखन मनोज शिर्के, रोहित मनोज शिर्के, आशाबाई मनोज शिर्के | फ्लॅट - गॅट नं. १/ सी/ डी/ ३/ ए, ब्लॉक / बिल्डिंग नं. - प्लॉट नं. ३०, गॅट नं. १/ सी/ डी/ ३/ ए, मौजे तर्वडे, आशाबाई मनोज शिर्के, गॅट नं. १/ सी/ डी/ ३/ ए, प्लॉट नं. ३० (पश्चिम बाजूचा भाग), बोर्खेडा बस स्टॉपजवळ, बोर्खेडा बुद्रूक, चाळिसगाव रोड, मौजे तर्वडे, ता. चाळिसगाव, जि. जळगाव - ४२४१०१, महाराष्ट्र. पुढीलप्रमाणे सिमित : पूर्व - प्लॉट नं. ३०, पश्चिम - प्लॉट नं. २९, उत्तर - ०९ मी. रुंद रोड, दक्षिण - खुली जागा. | 205,018 |
| 3 | धीरज शिंदे, कवीता शिंदे | फ्लॅट - ०१, ब्लॉक/ बिल्डिंग नं. एन-९, "सारा परिवर्तन", सेक्टर ई, गॅट नं.२३४/२, हर्सल ॲनेक्स. सावंगी, औरंगाबाद, औरंगाबाद - ४३१००१, महाराष्ट्र. पुढीलप्रमाणे सिमित : पूर्व - साईड मार्जिनल स्पेस, पश्चिम - प्लॅट नं. ०२ विंग ०९, उत्तर- पार्किंग, दक्षिण - साईड मार्जिनल स्पेस. | 1,728,066 |
| 4 | हर्षल मनोहर भावसार, मनोहर नगीन भावसार | फ्लॅट - प्लॉट नं. १२, ब्लॉक/ बिल्डिंग नं. - ब्लॉक नं. ६, प्लॉट नं. १२, शेत गॅट नं. १७६/१/१, पिंप्राला, हर्षल भावसार, गॅट नं. १७६/१/१, प्लॉट नं. १२, ब्लॉक नं. ०६ (पूर्व उत्तर बाजूचा भाग) ॲट पिंप्राला शिवार, ता. व जि. जळगाव-४२५००१, महाराष्ट्र. पुढीलप्रमाणे सिमित : पूर्व - प्लॉट नं. ४, पश्चिम - ब्लॉक नं. १, उत्तर - प्लॉट नं. ११, दक्षिण - खुली वाहिनी व ब्लॉक नं. ५. | 511,583 |
| 5 | ज्योती जाधव | फ्लॅट - ३, ब्लॉक / बिल्डिंग नं. पहिला मजला, विंग - ०८ मधील, सी - टाईप, "सारा परिवर्तन", सेक्टर सी, गॅट नं. २४३/२, हर्सूल ॲनेक्स, सावंगी, औरंगाबाद, औरंगाबाद - ४३१००१, महाराष्ट्र. पुढीलप्रमाणे सिमित : पूर्व - साईड मार्जिनल स्पेस, पश्चिम - फ्लॅट नं. ०४ विंग ०८, उत्तर - फ्लॅट नं. ०६ विंग ०८, दक्षिण - ॲप्रोच. | 914,929 |
| 6 | महेश शेषराव आघाव, कल्पना शेषराव आघाव | रो हाऊस - आरएच नं. ८६, ब्लॉक/ बिल्डिंग नं. - गॅट नं. १९७/१, ब्लॉक/ बिल्डिंगचे नाव - सारा सह्याद्री पार्क, मौजे वैजापूर, ता. व जि. औरंगाबाद, सारा सह्याद्री पार्क, गट नं. १९३/ १/ १९४/ १/१, १९७/ १, ता. वैजापूर, औरंगाबाद-४२३७०१, महाराष्ट्र. पुढीलप्रमाणे सिमित : पूर्व - रो हाऊस नं. ११५, पश्चिम - ९.०० मी. रुंद रोड, उत्तर - रो हाऊस नं. ८७, दक्षिण - रो हाऊस नं. ८५. | 1,561,523 |
| 7 | माया रवींद्र नन्नावरे, संजय सुप्डू शिर्साळे | हाऊस - ब्लॉक नं. २, ब्लॉक/ बिल्डिंग नं. मधली बाजू, प्लॉट नं. ११, गॅट नं. १२३/४, मौजे पिंप्राला शिवार, जळगाव, माया नन्नावरे, प्लॉट नं. ११, गॅट नं. १२३/४, हरी विठ्ठल एनजीआरच्या मागे, मौजे पिंप्राला शिवार, जळगाव, माया नन्नावरे, जळगाव - ४२५००१. पुढीलप्रमाणे सिमित : पूर्व - ६ मी. रुंद रोड, पश्चिम - प्लॉट नं. ९, उत्तर - ब्लॉक नं. १ व नंतर गॅट नं. १२३/३, दक्षिण - ब्लॉक नं. ३ व ४ व नंतर प्लॉट नं. १२. | 1,056,860 |
| 8 | नईम ईस्माइल बेग, शहाझिया फरहिन नईम बेग | फ्लॅट - फ्लॅट नं. १, ब्लॉक/ बिल्डिंग नं. - सीटीएस नं. ९८०९, ब्लॉक/ बिल्डिंगचे नाव - ताबीर टॉवर-२, म्युनिसिपल नं. २-४-७१, शीट नं. ४६, मौझा - शाहबाजार, चल्ता नं. ३३, ताबीर टॉवर-२, चल्ता नं. ३३, शाहबाजार, औरंगाबाद - ४३१००१, महाराष्ट्र. पुढीलप्रमाणे सिमित : पूर्व - २० फू. रोड, पश्चिम - मांजलेमिया यांचे हाऊस, उत्तर - ८ फू. रोड, दक्षिण - फ्लॅट नं. २. | 1,578,413 |
| 9 | राहूल संजय नेटकर, जय संजय नेटकर, भारती संजय नेटकर | हाऊस - प्लॉट नं. २२, राहूल नेटकर एचएल, गॅट नं. ८८/ २/ ए /१, प्लॉट नं. २२, एसआरपीएफ कॉलनी, ॲट महिंद्रा, ता. व जि. धुळे, धुळे-४२४००२, महाराष्ट्र. पुढीलप्रमाणे सिमित : पूर्व - ६० मी. रुंद रोड, पश्चिम - प्लॉट नं. १५, उत्तर - प्लॉट नं. २३, दक्षिण - प्लॉट नं. २१. | 1,843,366 |
| 10 | राकेश अशोक पाटील, अशाबाई अशोक पाटील, अशोक धना पाटील | रो हाऊस - प्लॉट नं. ६६, ब्लॉक/ बिल्डिंग नं. - प्लॉट नं. ६६, ब्लॉक/ बिल्डिंगचे नाव - सर्व्हे नं. १०१/१/२ए/१ए/ बी१/ १०१/ १/ २ए१/बी६६, प्लॉट नं. ६६, सर्व्हे नं. १०१/१+२ए /१ए, लॅप पाटील पाचोरा, सर्व्हे नं. १०१/१+२ए/१ए+१बी, प्लॉट नं. ६६, कृष्णापुरी, ॲट - पाचोरा, ता. पाचोरा व जि. जळगाव - ४२४२०१, महाराष्ट्र. पुढीलप्रमाणे सिमित : पूर्व - ६ मी. रुंद रोड, पश्चिम - प्लॉट नं. ६७, उत्तर - ९ मी. रुंद रोड, दक्षिण - प्लॉट नं. ७१. | 840,105 |
| 11 | रितेश ईच्छाराम कोळी, ईच्छाराम तुकाराम कोळी, हिरकणबाई ईच्छाराम कोळी | हाऊस - प्लॉट नं. १०१, गॅट नं. ९२२, प्लॉट नं. १०१, रितेश, गॅट नं. ९२२, प्लॉट नं. १०१, वाल्मिक नगर, कोळी समाज कार्यालयाजवळ, ॲट - चोपडा, ता. चोपडा, जि. जळगाव, चोपडा, महाराष्ट्र-४२५१०७. पुढीलप्रमाणे सिमित : पूर्व - प्लॉट नं. १००, पश्चिम - प्लॉट नं. १०२, उत्तर - ६ मी. रुंद रोड, दक्षिण - प्लॉट नं. १०८. | 1,167,125 |

तुम्हास याद्वारा व्याज व किंमत यासह पूर्वोक्त नमूद केलेल्या रकमेचे या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या कालावधीच्या आत "होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड"ला प्रदान करण्यास फर्मावण्यात आले आहे, त्यास असमर्थ ठरल्यास त्याकरिता "होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड" ऋणको, गहाणकार व हमीदारांच्या सुरक्षित मत्तेचा ताबा घेवून समाविष्ट सर्व किंवा कोणतेही एक किंवा अधिकतम सुरक्षित मत्तेच्या अनुसार उक्त ॲक्टच्या तरतुदीअंतर्गत आवश्यक कारवाई करील. उक्त ॲक्टअंतर्गत "होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड"ला पुढील समाविष्ट अधिकार उपलब्ध आहे (१) सुरक्षित मत्ता सोडविण्याकरिता भाडेपट्टा, विक्रीचे अभिहस्तांकनद्वारा हस्तांतरणाबाबत हक्क समाविष्ट ऋणको/ हमीदारांच्या सुरक्षित मत्तेचा ताबा घेण्याचा अधिकार (२) "होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड" द्वारा सुरक्षित मत्तेबाबत कोणतेही हस्तांतरण आणि सुरक्षित मत्ता विकून वसूली करण्याचा आणि भाडेपट्टा, अभिहस्तांकन किंवा विक्रीद्वारा हस्तांतरणाकरिता हक्क समाविष्ट सुरक्षित मत्तेचे व्यवस्थापन हाती घेण्याचा व हस्तांतरित सुरक्षित मत्तेसंबंधित सर्व हक्क निहित आहेत.

उक्त ॲक्टच्या सेक्शन १३(१३)च्या तरतुदींच्या अनुसार, तुम्हास याद्वारा "होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड"च्या पूर्व-संमतीशिवाय "होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड"कडे तारणगहाण असलेल्या/ गहाणवट असलेल्या आणि वर संदर्भित केल्यानुसार कोणत्याही सुरक्षित मत्तेची विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य कोणत्याही तऱ्हेने (तुमच्या व्यवसायाच्या सामान्य रीतीखेरीज) हस्तांतरणाकरिता प्रतिबंधित करण्यात आले आहे.

**स्थळ :** औरंगाबाद, जळगाव, जालना, धुळे
**तारीख :** ०५.०९.२०२६

द्वारा स्वाक्षरीकृत : प्राधिकृत अधिकारी,
होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड

## संक्षिप्त

### ‘एसआयआर’ सुनावणीदरम्यान हिंसा

**इटानगर :** अरुणाचल प्रदेशच्या चांगलांग जिल्ह्यामध्ये शुक्रवारी मतदारयाद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) सुनावणीला शुक्रवारी हिंसक वळण लागल्यामुळे जिल्ह्यातील बोर्डसुमा येथे तणावाची परिस्थिती निर्माण झाली. त्यानंतर स्थानिक प्रशासनाने भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १६३अंतर्गत जमावबंदीचे आदेश लागू केले. बोर्डसुमाचे अतिरिक्त उपायुक्त सबादम तयांग यांनी माहिती दिली की, फॉर्म ६ आणि ७अंतर्गत दावे आणि हरकतींचा निपटारा करण्यासाठी आधी बिजॉयपूर येथे ३ सप्टेंबरला सुनावणी घेण्यात आली होती. मात्र, काही तरुणांनी व्यत्यय आणल्याने सुनावणीची तारीख बदलून ४ सप्टेंबर करण्यात आली. त्यावेळी ‘ऑल अरुणाचल प्रदेश स्टुडंट्स युनियन’ने केलेल्या निदर्शनांना हिंसक वळण लागले.

### जम्मू-काश्मीरमध्ये एक दहशतवादी ठार

**श्रीनगर :** जम्मू आणि काश्मीरच्या बडगाम जिल्ह्यातील जंगल भागात लष्कर आणि जम्मू-काश्मीर पोलिसांनी केलेल्या संयुक्त कारवाईमध्ये एक दहशतवादी ठार झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी शुक्रवारी दिली. पुलवामा जिल्ह्यातील पाखेरपोरा येथून बडगाम जिल्ह्यामधील युसमार्गकडे संशयित दहशतवाद्यांची हालचाल होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर ही संयुक्त मोहीम आखण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. श्रीनगरस्थित चिनार कोअरने एक्सवर पोस्ट करून याबाबत माहिती दिली. ही कारवाई संपलेली नसून संशयित दहशतवाद्यांचा शोध सुरू आहे.

### बलुचिस्तानमध्ये १२ अतिरेकी ठार

**कराची :** पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतात सुरक्षा दलांनी केलेल्या कारवाईत १२ बलुच अतिरेकी ठार झाले. लष्कराच्या ‘इंटर-सर्व्हिसेस पब्लिक रिलेशन्स’ने दिलेल्या माहितीनुसार, कलात जिल्ह्यात बुधवारी गुप्त माहितीच्या आधारे सुरक्षा दलांनी कारवाई करत अतिरेक्यांचे ठाणे उद्ध्वस्त केले. या मोहिमेदरम्यान १२ आतिरेकी मारले गेले असून, घटनास्थळावरून दारूगोळा आणि आयईडी स्फोटकांचा साठा नष्ट करण्यात आला आहे.

### तेलाच्या चोरीदरम्यान ३७ जणांचा मृत्यू

**अबुजा :** नायजेरियातील तेल उत्पादक ‘रिव्हर्स’ प्रांतात एका जहाजावरून बेकायदेशीरपणे कच्चे तेल चोरण्याच्या प्रयत्नात कमीत कमी ३७ लोकांचा गुदमरून मृत्यू झाला आहे. ‘युथ्स अँड एन्व्हायर्नमेंटल अॅडव्होकेसी सेंटर’ या संस्थेने दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी एका बेकायदेशीर टॅपिंग पॉईंटवरून अनेक जण एकाच वेळी आपल्या बोटींमध्ये तेल भरण्याचा प्रयत्न करत होते. या दरम्यान उच्च दाबाने बाहेर पडलेला विषारी वायू श्वासात गेल्यामुळे ३७ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर इतर अनेक जण अजूनही बेपत्ता आहेत.

# फुशारकी महागात

## ‘सीजेपी’ आंदोलनात मारहाणप्रकरणी भारद्वाज पोलिसांच्या ताब्यात

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** जंतर-मंतरवरील आंदोलनादरम्यान ‘कॉक्रोच जनता पार्टी’ची (सीजेपी) कार्यकर्ती निशू आझाद हिचे वडील संजय कुमार यांच्यावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी दिल्ली पोलिसांनी शुक्रवारी स्वतंत्र भारद्वाज याला ताब्यात घेतले. भारद्वाज हा उजव्या विचारसरणीचा समाजमाध्यम प्रभावक (इन्फ्लुएन्सर) असून त्याच्या अटकेच्या मागणीसाठी शुक्रवारी सकाळी ‘सीजेपी’ने संसद मार्ग पोलीस ठाण्यावर मोर्चा काढला. यादरम्यान भारद्वाज उत्तर प्रदेशच्या बुलंदशहर पळून गेला. मात्र, दिल्ली पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले.

संजय कुमार यांच्यावरील हल्ला गंभीर असल्याने त्याच्याविरोधात हत्येचा प्रयत्न तसेच, अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी ‘सीजेपी’ने केली. ती मान्य करण्यात आल्याचे, तसेच हत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यासाठी संजय कुमार यांची नव्याने वैद्यकीय तपासणी करण्याचे आश्वासन पोलिसांनी दिल्याचे ‘सीजेपी’च्या नेत्यांनी सांगितले. या प्रकरणी २३ जून रोजी गुन्हा दाखल झाला होता.

‘सीजेपी’चे सहसंयोजक सौरव दास आणि आशुतोष रांका यांच्या नेतृत्वाखाली सकाळी १० वाजता पटेल चौक येथून मोर्चा सुरू झाला. त्यात निशू आझाद, संजय कुमार, दिल्ली प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष अक्षय लाक्रा, आझाद समाज पक्षाचे प्रमुख चंद्रशेखर आझाद, पूर्णियाचे खासदार पप्पू यादव सहभागी झाले.

**दबावानंतर भारद्वाजचे घुमजाव**

नंतर, भारद्वाजने घुमजाव केले. पॉडकास्टमधील व्हायरल क्लिप बनावट असल्याचा दावा त्याने केला. मात्र, संजय कुमार यांच्यावर हल्ला केल्याचे त्याने नाकारले नाही. उलट, ‘स्वसंरक्षणासाठी कड्याने मारले’ अशी बचावात्मक भूमिका भारद्वाजने घेतली. एवढेच नव्हे, तर ‘पुन्हा अशाच प्रकारे मला घेरले आणि माझ्यावर हल्ल्याचा प्रयत्न झाला, तर मी पुन्हा कड्याने मारेन,’ असेही त्याने धमकावले.

दरम्यान, दिल्ली पोलिसांच्या म्हणण्यानुसार, संजय कुमार यांना किरकोळ दुखापत झाली होती. घटनास्थळावरून दोघांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी झाली आणि नोटिसा बजावण्यात आल्या. यात राजकीय हस्तक्षेप झाल्याचा आरोप पोलिसांनी फेटाळला.



### पॉडकास्टमध्ये फुशारकी आणि राजकीय दावे

आंदोलनादरम्यान संजय कुमार यांच्या डोक्याला हातातील कड्यामुळे दुखापत झाली होती. या प्रकरणात स्वतंत्र भारद्वाज आणि सूरज कुमार या दोघांना घटनास्थळावरून ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली होती. गेल्या काही दिवसांमध्ये पॉडकास्टमुळे हे प्रकरण पुन्हा चर्चेत आले. यूट्यूब पॉडकास्टमधील कथित क्लिपमध्ये भारद्वाजने संजय कुमार यांच्या डोक्यावर कड्याने मारल्याचा दावा केला. ‘डोक्याला ६० टाके पडले’, ‘संजय कुमार यांना रुग्णवाहिकेतून गंभीर अवस्थेत उपचारासाठी नेण्यात आले’ तसेच, ‘या प्रकरणात माझ्याविरोधात भादंसं-३०७ कलम (हत्येचा प्रयत्न) लागू होऊ शकते,’ अशी वक्तव्ये भारद्वाजने पोडकास्टमध्ये केल्याचे क्लिपमध्ये दिसते. विशेष म्हणजे, या प्रकरणात तुरुंगात गेलो नाही, राजकीय



संपर्कामुळे आपल्यावर कारवाई झाली नाही, असा दावाही भारद्वाजने केला. दिल्लीतील मंत्री कपिल मिश्रा हे मोठ्या भावासारखे आहेत. तसेच, केंद्रीय मंत्री चिराग पासवान आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशीही आपली जवळीक असल्याचा दावाही त्याने केल्याचे क्लिपमध्ये दिसते.

# अवकाशातून ‘इस्रो’ची नजर

## पहिलावहिला ‘इमेजिंग’ उपग्रह ‘जिओसिंक्रोनस’ कक्षेत स्थिर

**पीटीआय, श्रीहरिकोटा**

**भारतीय अवकाश** संशोधन संस्थेने (इस्रो) शुक्रवारी देशातील पहिला ‘इमेजिंग’ उपग्रह यशस्वीपणे अवकाशात सोडून इतिहासात आपले नाव पुन्हा एकदा सुवर्णाक्षरात कोरले आहे. ‘इस्रो’ने ‘जीएसएलव्ही’ रॉकेटच्या सहाय्याने २३०० किलो वजनाचा उपग्रह अवकाशात यशस्वीपणे सोडून त्याला भू-समकालिक (जिओसिंक्रोनस) कक्षेत स्थिर केले. या वर्षातील ‘इस्रो’चे हे पहिले यश आहे.

या उड्डाणाची उलटगणती २७ तासांपासून सुरू झाली. सतीश धवन अवकाश केंद्रातून पहाटे २.५५ वाजता रॉकेटने उपग्रहासह उड्डाण केले. ‘जीएसएलव्ही’ रॉकेट तीन टप्प्याचे असून, ५१.७ मीटर लांबीचे आहे. यातील तिसरा टप्पा क्रायोजेनिक स्वरुपाचा आहे. उपग्रह रॉकेटच्या वरच्या बाजूला लावला होता. या मोहिमेचे संचालक थॉमस कुरिअन आणि प्रकल्प संचालक इम्तियाज अहमद होते.

‘इस्रो’चे प्रमुख व्ही नारायणन यांनी सांगितले, ‘जीएसएलव्ही’ची ही १९वी मोहीम आहे. ‘जीएसएलव्ही’मधून १५३६ किलो वजनाच्या उपग्रहाचे पहिले उड्डाण झाले होते. आज सर्वाधिक २३६७ किलो वजनाचा उपग्रह आपण सोडला. या कक्षेत उपग्रह कार्यान्वित झाल्यानंतर तो भारताचा ‘जिओ-ऑर्बिट’ कक्षेतील पहिलावहिला ‘इमेजिंग उपग्रह’ ठरेल.



गेल्या काही वर्षांमध्ये ‘इस्रो’च्या मोहिमांकडे सर्वसामान्यांचेही लक्ष असते. शुक्रवारी ‘जीएसएलव्ही-एफ१७’ रॉकेटचे प्रक्षेपण दुर्बिणीतून पाहण्याचा आनंद लुटणारी मुलगी.

### उड्डाणाची वैशिष्ट्ये

- ‘जीएसएलव्ही’ रॉकेटमधून नेण्यात आलेला ‘ईओएस-५’ उपग्रह आतापर्यंत रॉकेटने नेलेल्या उपग्रहांच्या तुलनेत सर्वाधिक म्हणजे २३०० किलो वजनाचा.
- ‘ईओएस-०५’ उपग्रहाला अवकाशात सोडल्यानंतर १८ मिनिटांनी ‘सब-जिओसिंक्रोनस ट्रान्स्फर’ कक्षेत यशस्वीपणे सोडण्यात आले.
- अनेक पृथ्वी निरीक्षण उपग्रह कमी उंचावरील भूस्थिर कक्षेत राहून काम करतात. मात्र, ईओएस-५ उपग्रह अधिक उंचीवरून, सुमारे ३६ हजार किलोमीटर उंचीवरील ‘जिओसिंक्रोनस’ कक्षेतून काम करील. पृथ्वीच्या फिरण्याचा आणि उपग्रहाचा वेग सारखा असेल.
- यापूर्वीच्या काही मोहिमांमध्ये आलेल्या अपयशानंतर आलेल्या या यशामुळे शास्त्रज्ञांना आनंद.
- हा उपग्रह म्हणजे ‘आकाशातील भारताचा डोळा’ असल्याचे वर्णन एका वरिष्ठ शास्त्रज्ञाने केले. या उपग्रहामुळे एखाद्या ठिकाणची प्रत्यक्ष स्थितीतील छायाचित्रे आपल्याला मिळणार असून, त्यामुळे शेती, संकट व्यवस्थापनाच्या क्षेत्रात मदत होणार आहे.

देशाच्या अवकाश कार्यक्रमांसाठी ही सर्वांत मोठी उपलब्धी आहे. ‘जिओ सिंक्रोनस कक्षे’त असलेला ‘ईओएस’ हा पहिलाच उपग्रह आहे. तेथून हा उपग्रह देशासाठी काम करील. येत्या काही दिवसांत उपग्रहाला कक्षेत अधिक अचूकपणे स्थिर केले जाईल. ‘इस्रो’ आणि ‘इस्रो’बरोबर भागीदारी असलेल्या उद्योगांचे हे एकत्रित यश आहे.
**– व्ही. नारायणन,** ‘इस्रो’चे प्रमुख

# नऊ दिवसांनी दोघांची सुटका

## जलविद्युत प्रकल्पांतील अन्य कर्मचाऱ्यांना बाहेर काढण्याचे प्रयत्न

**वृत्तसंस्था, काठमांडू, बीजिंग**

**नेपाळमध्ये भीषण** पुराने थैमान घातल्यानंतर नऊ दिवसांनी सकारात्मक घटना घडली आहे. पूरग्रस्त त्रिशूली नदीवरील ‘अपर त्रिशूली ३-अ’ जलविद्युत केंद्राच्या बोगद्यात अडकलेल्या दोघांना सुखरूप बाहेर काढण्यात बचाव पथकाला शुक्रवारी यश आले. संजय साह आणि कबीर महाजन अशी त्यांची नावे आहेत. पुराचा फटका बसलेल्या विविध जलविद्युत प्रकल्पांमध्ये किमान ९०० जण अडकले असल्याचा अंदाज असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

बोगद्यांमध्ये अडकलेले जिवंत असण्याची शक्यता अंधूक होत असल्याची भीती व्यक्त केली जात होती. मात्र, गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अथक प्रयत्नांना यश आले आणि दोघांची सुटका करण्यात आली.

सुटका करण्यात आलेल्या संजय साह आणि कबीर महार्जन यांना बाहेर काढल्यानंतर त्यांची प्राथमिक तपासणी करण्यात आणि त्यानंतर त्यांना काठमांडूच्या लष्करी रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात भरती करण्यात आले. त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सूत्रांनी सांगितले. महार्जन यांना हातापायाची हालचाल करता येत नाही, पण साह यांच्या इजा गंभीर नाहीत.

दरम्यान, नेपाळमध्ये मृतांची संख्या १,३००पेक्षा जास्त झाली असून बेपत्ता लोकांची संख्याही वाढून किमान ५,६०० इतकी झाली आहे. तर तिबेटमध्ये ३१ मृत असून ५३२ जण बेपत्ता असल्याचे चीनच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.



मी नियंत्रण कक्षात होतो, त्यामुळे इतर सर्वांचे आयुष्य वाचवणे ही माझी जबाबदारी होती. इतका मोठा अपघात झाल्यानंतर पळून जाण्याची ती वेळ नव्हती. या काळात मी मंत्रजप करण्यात वेळ घालवला.
**– संजय साह,** सुटका करण्यात आलेला कर्मचारी

### २.५६ अब्ज डॉलरचे नुकसान

पुरामुळे नेपाळमध्ये मालमत्ता, घरे आणि पायाभूत सुविधांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नेपाळच्या नॅशनल डिझास्टर रिस्क रिडक्शन अँड मॅनेजमेंट ऑथॉरिटीचे प्रमुख धर्मराज उप्रेती यांनी नुकसानाचा आकडा ३८७.५ अब्ज नेपाळी रुपये (२.५६ अब्ज डॉलर) इतका असल्याचा अंदाज व्यक्त केला.

### उत्तर प्रदेशात पूरस्थिती, बिहारमध्ये पुराचा धोका



वैशाली, बिहार

**लखनऊ/ पाटणा :** उत्तर प्रदेशच्या २६ जिल्ह्यांना पुराचा फटका बसला असून आतापर्यंत तेथील १७ हजार ५००पेक्षा जास्त लोकांची सुखरूप सुटका करण्यात आली आहे. त्याचवेळी कोणतीही जीवितहानी किंवा पशूहानी झालेली नाही, अशी माहिती राज्य सरकारने शुक्रवारी दिली. तर, बिहारमध्ये नद्यांच्या पाण्याची पातळी वाढल्याने पाच जिल्ह्यांना पुराचा धोका निर्माण झाला आहे. नेपाळ आणि झारखंडमध्ये सतत पडणाऱ्या पावसाचा बिहारमध्येही परिणाम झाला असून राज्यातील अनेक नद्यांच्या पाण्याची पातळी वाढली आहे. त्यामुळे बिहारमधील अनेक जिल्ह्यांना पुराचा धोका निर्माण झाला आहे. गंगा, गंडक, कोसी, बुढी गंडक, बागमती, पुनपुन आणि घागरा या नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे.

# सोनिया गांधींच्या आत्मचरित्राचे नवे प्रकाशक

## ‘पेंग्विन’च्या माघारीनंतर ‘हार्पर कॉलिन्स’कडे जबाबदारी

**पीटीआय, नवी दिल्ली**

**काँग्रेसच्या ज्येष्ठ** नेत्या सोनिया गांधी यांचे बहुप्रतीक्षित आत्मचरित्र ‘बिलाँगिंग - अ जर्नी ऑफ लव्ह’ हे आत्मचरित्रात्मक पुस्तक आपण प्रकाशित करणार असल्याची घोषणा हार्पर कॉलिन्सने शुक्रवारी केली. हे पुस्तक भारतात १० नोव्हेंबरला प्रकाशित होणार आहे. त्यामुळे पेंग्विन रँडम हाऊस इंडियाने भारतातील प्रकाशनातून माघार घेतल्यामुळे निर्माण झालेली अनिश्चितता संपली आहे. दरम्यान, आंतरराष्ट्रीय आवृत्ती आधी ठरल्याप्रमाणे पेंग्विन रँडम हाऊसच्या अल्फ्रेड ए. नॉफ यांच्या प्रकाशन संस्थेमार्फत प्रकाशित होणार आहे.




पेंग्विन रँडम हाऊस इंडिया (पीआरएचआय) हे आत्मचरित्र प्रकाशित करणार होते. मात्र, हस्तलिखितातील काही भागांमध्ये संपादकीय बदल करण्यावरून लेखकाच्या प्रतिनिधींशी मतभेद झाले. त्यावर उपाय न निघाल्याने पेंग्विन रँडम हाऊस इंडियाने पुस्तक प्रकाशित करण्यापासून माघार घेतली.

या प्रकरणावरून राजकीय वर्तुळातही वाद निर्माण झाला होता. काही काँग्रेस नेत्यांनी सरकारचा दबाव आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा मुद्दा उपस्थित केला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ तसेच मोदी सरकारच्या काळात चीनने भारतीय भूभागावर मिळवलेल्या कथित ताब्याशी संबंधित काही भाग पुस्तकातून वगळण्यासाठी पेंग्विनवर दबाव आणला गेल्याचा आरोपही करण्यात आला होता.

मात्र, ‘पेंग्विन’ने गेल्या आठवड्यात ‘पीटीआय’ला दिलेल्या विशेष निवेदनात कोणताही बाह्य दबाव नसल्याचे स्पष्ट केले होते. पुस्तक प्रकाशित करण्यासाठी कंपनी उत्सुक होती आणि ते मिळवण्यासाठी बराच प्रयत्न केला होता, असेही कंपनीने म्हटले होते. काही बदलांवर लेखकाच्या प्रतिनिधींशी सहमती झाली, तर काही मुद्द्यांवर लेखकाची भूमिका मान्य करण्यात आली. मात्र, एका विशिष्ट मुद्द्यावर अंतिम सहमती होऊ शकली नाही, असे ‘पीआरएचआय’ने स्पष्ट केले होते. गोपनीयतेच्या अटींमुळे या मुद्द्याचे स्वरूप जाहीर केले गेले नाही.

# सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांकडे दुर्लक्ष!

## न्यायिक अधिकाऱ्यांच्या चौकशीचे आदेश

**पीटीआय, नवी दिल्ली**

**सर्वोच्च न्यायालयाने** अहवाल सादर करण्याबाबत तीन वेळा दिलेले निर्देश न पाळल्याने अलाहाबाद उच्च न्यायालयातील संबंधित न्यायिक अधिकाऱ्यांची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

मालमत्तेच्या वादातून दाखल झालेल्या एका प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयातील न्या. प्रशांत कुमार मिश्रा आणि न्या. श्री चंद्रशेखर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण एक वर्षाच्या आत निकाली काढावे, असे निर्देश फेब्रुवारी २०२०मध्ये दिले होते.

मात्र जानेवारीत झालेल्या सुनावणीदरम्यान याप्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही न झाल्याचे खंडपीठाच्या निदर्शनास आले. मुदतवाढ देऊनही उच्च न्यायालयाने निर्देशांचे पालन केले नाही. अखेर मे महिन्यात अहवाल सादर करण्यात आला. हे प्रकरण पुढील सहा महिन्यांत निकाली काढण्याचे निर्देश खंडपीठाने दिले. मात्र, उच्च न्यायालयाने अद्याप त्याचेही पालन न केल्याने आता सर्वोच्च न्यायालयाने संबंधित न्यायिक अधिकाऱ्यांच्या चौकशीचे आदेश अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निबंधकांना दिले आहेत.

# अन्नधान्याच्या किमतीत ऑगस्टमध्ये विक्रमी वाढ

## संयुक्त राष्ट्रांच्या अहवालातील माहिती

**रॉयटर्स, पॅरिस**

**जागतिक बाजारपेठेत** अन्नधान्याच्या किमतीत विक्रमी वाढ झाली असून त्यात २०२२ नंतर प्रथमच ऑगस्टमध्ये सर्वाधिक दराची नोंद झाली आहे.

प्रतिकूल हवामानामुळे घटलेले उत्पादन; तसेच युक्रेन, इराणमधील युद्धामुळे वितरण साखळीवर झालेला विपरीत परिमाण ही याची प्रमुख कारण असल्याचे संयुक्त राष्ट्रांच्या अन्न व कृषी संघटनेने (एफएओ) एका अहवालात स्पष्ट केले आहे. यामध्ये धान्यांची तीन वर्षातील किंमत, तर साखरेचे एक वर्षातील सर्वाधिक दर या महिन्यात नोंदले गेले.

आंतरराष्ट्रीय बाजारातील उलाढालीचा अभ्यास करून ‘एफएओ’मार्फत दर महिन्याला अन्नधान्याच्या दराचा निर्देशांक तयार केला जातो. जुलै महिन्यात हा निर्देशांक १३०.३ नोंदवण्यात आला होता. यंदा त्याने १३३.३पर्यंत उसळी घेतली. यापूर्वी नोव्हेंबर २०२२मध्ये इतकी नोंद झाली होती. अन्नधान्य दराच्या निर्देशांकात दिवसेंदिवस होत असलेली ही वाढ धोक्याची घंटा ठरत आहे, असे ‘एफएओ’चे प्रमुख अर्थतज्ज्ञ मॅक्झिमो तोरेरो यांनी म्हटले आहे. ऑगस्टमध्ये धान्याचे दर २.२ टक्के, तर वनस्पतीजन्य तेल ०.६ टक्क्यांनी वाढले आहे.

## दिनदर्शिका

**शनिवार, ५ सप्टेंबर २०२६**
भारतीय सौर १३ भाद्रपद शके १९४८
मिती श्रावण कृष्णपक्ष
नवमी २१:५४ पर्यंत.
नक्षत्र :मृग २१:३१ पर्यंत.
चंद्र ; वृषभ १०:१९ पर्यंत.
सूर्योदय - ०६ : २६
सूर्यास्त - १८: ४९

- **मेष :** पाहुणे मंडळी येतील.
- **वृषभ :** आर्थिक लाभ होईल.
- **मिथुन :** दुपारनंतर दिवस शुभ.
- **कर्क :** धाडसी निर्णय टाळा.
- **सिंह :** बक्षीस मिळेल.
- **कन्या :** व्यावसायिक बदल होईल.
- **तूळ :** प्रश्न मार्गी लागतील.
- **वृश्चिक :** मर्यादा ओलांडू नका.
- **धनू :** सहकार्य मिळेल.
- **मकर :** स्वतःसाठी वेळ द्या.
- **कुंभ :** व्यक्तिमत्त्व खुलेल.
- **मीन :** विकास घडेल.

**शुभ राशी : सिंह, तूळ**

## शब्दकोडे- ८४

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ■ | ४ | ५ | ६ | | ७ | |
| ८ | | | ■ | ९ | | | ■ | | ■ |
| १० | | | ११ | ■ | ■ | १२ | १३ | | |
| | ■ | १४ | | १५ | ■ | १६ | | | ■ |
| १७ | १८ | | ■ | १९ | २० | ■ | | ■ | २१ |
| ■ | | ■ | २२ | | | २३ | ■ | २४ | |
| २५ | | २६ | ■ | | ■ | २७ | २८ | | |
| | ■ | २९ | | ■ | ३० | | | | ■ |
| ३१ | | ■ | ■ | ३२ | ■ | ३३ | | ■ | ३४ |
| | ■ | ३५ | | | | | ■ | ३६ | |

**आडवे शब्द :**
(१) थाटमाट, दिखावा (४) कोणता तरी (मनुष्य, बाब, वस्तू)
(८) विहिरीवरून पाणी काढायचे साधन (९) वस्त्र
(१०) एकदम (खाली बसणे) (१२) ज्याला विशिष्ट मान मिळाला आहे असा
(१४) सामसूम, शांतता (१६) शहर (१७) पत्र्याने आच्छादलेले लहान दुकान
(१९) मार्ग, रस्ता (२२) **XXXX** होणे म्हणजे गर्दी होणे
(२४) गळ्यातला एक दागिना (२५) अधिक, जास्त, अजून
(२७) पळ काढणे (२९) रुधिर (३०) कवी मोरोपंतांची काव्यरचना
(३१) कडा, भुजा (३३) मोजण्याजोगा
(३५) एक फळ (३६) धीर, साहस

**उभे शब्द :**
(१) विपुल, अतोनात (२) प्रातःकाळ (३) मितव्ययी (४) संसार
(५) रोगांपासून बचाव करण्यासाठी टोचून घेण्याचे औषध (६) रागरंग, अनुकूल परिस्थिती (७) त्वरेने (११) **XX** चा पाढा म्हणजे नाही नाही म्हणणे
(१३) रोख पैसा (१५) नीटनेटकेपणा (१८) खोगीर (२०) पक्ष्यांचा समूह
(२१) काजळ (२३) शाई टिपून घेणारा कागद (२४) एक सुगंधी फूल
(२५) अचानक उद्भवलेली संकटाची परिस्थिती (२६) दुधाचा एक गोड पदार्थ
(२८) सौंदर्य (३२) एक पक्षी (३४) काम

- मनाली रानडे
manalikode26@gmail.com

## सुडोकू - ८४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | | | | | २ | | ८ | |
| | | | ३ | | | | | ४ |
| | | ५ | | | | | ९ | |
| | | ९ | ७ | | | | ६ | |
| | | ४ | | | | ८ | | |
| | ३ | | | | ९ | ५ | | |
| | ४ | | | | | ९ | | |
| ९ | | | | | ८ | | | |
| | २ | | ५ | | | | | ३ |

### सुडोकू - ८३ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ६ | ७ | ४ | १ | ३ | २ | ८ | ५ |
| ३ | ८ | २ | ७ | ५ | ९ | ६ | १ | ४ |
| १ | ५ | ४ | ६ | २ | ८ | ३ | ७ | ९ |
| ७ | १ | ६ | ९ | ३ | ४ | ८ | ५ | २ |
| २ | ९ | ५ | १ | ८ | ६ | ७ | ४ | ३ |
| ८ | ४ | ३ | २ | ७ | ५ | ९ | ६ | १ |
| ६ | २ | ८ | ३ | ४ | १ | ५ | ९ | ७ |
| ५ | ७ | १ | ८ | ९ | २ | ४ | ३ | ६ |
| ४ | ३ | ९ | ५ | ६ | ७ | १ | २ | ८ |

### शब्दकोडे - ८३ चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पो | र | स | व | दा | ■ | अ | ध्या | प | क |
| लो | ■ | मा | जी | ■ | उ | पा | स | ■ | म |
| ■ | आ | धा | र | ■ | स | र | ■ | ज | ल |
| शा | स | न | ■ | भा | ळ | ■ | क | मा | न |
| ■ | न | ■ | ता | न | ■ | त | र | ■ | य |
| पो | ■ | सा | ठा | ■ | प | र | ■ | सा | न |
| ट | व | का | ■ | खा | र | ट | ■ | इ | ■ |
| गी | र | ■ | कि | ■ | वा | ■ | क | ■ | वा |
| ■ | दा | ■ | मा | रू | न | मु | ट | कू | न |
| मा | न | ध | न | ■ | गी | ■ | क | स | र |

# ‘डीजे’बाबत सर्वसमावेशक तोडगा

## गणेशोत्सव परंपरा पाळूनच साजरा करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आवाहन

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** ‘आपले सण आणि उत्सव साजरे करताना ते जास्तीत जास्त पारंपरिक पद्धतीने साजरे व्हावेत. ‘डीजे’सारख्या काही पद्धती वर्षानुवर्षे सुरू आहेत. त्यांचे स्तोम लोकसहभागातून कमी करावे लागणार आहे. तोपर्यंत पारंपरिक पद्धतीने आणि कमीत कमी ध्वनिप्रदूषण करून गणेशोत्सव साजरा करावा,’ अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी पुण्यातील एका कार्यक्रमात मांडली.

फडणवीस यांनी गणेशोत्सव आणि त्यातील ध्वनिप्रदूषणाबाबत भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, ‘सण आणि उत्सव अधिकाधिक पारंपरिक पद्धतीने साजरे व्हायला हवेत. मात्र, या उत्सवांमध्ये वर्षानुवर्षे काही पद्धती रूढ झाल्या. अशा पद्धती बंद करताना केवळ कायद्याचा बडगा उगारणे योग्य ठरत नाही. त्यासाठी लोकांना विश्वासात घेऊन आणि त्यांच्याशी चर्चा करून मार्ग काढावा लागतो. त्या दृष्टीने पुण्याच्या पोलीस आयुक्तांनी गणेशोत्सवातील सर्व घटकांशी चर्चा केली आहे. पारंपरिक शैली पद्धतींना गोष्टींवर एकमत झाले आहे. त्यातून योग्य तोडगा निघेल.’

**आगामी काळात डीजेचे स्तोम कमी होईल किंवा संपेल**

‘डीजेमुळे लोकांना खूप त्रास होतो. त्यातून भूकंप झाल्यासारखा आवाज निर्माण होतो. अशा गोष्टी घडू नयेत, यावर सर्वांचेच एकमत आहे. त्यामुळे पुण्यात गणेशोत्सव पारंपरिक पद्धतीने साजरा करण्याच्या दिशेने पाऊल टाकण्यात आले आहे. आगामी काळात डीजेचे स्तोम कमी झालेले असेल किंवा ते संपलेले दिसेल. गणेशोत्सव पारंपरिक पद्धतीने किंवा कमीत कमी ध्वनिप्रदूषणासह साजरा करावा लागेल,’ असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.



### नागपुरात डीजेबंदीवरून भाजपविरुद्ध भाजप

#### माजी आमदार, भाजप शहराध्यक्ष पोलीस आयुक्तांकडे

**नागपूर :** भाजपचे माजी आमदार संदीप जोशी यांनी शुक्रवारी डीजे बंदी केवळ दोन महिन्यांसाठी नव्हे तर कायमस्वरूपी करावी, अशा मागणीचे निवेदन पोलीस आयुक्त व महापालिका आयुक्तांना दिले. जोशी यांच्यानंतर भाजपचे शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनीही पोलीस आयुक्तांना निवेदन देत बंदीच्या निर्णयावर पुनर्विचार करण्याची मागणी केली. त्यामुळे शहरात भाजपविरुद्ध भाजप असे चित्र निर्माण झाले आहे.

डीजेबंदीवरून दुसऱ्या दिवशीही गुऱ्हाळ सुरूच आहे. पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी डीजेवर बंदीचे आदेश काढले. यावरून माजी आमदार संदीप जोशी यांनी आज डॉक्टर, व्यावसायिक, स्वयंसेवी संस्थाच्या पदाधिकाऱ्यांसह पोलीस आयुक्तांची भेट घेतली. जोशी यांच्या निवेदनानंतर भाजपचे शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी पोलीस आयुक्तांना शहरात

**जोशींबरोबर स्वयंसेवी संस्था**

माजी आमदार संदीप जोशी यांनीही शुक्रवारी पोलीस आयुक्तांना निवेदन देऊन डीजेवर कायमस्वरूपी बंदीची मागणी केली. त्यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळात स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींचा समावेश होता. यात ‘कॅग’चे विवेक रानडे, टॅक्सपेअर असोसिएशनचे तेजिंदरसिंग रेणू, आयएमएच्या अध्यक्षा डॉ. मंजूषा गिरी, नेत्रतज्ज्ञ डॉ. गोपाल अरोरा यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी आणि सदस्य सहभागी झाले होते.

डीजेबंदीच्या निर्णयाचा पुनर्विचार करावा, अशा मागणीचे निवेदन दिले. याशिवाय भाजप आमदार प्रवीण दटके यांनी फक्त हिंदूंच्या सणांना त्रास देण्यासाठी हे परिपत्रक काढले असेल, तर ते आम्ही खपवून घेणार नाही, असा इशारा दिला. आदेश दोन महिन्यांपूर्वीच काढायला हवे होते, असे भाजपचे आमदार कृष्णा खोपडे म्हणाले.

### ध्वनिमर्यादा उल्लंघनाबद्दल मंडळ पदाधिकाऱ्यांना शिक्षा

● **पुणे :** मिरवणुकीत उच्च क्षमतेची ध्वनिक्षेपक यंत्रणा वापरून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी लोहियानगरमधील एका गणेश मंडळाच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि ध्वनिक्षेपक यंत्रणा पुरविणाऱ्या व्यावसायिकाला न्यायालयाने दोषी ठरवून शिक्षा सुनावली. तिघांना दंड ठोठावण्यात आला असून, ध्वनिक्षेपक यंत्रणाही जप्त करण्यात आली.

● अल मदिना यंग बॉइज यंग सर्कलचे अध्यक्ष वाहिद कासीम मणियार, उपाध्यक्ष जावेद मजीद शेख (दोघे रा. लोहियानगर, घोरपडे पेठ) आणि ध्वनिक्षेपक यंत्रणा पुरविणारे व्यावसायिक प्रकाश कृष्णात अस्वले (रा. सावर्डे बुद्रुक, ता. कागल, जि. कोल्हापूर) अशी दोषी ठरविण्यात आलेल्यांची नावे आहेत.

● गेल्या २६ ऑगस्टला ईद-ए-मिलादनिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीत ध्वनिक्षेपक यंत्रणेच्या वापराबाबत पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी आदेश जारी केले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केल्यास कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला होता.

### मुंबईत ‘डीजे’ वापरावर २०१५ पासून बंदीच!

#### आवाजाची पातळी मर्यादित ठेवण्याचे आवाहन

**मुंबई :** पुण्यात गणेशोत्सवाच्या मिरवणुकीत ‘डीजे’च्या वापरावरून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर मुंबईत गणेशोत्सव मंडळांनीच आवाजाची पातळी मर्यादित ठेवण्याचे मान्य केले आहे. आवाजाची निर्धारित मर्यादा ओलांडल्यास पोलिसांकडून कारवाई केली जाईल, याची मंडळांना कल्पना देण्यात आली आहे. मुंबईत ‘डीजे’चा वापरावर २०१५ पासूनच बंदी आहे, असे पोलीस आयुक्त देवेन भारती यांनी सांगितले.

पत्रकारांशी संवाद साधताना भारती यांनी सांगितले की, ‘डीजे’च्या वापरावर बंदी आहेच. याशिवाय ध्वनीची निर्धारित डेसिबल मर्यादा ओलांडण्यासही मनाई आहे. ‘लेझर लाइट’च्या वापरावरही बंदी आहे. उत्सवाच्या काळात त्याचा वापर होऊ नये, याची पोलीस दक्षता घेतात. असा प्रकार आढळल्यास तात्काळ कारवाई केली जाते.

मुंबईतील गणेशोत्सवाच्या मिरवणुकांमध्ये प्रामुख्याने पारंपरिक वाद्यांचा वापर केला जातो. उत्सवाच्या काळात ‘डीजे’चा वापर केला जात नाही.

### ‘डीजे’, ‘लेझर लाइट’वर सांगलीत बंदी

**सांगली :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मिरवणुकांमध्ये ‘डीजे’ आणि ‘लेझर लाइट’च्या वापरावर जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यात बंदी घालण्यात आली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांनी याबाबतचे आदेश लागू केले आहेत. मिरवणुकांमध्ये विविध गणेश मंडळांकडून ‘डीजे’ आणि ‘लेझर लाइट’चा वापर केला जातो. ‘डीजे’च्या प्रचंड आवाजामुळे तसेच ‘लेझर लाइट’च्या प्रखर प्रकाशामुळे मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि विद्यार्थ्यांना त्रास होतो, असे पोलिसांनी प्रसिद्धिपत्रकात म्हटले आहे.

---

### सणासुदीच्या काळात राज्यभर रेशन वितरण बंद

**नागपूर :** ऐन सणासुदीत राज्यातील स्वस्त धान्य दुकानचालकांनी ७ सप्टेंबरला धान्य वितरण बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे, प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेला ‘अन्न दिन’ पाळून लाभार्थ्यांना धान्य उपलब्ध करून देण्यासाठी दुकाने सुरू ठेवली जातात. मात्र, याच दिवशी राज्यभर ई-पॉस यंत्रे बंद राहतील. ‘ऑल महाराष्ट्र फेअर प्राईज शॉपकीपर्स फेडरेशन’ने या राज्यव्यापी आंदोलनाची हाक दिली आहे. ई-पॉस यंत्रांचे इंटरनेट आणि सर्व्हरमध्ये गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने अडचणी येत असल्याचा दुकानदारांचा दावा आहे. समस्या सुटत नसल्याने आंदोलनात सहभागी होणार असल्याची माहिती नागपूर रेशन दुकानदार संघाचे अध्यक्ष सुभाष मुसळे आणि सचिव रितेश अग्रवाल यांनी दिली.

### मंत्रालय आणि विधानभवनात ‘कालायन’!

**मुंबई :** प्रमाण वेळेबरोबरच सूर्योदय-सूर्यास्ताची वेळ, ग्रहांची स्थिती व हालचाल, पंचांग आणि विविध दिनविशेष दाखविणारे ‘कालायन’ हे विशेष समयदर्शक उपकरण विधानभवनात आणि मंत्रालयात बसविण्यात येणार आहे.

सांस्कृतिक कार्य विभागाने या दोन उपकरणांच्या खरेदीसाठी राज्य सरकारकडे पाठविलेल्या १० लाख ९७ हजार ४०० रुपयांच्या खर्चाला मान्यता देण्यात आली आहे. पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाच्या अखत्यारीतील १४ वस्तुसंग्रहालयांमध्येही ‘कालायन’ बसविण्याचा प्रस्ताव आहे.यात प्रमाण वेळ आणि जीपीएस वेळ, सूर्योदय-सूर्यास्ताची वेळ, ग्रहांची स्थिती व हालचाल, पंचांग, दिनविशेष दाखविण्याची सुविधा आहे.

रविवार, ६ सप्टेंबर २०२६

**लोकरंग**

### तीन ध्रुवांचा तमाशा



उत्तर आणि दक्षिण ध्रुवानंतर सर्वाधिक बर्फ आणि हिमनद्या हिमालयात आढळतात. या ‘तिसऱ्या ध्रुवा’च्या पल्ल्यात अफगाणिस्तान, बांगलादेश, भूतान, चीन, भारत, म्यानमार, नेपाळ आणि पाकिस्तान ही राष्ट्रे येतात. पर्यावरण बदलांमुळे येऊ शकणाऱ्या नैसर्गिक आपत्ती सोडविण्याबाबत या आठ देशांत कागदी करार चार दशकांपूर्वीपासून दिसतो, पण कृती काहीच होत नाही. गेल्या आठवड्यात नेपाळमध्ये झालेल्या निसर्गकोपाने या देशांनी बदलायची गरज स्पष्ट केलीय. त्याकडे दुर्लक्ष झाल्यास हवामान बदल सुडाच्या पवित्र्यात सज्ज आहेच...

▌अतुल देऊळगावकर

### मारहाणीमुळे निश्चय ढळणार नाही

#### लढा सुरू ठेवण्याचा विद्यानंद बापटांचा निर्धार

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** ‘मारहाणीमुळे माझा निश्चय ढळणार नाही. मला मारहाण करणाऱ्यांना मी गांभीर्याने घेत नाही. मी मांडत असलेल्या मुद्द्यांचा तार्किक प्रतिवाद करण्याऐवजी टीका आणि मारहाण केली जात आहे. ध्वनिप्रदूषणविरोधातील माझा लढा सुरूच राहणार आहे,’ असे विद्यानंद बापट यांनी स्पष्ट केले.



ध्वनिप्रदूषणविरोधातील माझा लढा सुरूच राहणार आहे. पुणे शहराची ओळख सांस्कृतिक राजधानी अशी आहे. मात्र, मत मांडणाऱ्या नागरिकाला मारहाण केली जाते. ही कोणती संस्कृती?’ असा प्रश्न बापट यांनी उपस्थित केला.

**बापट यांच्या भाषेचे मुख्यमंत्र्यांकडून कौतुक**

‘विद्यानंद बापट यांच्या मराठी भाषेचे कौतुक आहे. ते सुंदर आणि शुद्ध मराठी बोलतात. मराठी भाषेच्या शुद्धतेचा नमुना या निमित्ताने पाहायला मिळतो. त्यांच्यासारखी मराठी बोलण्यासाठी मला आता शिकवणीच लावावी लागेल. आता अपेक्षा एवढीच आहे की, त्यांनी विचार मांडताना त्याचा इतरांना फार त्रास होणार नाही , याकडे लक्ष द्यावे,’ अशी टिप्पणी फडणवीस यांनी केली.

**मोर्चात सहभागी होणार**

ध्वनिप्रदूषणविरोधात रविवारी (६ सप्टेंबर) डेक्कन जिमखाना येथील नामदार गोपाळ कृष्ण गोखले चौकातून काढण्यात येणाऱ्या मोर्चात सहभागी होणार आहे, असे विद्यानंद बापट यांनी सांगितले.

---

### ‘डेक्कन’मध्ये माळढोकसाठी १६ संवर्धन क्षेत्रे निश्चित

(पान १ वरून) केला. डेक्कन भूप्रदेश हा तुलनेने कमी पर्जन्यमान असलेला निमशुष्क प्रदेश आहे. त्यामुळे माळढोकसाठी येथील गवताळ प्रदेश अनुकूल मानला जातो. मात्र, गेल्या काही दशकांत जमिनीच्या वापरात वेगाने झालेले बदल, गवताळ प्रदेशांचे होणारे रूपांतर आणि पारंपरिक शेती पद्धतींचा ऱ्हास यामुळे महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातील माळढोकची दक्षिणेकडील संख्या झपाट्याने घटली आहे.

अभ्यासातून माळढोकच्या अधिवासाची उपयुक्तता ठरवण्याऱ्या घटकांमध्ये उष्ण ऋतूतील पर्जन्यमानाचा वाटा ४० टक्क्यांहून अधिक असल्याचे आढळले. मानवी वस्ती आणि शेतीप्रधान प्रदेशात माळढोकचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी अधिवास पुनर्संचयित करणे, पारंपरिक शेती पद्धतींना चालना देणे आणि गवताळ प्रदेशांची पर्यावरणीय अखंडता कायम ठेवणे आवश्यक असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**पारंपरिक शेतीचे पुनरुज्जीवन**

निश्चित केलेल्या १६ क्षेत्रांचे आकारमान १४४ ते ८,४९६ चौरस किलोमीटर इतके आहे. या क्षेत्रांमध्ये गवताळ प्रदेशांबरोबरच शेतीक्षेत्रांचाही समावेश आहे. त्यामुळे माळढोक संवर्धनासाठी केवळ संरक्षित क्षेत्रांवर अवलंबून न राहता पारंपरिक शेती पद्धतींचे पुनरुज्जीवन आणि उर्वरित गवताळ अधिवासांचे संरक्षण करण्याची गरज संशोधकांनी व्यक्त केली आहे.

### वित्त तंत्रज्ञानात मुंबई, पुणे आघाडीवर

#### देवेंद्र फडणवीस; देशातील ६१ टक्के गुंतवणूक मुंबईत

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** वित्ततंत्रज्ञान क्षेत्रात महाराष्ट्राने आपले वर्चस्व कायम ठेवले असून, यंदाच्या पहिल्या तिमाहीत मुंबईने बंगळुरूला मागे टाकले आहे. देशातील वित्ततंत्रज्ञान क्षेत्रातील एकूण गुंतवणुकीपैकी तब्बल ६१ टक्के गुंतवणूक मुंबईत झाली आहे. राज्यात या क्षेत्रात ९० कोटी डॉलरची गुंतवणूक झाली असून, वित्ततंत्रज्ञान नवउद्यमींच्या संख्येती ५९ टक्क्यांची वाढ झाली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी दिली.

‘मुंबई आणि पुणे देशातील वित्ततंत्रज्ञान परिसंस्थेत आघाडीवर आहेत. ही परिसंस्था आता नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर येथेही नेण्याची गरज आहे. लवकरच नागपूरमध्येही बजाज फिनसर्व्हची सेवा सुरू झालेली दिसेल,’ असे फडणवीस यांनी सांगितले.

‘बजाज फिनसर्व्ह’च्या मुख्यालयाच्या भूमिपूजन कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. या वेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, महापौर मंजूषा नागपुरे, ‘बजाज फिनसर्व्ह’चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक संजीव बजाज, बजाज फिनसर्व्हे सीएसआरच्या अध्यक्ष शेफाली बजाज, बजाज फायनान्सचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राजीव जैन, महापालिका आयुक्त नवल किशोर राम, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्यासह बजाज समूहातील पदाधिकारी आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

‘बजाज फिनसर्व्ह’चे पुण्यात उभारण्यात येणारे मुख्यालय आणि त्यातील सुविधा देशातील महत्त्वाची आणि शाश्वत व्यवस्था ठरणार आहे.



**पुण्याची वाहतूक वेगवान करण्याचा निर्धार**

पुण्यात वर्तुळाकार मार्गांबरोबरच भुयारी मार्गांचे जाळे निर्माण करण्यात येणार आहे. पुढील तीन ते चार वर्षांत पुण्याची ओळख वेगवान वाहतूक व्यवस्था असलेले शहर अशी बनेल, असा निर्धार फडणवीस यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र वित्त तंत्रज्ञान क्षेत्राची राजधानी बनला आहे. त्यामुळे आर्थिक व्यवहार आणि बँकिंग क्षेत्रात राज्य पुढे असून, आणखी पुढे नेण्यासाठी विशेष धोरण तयार केले आहे. विमा आणि डिजिटल कर्ज वितरण क्षेत्रात महाराष्ट्राने आपले वर्चस्व कायम ठेवावे, या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत.

**- देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

### निवडणुकांसाठी भाजपचे खालच्या पातळीवर डावपेच

#### उद्धव ठाकरे यांची टीका

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** ‘भाजप निवडणुका जिंकण्यासाठी अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन डावपेच खेळत आहे. मतदार याद्यांमध्ये फेरफार करायचे, बोगस नावे घुसवायची आणि त्याआधारे निवडणुका जिंकायच्या, असा कारभार सुरू आहे. एसआयआरमधून दोन कोटी नावे वगळली गेली आहेत. त्यामुळे आता गाफील न राहता प्रत्येक शिवसैनिकाने आपल्या विभागातील मतदारयादीवर करडी नजर ठेवावी,’ असे आवाहन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी केले.



शिवसेनेने बीड जिल्ह्यात नियुक्त केलेल्या ३९६ बूथप्रमुखांना शिवसेना भवन येथे ठाकरे यांच्या हस्ते विमा पॉलिसी आणि ओळखपत्रांचे वाटप करण्यात आले. या वेळी शिवसेना नेते खासदार अरविंद सावंत, आमदार अंबादास दानवे, शिवसेना सचिव आमदार मिलिंद नार्वेकर यांच्यासह पदाधिकारी आणि शिवसैनिक उपस्थित होते. त्यांना मार्गदर्शन करताना ठाकरे बोलत होते.

**‘शिवसेनेच्या नावाचा दुरुपयोग करणाऱ्यांचा निकाल लागणार’**

‘सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता हे शिवसेनेचे राजकारण नाही. जनतेला पाणी, घर, निवारा आणि रोजगार मिळवून द्यायचा आहे. गाडगेबाबांच्या दशसूत्रीप्रमाणे सामान्य माणसाचे जीवन सुसह्य करण्यासाठी अधिकार हवा आणि म्हणून आपल्याला सत्ता पाहिजे. त्यासाठी महाराष्ट्र पुन्हा भगवा करायचा आहे,’ असे आवाहन ठाकरे यांनी केले.

संघटन मजबूत करण्यासाठी ‘गाव तिथे शिवसेना शाखा आणि घर तिथे शिवसैनिक’ हा जुना मंत्र पुन्हा प्रत्यक्षात आणण्याचे आवाहनही त्यांनी केले.

### पेपरफुटीचे धागेदोरे मंत्री कार्यालयापर्यंत?

(पान १ वरून)

यांनाही अटक करण्यात आली. गौरव पाटील यांच्या नंदुरबारच्या घरी मंत्री झिरवाळ यांचे विशेष कार्य अधिकारी गणेश देवरे भाडेकरू आहेत. लोकसेवा आयोग आणि मंत्री कार्यालय यांचा अर्थाअर्थी काही संबंध येत नाही. मंजूर पदांची आवश्यकता संबंधित विभाग राज्य लोकसेवा आयोगास कळवतो आणि आयोगाकडून परीक्षेचे संचालन होते. परंतु, ज्या अन्न व औषध प्रशासन विभागाची ही परीक्षा होती, त्याच विभागाच्या मंत्री कार्यालयातील विशेष कार्य अधिकारी आरोपींच्या घरी भाडेकरू असल्याने चर्चा सुरू झाल्या आहेत.

### प्रदूषणकारी गृहप्रकल्पांना यापुढे १०० टक्के दंड!

(पान १ वरून) सोपविली. महापालिका, म्हाडा आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आदींनी याबाबत गृहप्रकल्पांची तपासणी केली. कार्यकारी अभियंत्यांच्या पातळीवर समित्या स्थापन केल्या. या समित्यांनी प्रदूषण करणाऱ्या गृहप्रकल्पांना काम थांबविण्याच्या नोटिसा दिल्या. या नोटिसांची पूर्तता करणाऱ्या गृहप्रकल्पांनाच पुन्हा काम सुरू करण्याची परवानगी दिली. परंतु तरीही काही गृहप्रकल्पांमध्ये प्रदूषण रोखण्याबाबत उपाययोजना केल्या जात नसल्याचे आढळून आले. त्यामुळे पालिकेने कठोर कारवाईचा पवित्रा घेतला आहे.

---

# म्हाडा घोटाळ्यात १३ अधिकारी, कर्मचाऱ्यांचे निलंबन

## मनपा नगररचना विभाग संशयाच्या भोवऱ्यात

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मनपाच्या १५हून अधिक अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार असल्याचे समोर आले आहे.**



महापालिकेच्या नगररचना विभागाने या प्रकरणात आराखडे व बांधकाम परवानग्या मंजूर केल्या. मूळ जमिनीची विभागणी करून म्हाडासाठी राखीव २० टक्के जागा व सदनिका न सोडताच परवानग्या देण्यात आल्या. या प्रकरणातील संशयास्पद फाइल्स हाताळणारे १५हून अधिक अधिकारी-कर्मचारी चौकशीच्या फेऱ्यात आले आहेत. २०१३ पूर्वीचे सातबारे तपासणे अपेक्षित असताना २०२०चे सातबारे ग्राह्य धरल्याचे सांगितले जाते. एकाच वर्ई क्रमांकातील प्रकरणांना एकाच दिवशी परवानग्या दिल्याने संबंधितांवर कारवाईची शक्यता आहे.

**नाशिक :** सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेंतर्गत नाशिकमध्ये झालेल्या बहुचर्चित म्हाडा घोटाळ्याच्या चौकशीत धक्कादायक बाबी उघड होत आहेत. सकृतदर्शनी सहभाग निष्पन्न झाल्याने महसूल विभागातील चार आणि भूमी अभिलेख विभागातील नऊ, अशा एकूण १३ अधिकारी-कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. आता नाशिक महापालिकेच्या नगररचना विभागातील १५हून अधिक अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार आहे.

महापालिका क्षेत्रातील २० टक्के म्हाडा आरक्षणाच्या अंमलबजावणीत झालेल्या अनियमिततेची शासनाकडून विशेष तपास पथकाद्वारे (एसआयटी) चौकशी करण्यात आली. या समितीचा अहवाल शासनाकडे सादर झाल्याचे सांगितले जाते. या घटनाक्रमात महसूल विभागाने नाशिकचे तत्कालीन मंडळाधिकारी अनिल रोकडे यांच्यासह मनीषा पाटील, शशिकांत चिताळकर आणि सागर शेलार या तीन तलाठ्यांना निलंबित केले. विलंबाने प्राप्त झालेल्या बनावट पोटहिस्सा नकाशाच्या आधारे नोंद घेणे, तसेच काही प्रकरणांत नावात विसंगती असतानाही फेरफार नोंद घेणे, अशा नियमबाह्य प्रकारांचा ठपका संबंधितांवर ठेवण्यात आला आहे.

दुसरीकडे, भूमी अभिलेख कार्यालयाने शिरस्तेदार मनोज शिवदे, प्रशांत अढांगळे, भूमापक सोमकांत जैन, भूकरमापक दीपक गांगुर्डे, नगर भूमापक नरेश कांबळे, तत्कालीन प्रतिलिपी लिपिक नीलेश कापसे, भूकरमापक राजेश वाडेकर, सोमनाथ सानप आणि शिपाई चंद्रकांत घोडेले या नऊ कर्मचाऱ्यांना निलंबित केल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

बनावट नकाशे व दस्तावेजांच्या आधारे मोजणी करून नकाशा तयार करणे, तसेच मूळ अभिलेखाशी पडताळणी न करता विविध प्रकारच्या अभिलेखांशी निगडित बनावट नकलांची निर्मिती करणे, अशा प्रकारांसाठी संबंधितांना जबाबदार धरण्यात आले.

# शिक्षणमंत्र्यांच्या अधिकारांना कात्री

(पान १ वरून)

असलेल्या शाळांच्या वर्ग वाढीसाठी इरादा किंवा मान्यता पत्र देण्याचे अधिकार विभागाच्या प्रधान सचिवांकडे सोपविण्यात आले आहेत. मुंबईसह ठाणे, पुणे, नवी मुंबई, पिंपरी-चिंचवड, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर या महापालिका क्षेत्रांतील सीबीएसई, सीआयएससीई, आयबी, आयजीसीएसई आदी मंडळांच्या अभ्यासक्रमांशी संलग्न होऊ इच्छिणाऱ्या शाळांना ना-हरकत प्रमाणपत्र देणे आणि त्याचे नूतनीकरण करण्याचे अधिकारही प्रधान सचिवांकडे असतील, तर उर्वरित क्षेत्रातील अशा प्रकरणांसाठी शिक्षण आयुक्तांना अधिकार देण्यात आले आहेत.

आधी हे सर्व अधिकार शालेय शिक्षणमंत्र्यांना होते. त्यामुळे आता मंत्रिस्तरावरील निर्णयांची व्याप्ती कमी होणार आहे.

सरकारने या बदलामागे ‘विकसित महाराष्ट्र २०४७’, १०० टक्के ई-गव्हर्नन्स आणि प्रशासकीय कामकाजात सुलभता व गती ही कारणे दिली आहेत. मात्र, ज्या खात्याची राजकीय जबाबदारी शिवसेनेच्या मंत्र्याकडे आहे, त्याच खात्यातील शाळा व्यवस्थापनाशी संबंधित महत्त्वाचे अधिकार प्रधान सचिव आणि शिक्षण आयुक्तांकडे वर्ग करण्यात आल्याने या निर्णयाला राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याशी यासंदर्भात वारंवार संपर्क साधूनही त्यांच्याकडून प्रतिसाद मिळू शकला नाही.

**शाळांचा ओढा अन्य मंडळांकडे**

महाराष्ट्रात राज्य शिक्षण मंडळाशी (एसएससी, एचएससी) संलग्नित असलेल्या शाळा मोठ्या संख्येने सीबीएसई, आयसीएसई, आयजीसीएसईसारख्या अन्य शिक्षण मंडळांशी संलग्न होत आहेत. प्रत्येक शाळेला त्याकरिता राज्य सरकारकडून ना-हरकत मिळवावी लागते. सुमारे १० वर्षांपूर्वी राज्यात अन्य मंडळांच्या सुमारे बाराशे शाळा होत्या. आता त्यांची संख्या चार हजारावर गेली आहे. प्रत्येक वेळेस ना-हरकत देताना वरिष्ठांचे हात ओले करावे लागतात. यात कोट्यवधीचे व्यवहार होत असतात, असा आरोप एका खासगी शाळेच्या संस्थाचालकाने केला.

# चला, गाऊ पैशाचे गीत!

सचिन रोहेकर
sachin.rohekar@expressindia.com

**देशाचा आर्थिक विकासदर, रिझर्व्ह बँकेचा रेपो रेट, बुडीत अथवा निर्लेखित कर्जाने वाकलेल्या बँकांची तब्येत, युद्ध देशाच्या सीमेवर असो अथवा सीमेपासून पार दूरवर कुठेही सुरू असो, त्याच्या परिणामातून वाढणाऱ्या किमती, महागाई (चलनवाढ), डॉलर-रुपया विनिमय दर अशा ठोस आकड्यांवरच आपले वैयक्तिक भवितव्यही बेतलेले असते, ते कसे, याविषयी प्रबोधन करणारे पुस्तक...**

**मानवी स्वभावात,** ओढ, हुरहुर, तळतळाट, काळजात चर्र होणे आणि विरहाची खंत या भावना प्रेमाव्यतिरिक्त आणखी एका गोष्टीकडून जागवल्या जातात. ती गोष्ट म्हणजे पैसा. सध्याच्या जमान्यात तर पैशापुढे नातेसंबंध, नीतिमत्ता, तत्त्वनिष्ठा सारेच झूठ. माणूस कितीही श्रीमंत, ज्ञानी किंवा उदार दानशूर असल्याचा आव आणणारा का असेना, पैशाबाबत सारेच भावुक असतात. किंबहुना माणूस जसजसा मोठा होतो, तसतशी पैशाशी त्याची भावनिक नाळ अधिकच घट्ट होते. असलेला पैसा खर्च होणे किंवा दुसऱ्या हाती जाणे याचा कमी-अधिक चटका प्रत्येकाच्याच मनाला लागतोच. तर हीच पैसा कमावण्याची, तो खर्चण्याची, तो जमवत जाण्याची आणि वाढवत नेण्याची गोष्ट आहे - 'द इकॉनॉमी इज पर्सनल - हाऊ बिग इकॉनॉमिक फोर्सेस शेप योर मनी- अँड व्हॉट यू कॅन डू अबाऊट इट'! अनिशा सरकार आणि नूपुर पवन बांग या अनुक्रमे पत्रकार व व्यावसायिक असलेल्या दोन लेखिकांनी हे पुस्तक अगदी योग्य वेळी 'अमृतकाल' वगैरे म्हटले जाणाऱ्या समयी आपल्यापुढे ठेवले आहे.

'इकॉनॉमिक्स' हा मुळातच एक शास्त्र म्हणून अभ्यासला जाणारा विषय आहे. त्याचे नाव घेताच अनेकांच्या अंगावर काटा येतो आणि हा आपल्या गावचा विषय नसल्याचा नाहक भाव जागा होतो. मात्र हे पुस्तक 'अर्थशास्त्र सर्वांच्या जिव्हाळ्याचे' या शीर्षकाबरहुकूम, एकूण मांडणी व आशयातही सुगम, सुटसुटीत, अधिकाधिक भावस्पर्शी साकारले गेले आहे. अनेकांना कंटाळा न करता ते नक्कीच वाचावे वाटेल. रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर दुव्वुरी सुब्बाराव यांनी या पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हणूनच लिहिले आहे की, जगाचे आणि देशाचे अर्थकारण आणि पैसा-संपत्तीच्या सांभाळाचे आपले वैयक्तिक भान या दोहोंमधील दरी यशस्वीरीत्या मिटवून टाकते, हा या पुस्तकाचा सर्वांत मोठा गुण आहे.

भारतीय तत्त्वज्ञानात पिंडी ते ब्रह्मांडी नाते आणि त्यापुढे महाराष्ट्राच्या संत परंपरेचा पायादेखील 'व्यक्ती ते समष्टी' या एकात्म भावावर उभा आहे. संतांची शिकवणच अशी की, व्यक्ती हा समष्टीचा एक अविभाज्य अंश आहे, त्यामुळे व्यक्तीचा खरा उत्कर्ष समष्टीच्या कल्याणातच सामावलेला आहे. अर्थशास्त्रातील मायक्रो आणि मॅक्रो-इकॉनॉमिक्स या संकल्पना व्यक्ती ते समष्टी नात्याशी तंतोतंत जुळणाऱ्या आहेत. आपला पगार, त्यातून भागू शकणारा महिन्याचा खर्च, आपल्याला घर-गाडीसाठी कर्ज घेता येईल? मुलांच्या शिक्षणाची फी आणि आपल्या खिशाला परवडेल अशी विद्याशाखा कोणती? आपदप्रसंगी ओढवणारा औषधपाण्याचा खर्च, हौस-मौज आणि बचतीसाठी बाजूला काढता येणारी रक्कम वगैरे प्रश्न व मुद्दे हे सर्वांसाठी नक्कीच जिव्हाळ्याचे आहेत. परंतु व्यक्तीशी संलग्न असलेले (मायक्रो - सूक्ष्म) आर्थिक निर्णय आणि परिस्थिती यांच्यावर मॅक्रो अर्थात समष्टी पातळीवरील आर्थिक घडामोडींचा मोठा प्रभाव पडत असतो. म्हणजेच देशाचा आर्थिक विकासदर (जीडीपी), रिझर्व्ह बँकेचा रेपो रेट, बुडीत अथवा निर्लेखित (राइट-ऑफ) कर्जाने वाकलेल्या बँकांची तब्येत, युद्ध देशाच्या सीमेवर असो अथवा सीमेपासून पार दूरवर कुठेही सुरू असो, त्याच्या परिणामातून वाढणाऱ्या किमती, महागाई (चलनवाढ), डॉलर-रुपया विनिमय दर अशा ठोस आकड्यांवरच आपले वैयक्तिक भवितव्यही बेतलेले असते. 'अर्थशास्त्र सर्वांच्या जिव्हाळ्याचे' पुस्तक नेमके हेच सोपे करून आपल्यापुढे ठेवते.




**द इकॉनॉमी इज पर्सनल**
**लेखिका** – अनिशा सरकार, नूपुर पवन बांग
**प्रकाशक** – वेस्टलॅण्ड बुक्स
**पृष्ठे**– २४८, **किंमत**– ४९९ रु.

'अर्थशास्त्र' किंवा 'देशाची अर्थव्यवस्था' हा केवळ उद्योगपती, रिझर्व्ह बँक, अर्थसंकल्पीय अंकगणित आणि शेअर बाजारापुरता मर्यादित असलेला एक क्लिष्ट विषय म्हणूनच राहत नाही. तर वास्तव हे की जागतिक किंवा राष्ट्रीय पातळीवरील प्रत्येक मोठी आर्थिक घडामोड ही थेट आपल्या रोजच्या जीवनावर, कुटुंबाच्या महिन्याच्या ताळेबंदावर आणि भविष्यातील बचतीवर परिणाम करत असते.

फार मागे नको, मागील १२-१३ वर्षांचा (साधारण २०१४ ते २०२६) काळ पाहा. सर्वसामान्यांचा खिशाला भार ठरेल अशा अनेक चीजवस्तूंचे या काळात वाढलेले दाम लक्षात घ्या. दूध ३६ वरून, ७५-८० रुपयांवर, स्वयंपाकाचे तेल, स्वयंपाकाचा गॅस, तूर डाळीच्या किमती या काळात दुपटीहून अधिक वाढल्या आहेत. बरोबरीने शाळा-महाविद्यालयीन शिक्षण शुल्क जवळपास तिप्पट, वैद्यकीय उपचार (ओपीडी खर्च) जवळपास चौपट वा अधिक, सिनेमाचे तिकीट तिप्पट तर सोने अडीच पटीपेक्षा जास्त वाढले आहे. घराच्या किमती, घर भाडे, प्रवास भाडेही याच प्रमाणात वाढत आले आहे. १२ वर्षांपूर्वीही महागाई होती तरी वस्तू विकत घेणे, सेवा गरजेप्रमाणे उपभोगणे परवडत होते. त्या उलट आज अनेक गोष्टी इतक्या वाढल्यात की त्या आवाक्याबाहेरच गेल्या आहेत. चलनवाढीचा स्तर किंवा महागाई दराचा आकडा ३ टक्के, ७ टक्के की १० टक्के यापैकी काय, याच्याशी आम्हाला घेणे काय? काहीच फरक पडत नाही, असे वाटणे हा त्या मंडळींचा भ्रमच. आकड्यांना जरी विचारात घेतले नाही तरी हातातून वेगाने निसटणाऱ्या पैशांतून महागाईच्या झळांचा अनुभव प्रत्येकाला येत असतोच. कालपर्यंत ज्या पगारात घर सुरळीत चालत होते, त्याच पगारात महिनाअखेर तंगी भासू लागते. महागाई हा एक प्रकारचा 'अदृश्य कर' आहे, जो नकळतपणे आपली बचत, गरजा, हौस-मोज पोखरत असतो.

महागाईचा आकडाच आपल्या जीवनस्तराचा खरा आरसा आहे. आपल्या दैनंदिन जगण्याच्या खर्चाचा तो नियंता आहे, असे किती लोक विचार करतात? जरी हे काहींना पटत असले तरी महागाईवर नियंत्रणाचा दोर कसून धरण्यात रिझर्व्ह बँक आणि सरकारची भूमिका काय असते, तसेच त्यांच्या धोरणांचा त्यावर किती परिणाम होतो, याचा विचार किती जण करतात? ऐंशीच्या दशकात देशाने पहिल्यांदा अनुभवलेला ५ टक्क्यांचा जीडीपी वाढीचा दर, त्या आधीचा सुमारे ३-४ टक्क्यांच्या आसपासचा तथाकथित 'हिंदू ग्रोथ रेट' आणि २००४ ते २००८ मधील सातत्यपूर्ण ८-९ टक्क्यांचा वाढदर अशा या आकड्यांमधून आपले, आपल्या कुटुंबाचे नेमके काय आणि कसे भले झाले? अर्थव्यवस्थेतील हे स्थित्यंतर जर प्रगतीकारक मानायचे तर तपभराच्या काळात जे परवडणारे ते आज खरेदी करणे अशक्य कोटीत कसे गेले? विशेषतः या काळात अर्थव्यवस्थेचे आकारमान दुपटीने फुगले. जीडीपी सतत वाढत आला आहे, अर्थव्यवस्था जगातील पहिल्या पाचात आली आहे; मग सामान्य माणसाच्या खिशावरचा ताण का वाढतो आहे? असे सारे प्रश्न हे पुस्तक स्वाभाविकपणे पटलावर आणते आणि त्याचा साधा, सुलभ उलगडाही ते करते. डॉलरपुढे रुपयाचे ढासळणे, तसेच देशाच्या अर्थसंकल्पात अधिकाधिक तूट वाढत जाणे याचे आपल्यापुढे येणाऱ्या जेवणाच्या थाळीतील डाळी, भाज्या आणि अन्य पक्वान्नांचे स्वरूप व प्रमाण कसे बदलत जाते, हेही आपल्याला ते समजावून देते.

अर्थकारणाबद्दलच्या चिंता प्रत्येकाच्या सारख्याच नसतात. उद्योगधंद्यांना एकीकडे सरकारकडून सवलती आणि दुसरीकडे बाजारात मागणी असणे आवश्यक असते. मागणी असेल आणि व्यवसायाला अनुकूल वातावरण असेल तरच उद्योग क्षेत्रातून गुंतवणूक होईल, जेणेकरून रोजगार आणि लोकांहाती पैसा येईल, हे सरकारला ध्यानात घ्यावे लागते. व्यवसायानुकूलतेसाठी मग सवलती, करभार कमी केला जाणे सरकारला भाग ठरते. उद्योगांकडून मग वेतनवाढ आणि नवीन नोकऱ्या तयार केल्या जातात, जे अर्थव्यवस्थेसाठी आणि सरतेशेवटी लोकांच्या फायद्याचे ठरते. पण हे केवळ आर्थिक विकासपथ प्रगतीपर असेल तेव्हाच घडून येते. ज्यामागे जागतिक तसेच राष्ट्रीय पातळीवरील मोठ्या आर्थिक घडामोडी कारक ठरत असतात. असे हे सारे एकमेकांत गुंफलेले आहे.

वैयक्तिक स्तरावर विचार करता, समुद्रातील भरती-ओहोटीत आपली नौका सुरक्षितपणे तरून जाणे म्हणजेच 'कमवा, उधळा, वाचवा, वाढवा' हे समीकरण नीट जुळून यायचे आपल्या हाती असलेले मार्ग हे पुस्तक सुचवते. शेवटच्या चौथ्या भागात गुंतवणुकीच्या पारंपरिक, प्रचलित आणि नव्याने उदयाला आलेल्या मार्गांचे सविस्तर विवेचन आहे. महिन्याकाठी बचत केलेला पैसा गुंतवणुकीतून जर वाढायचा तर त्यातून महागाईपेक्षा जास्त परतावा मिळायला हवा. तो मिळवण्यासाठी म्युच्युअल फंड किंवा शेअर बाजारात 'एसआयपी'द्वारे शिस्तबद्ध गुंतवणूक करणे गरजेचे आहे. प्रत्येक गुंतवणूक आणि मालमत्ता वर्ग यात कोणती ना कोणती जोखीम असतेच. ती समजून घेऊन सुजाणतेने मालमत्ता वाटपाचे म्हणजेच जोखमीचा भागाकार करण्याचे तत्त्वही पुस्तक समजावून देते.

आपली कमाई जसे आपण किती खर्च करतो, किती बचत करतो आणि कुठे गुंतवणूक करतो या आर्थिक निर्णयांना प्रभावित करते, तसेच ती आपल्या एकूण जीवनमान आणि सुखासमाधानावर अंकुश येईल की त्यात आणखी बहार येईल हेही ठरवत असते. शिवाय नोकरी सरकारी आस्थापनांतील सुखासीन की खासगी आणि त्यातही संघटित की बेभवरशाच्या असंघटित क्षेत्रातील याचाही तुमच्या आर्थिक जीवनमान आणि उत्कर्षावर प्रभाव राहतो. अशा परिणामकारक घटकांच्या गुंतागुंतीला भारतासारख्या देशात पुढे आणखी पदर जुळत जातात. येथे तुमची जात, वर्ग, लिंग (स्त्री-पुरुष) भेद, भौगोलिक परिसर आणि व्यवसाय यांसारखे सामाजिक घटकही पैशाच्या प्रवाहाला आणि वाटपाला वळण देत असतात. त्यामुळे आपले वित्तकारण समजून घेताना, समाजकारणाकडे दुर्लक्ष करता येत नाही, याचे भानही हे पुस्तक देते.

भारताच्या संरचनात्मक वास्तवाला समजून घेऊन, आपल्या उत्पन्न आणि खर्चाची सांधेजोड व्हायला हवी. खर्च-उत्पन्नाचा असा मेळ साधणे हे वैयक्तिक आर्थिक नियोजनाचे मूलतत्त्व आहे. केवळ एकाच पगारावर अवलंबून न राहता आपली कौशल्ये वाढवून उत्पन्नाचे इतर मार्ग निर्माण करणे हे सर्वांसाठीच- मग नोकरी, सामाजिक स्तर काहीही असो - फायदेशीर ठरते. मात्र हे



सरसकटपणे घडताना दिसत नाही. वर दिलेल्या सामाजिक, भौगोलिक कारणामुळे लोकांचे वित्तीय वर्तन आणि गुंतवणूककारण कमालीचे भिन्न असते, हेही मग ध्यानात येते. म्हणूनच प्रचंड विषमता आणि संधी-संसाधनांचे असमान वितरण असताना, वरच्या थराला असलेल्या केवळ टक्का, दोन टक्काभरांचे आर्थिक क्रियाकलाप वाढले तरी भारताचा जीडीपी वाढताना दिसतो. आणि अर्थातच या विकासाचे फायदेदेखील या वरच्या थरापुरतेच सीमित राहतात. हे चित्र बदलू शकते काय? तर नक्कीच बदलू शकते. उपाय आणि मार्ग कोणते यावरही हे पुस्तक चर्चा करते.

कुटुंबाच्या भवितव्याविषयी चिंतीत व्यक्तीला तिच्या कमाई आणि खर्च तसेच बचत आणि गुंतवणुकीला आकार देणारी ही समीकरणे समजून घ्यावीच लागतील. त्याच्याशी संलग्न जे जे काही आहे, त्यांचा अर्थ लावावा लागेल. या पुस्तकाचा सांगावा इतकाच की, अपेक्षित प्रेम आणि प्रतिसाद मिळो अथवा विरहाची खंत, वेदना असो; भरभराट असो वा ओहोटी लागलेली असो, प्रत्येकाचे पैशाचे गीत असते आणि असायलाच हवे. प्रत्येकानेच ते जमेल त्या ताल-सुरात गायलेच पाहिजे.

# स्त्रियांच्या विद्रोहाचा हुंकार...

लता दाभोळकर
lata.dabholkar@expressindia.com

**मराठीत दलित** कवयित्रींचा पहिला हुंकार ऐकू येतो तो संत साहित्यात. रूढी-परंपरांनी जखडलेल्या समाजव्यवस्थेतही स्त्री म्हणून मनातले भाव मोकळेपणाने मांडण्याचा, समाजरूढींबद्दलचा विद्रोह शब्दांत व्यक्त करण्याचा आणि सामाजिक परंपरेचे पाश तोडण्याचा प्रयत्न संत कवयित्रींनी आपल्या काव्यातून केला. पुढे आधुनिक दलित कवयित्रींनी आपल्या वेदना, समाजातील दमनवृत्ती, त्याविरोधात उभं ठाकण्याची हिंमत कवितांमधून मांडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जसं दलितांचं उत्थान केलं तसंच त्यांच्या कार्यातून महिलांना आणि पर्यायाने या कवयित्रींनाही बळ मिळालं. किंबहुना आंबेडकरी विचार हीच अनेक कवींची मुख्य प्रेरणा ठरली. तिला जोड मिळाली 'दलित पँथर' आणि दलित साहित्यिक चळवळीची. या कवयित्रींमध्ये विद्रोहाचा हुंकार आहे. स्वत्वाची प्रखर जाणीव आहे. ती इतकी खोलवर आहे की, त्यात संपूर्ण समाजव्यवस्थेला हादरवून टाकण्याची ताकद आहे आणि ती त्यांच्या कवितांमधून अधिक तीव्रतेने जाणवत राहते.

मराठीतील अशा तीन पिढ्यांमधल्या प्रमुख दलित कवियित्रींच्या कविता 'लीपिंग टुवर्डस् द डीप ब्लू स्काय' या पुस्तकात इंग्रजीत अनुवादित केल्या आहेत. हा अनुवाद केला आहे शृजना एन. श्रीधर आणि श्रीजा राव यांनी. दलित स्त्री साहित्यातील महत्त्वाच्या लेखिका उर्मिला पवार यांची प्रस्तावना म्हणजे या कविता समजून घेणं सुकर करणारी अभ्यासपूर्ण मांडणी आहे. त्यांनी दलित कवयित्रींच्या साहित्याचा उल्लेख करताना दलित आणि स्त्री चळवळीचा थोडक्यात आढावा घेतला आहे. पुस्तकात छाया कोरेगावकर, दिशा पिंकी शेख, हिरा बनसोडे, प्रज्ञा दया पवार, शीतल साठे, सुरेखा भगत, राज्यश्री गुडी, शारदा नवले, स्नेहा कदम, वर्षा भिसे, संध्या तांबे, उषाकिरण आत्राम या कवयित्रींच्या रचनांचा समावेश आहे. अर्थात या कविता प्रत्यक्ष मराठीत वाचण्याचा अनुभव जास्त दाहक आणि या स्त्रियांच्या मनीच्या विद्रोहाची सखोल जाणीव करून देणारा असला तरी या कवितांमधील भाव इंग्रजी अनुवादात उतरविण्याचा प्रयत्नही कौतुकास्पद आहे.

या कवितांची 'सिस्टर्स', 'टिअर धिस हर्ट', 'द कारवाँ इज अवर लीड', 'आय क्रेव्ह ॲन इल्युजिव्ह ड्रीम', 'आय जस्ट वॉन्ट टू मीट मायसेल्फ', 'आय जस्ट वॉन्ट टू बी फ्री' या प्रकरणांमध्ये विभागणी केली आहे. त्यांची शीर्षकं वाचली तरी त्या कवितांचा बाज काय आहे हे लक्षात येतं. एक स्त्री म्हणून समजातील आपलं स्थान, आपल्या घरातील स्वतःचं स्थान, स्वातंत्र्याची ओढ हीच या कवितांमधून दिसू येते. शब्दाशब्दांमध्ये बंडखोरी, स्वतःचं अस्तित्व जपण्याचा प्रयत्न, त्याची मनात असलेली प्रखर जाणीव वाचकाला स्वतःची नेमकी ओळख शोधण्यास प्रवृत्त करते आणि ही जाणीव फक्त स्त्रियांपुरतीच मर्यादित राहत नाही.

या संग्रहातून दलित स्त्रियांचा संघर्ष, त्यांच्यातील भगिनीभाव, दलित स्त्रीवादी अभिव्यक्ती जाणवत राहते. प्रस्थापित पितृसत्तेला केवळ विरोध करून समाधान न मानता ती सत्ताच नाकारण्याची हिंमत या कवितांतून दिसून येते. जातीआधारित समाजव्यवस्थेविरोधात ठामपणे उभं राहणं, एक स्त्री म्हणून स्वतःचं स्वातंत्र्य जपताना 'माणूस' म्हणून जगण्याला प्राधान्य मिळावं यासाठी संघर्ष करणं, परंपरा, रूढींचं मानेवरचं जोखड धाडकन् फेकून देणं... अशा अनेक हिमतीच्या गोष्टी या कवितांमधून प्रखरपणे जाणवतात.

स्त्रीवादी अस्मिता, आंबेडकरी विचारसरणी आणि सामाजिक वास्तवावर बोट ठेवणाऱ्या छाया कोरगावकर, सामाजिक, राजकीय पातळीवर ठोस व थेट भूमिका घेणाऱ्या प्रज्ञा दया पवार, तृतीयपंथीयांच्या वेदना ठळकपणे मांडणाऱ्या दिशा पिंकी शेख, स्त्रीसुलभ भावना कधी हळव्या शब्दांत तर कधी प्रखरपणे मांडणाऱ्या




**लीपिंग टुवर्डस् द डीप ब्लू स्काय**
**संपादन**– शृजना एन. श्रीधर
**अनुवाद**– श्रीजा राव, शृजना एन. श्रीधर
**प्रकाशक**– मावेली प्रकाशन
**पाने**–१३१, **किंमत**– २९९ रु.

हिरा बनसोडे, विद्रोहाचे ज्वलंत उद्गार उमटवणाऱ्या शीतल साठे, शोषित समाजाच्या वेदना समर्थपणे शब्दांत मांडणाऱ्या सुरेखा भगत, कवितांमध्ये उपजत गेयता असलेल्या राज्यश्री गुडी, सामाजिक, कौटुंबिक नातेसंबंध सहज सोप्या शब्दांत, पण ताकदीने मांडणाऱ्या शारदा नवले, अन्यायाविरूद्ध लढण्यास बळ देणारी कविता लिहिणाऱ्या स्नेहा कदम, आंबेडकरी जाणिवा समर्थपणे मांडणाऱ्या वर्षा भिसे, माणसांतील निर्मळ मनाला साद घालणाऱ्या संध्या तांबे, सामाजिक वास्तव दाहकपणे मांडणाऱ्या उषाकिरण अत्राम यांच्या कवितांचा समावेश या पुस्तकात आहे. या कवितांमध्ये बंडखोरी हा समान धागा असला तरी प्रत्येकीच्या भाषेचा पोत वेगळा, विद्रोहाचा हुंकार वेगळा... पण प्रत्येकीची भावना आंबेडकरी विचारांशी बांधलेली आहे.

हेटाळणीच वाट्याला आलेल्या आयुष्यात या बायका आंबेडकरी विचारांच्या जोरावर आभाळ पेलण्याचं बळ राखतात आणि सहज पेलतातही. त्यामागे एक आंतरिक प्रेरणा असावी. आंबेडकरी विचारांचं मोल या कवितांमधून जाणवत राहतं. त्या विचारांनी प्रेरित होऊन दमदारपणे लिहिणाऱ्या या कवयित्रींचं लिखाण भाषांच्या मर्यादा ओलांडून सर्वत्र पोहोचणं गरजेचं आहे. हे पुस्तक महत्त्वाचं ठरतं ते त्यामुळेच!

## बुकबातमी

# समतेच्या लढ्यातील मोहरा हरपला...

**वर्ष असेल** साधारण १९६१-६२चं. अमेरिकेतल्या एका प्लेबॉय क्लबने जाहिरात केली होती- आकर्षक तरुणी हव्या आहेत. एका २८ वर्षांच्या मुलीने अर्ज केला. मॉडेल होण्यासाठी तिने अल्पावधीत चार-पाच किलो वजन कमी केलं. अत्यंत घट्ट आणि तोकड्या कपड्यांत, उंच टाचांची पादत्राणं घालून चालणं तिच्यासाठी फार कठीण होतं. पण तिने निभावून नेलं. तब्बल ११ दिवस ती मॉडेल म्हणून वावरली आणि त्यानंतर त्या अनुभवांवर आधारित एक सविस्तर वृत्तांत लिहिला. मॉडेलिंगच्या ग्लॅमरस जगात मुलींच आयुष्य कसं काळवंडून जातं, याचा तो स्वानुभवाधारित दस्तावेज होता. तरुणींच्या शारीरिक, मानसिक आणि आर्थिक शोषणाचे खणखणीत पुरावेच तिने या वृत्तांतातून मांडले होते. ती होती तरुण पत्रकार ग्लोरिया स्टाइनम. 'एक्सपोज' शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेला तिचा हा वृत्तांत हे शोधपत्रकारितेचं हा एक उत्तम उदाहरण होतं, पण प्रत्यक्षात याचं बक्षिस मिळण्याऐवजी तिला प्रदीर्घकाळ शिक्षाच भोगावी लागली. तिच्यावर 'प्रिटी गर्ल'चा शिक्का बसला. आम्ही गंभीर पत्रकारिता करतो, अशा 'बनी गर्ल्स' आम्हाला नकोत म्हणत वृत्तपत्र, मासिकांनी ग्लोरियाच्या नावावर काट मारली. कुठून बुद्धी सुचली आणि या विषयावर वार्तांकन केलं, असं ग्लोरियाला वाटू लागलं होतं. पण या बहिष्कारात तिच्यातला स्त्रीवाद निष्प्रभ करण्याएवढी क्षमता नव्हती. आता या घटनेला ६०-६५ वर्षं लोटली. ग्लोरिया यांचं नुकतंच निधन झालं, पण 'स्त्रीवादाच्या दुसऱ्या लाटेचा चेहरा' ही त्यांची ओळख इतिहासात कायमची नोंदवली गेली.



त्यांच्यातल्या स्त्रीवादाचं मूळ त्यांच्या समस्यांनी ग्रासलेल्या बालपणात असावं. घटस्फोट, एकल पालकत्व, मानसिक आजार आणि नोकरीतील स्त्री-पुरुष भेदभाव अशा अनेक पातळ्यांवर झुंजणाऱ्या आईला पाहण्यात गेलेली वाढीची वर्षं आणि वुमन्स लिबरल आर्ट कॉलेजमधलं शिक्षण यातून त्यांच्यातल्या स्त्रीवादी जाणिवा अधिक टोकदार होत गेल्या असाव्यात. शिक्षणानंतर काही काळ त्या पाठ्यवृत्तीवर भारतात राहिल्या. या काळात गांधींच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडला.

अमेरिकेत परतल्यावर त्यांनी काही काळ 'इंडिपेंडेंट रिसर्च सर्व्हिस'च्या संचालक म्हणून काम केलं. ही सीआयएशी संलग्न संस्था होती आणि व्हिएन्ना व हेलसिंकी येथील सोव्हिएत-नियंत्रित जागतिक युवा महोत्सवांमध्ये व्यत्यय आणण्यासाठी अमेरिकी विद्यार्थ्यांची भरती करण्याचं काम ही संस्था करत असे. मात्र त्यानंतर त्यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रवेश केला.

गर्भपात या मुद्द्यावर त्यांचं लेखन व्यापक चर्चेचा कारण ठरलं होतं. ग्रिनविचमध्ये गर्भपातासंदर्भातील अनुभव मांडण्यासाठी एक सभा घेण्यात आली होती. त्यात एकूण १२ महिलांनी आपल्याला गर्भपात करण्यास भाग पाडल्याचा अनुभव सांगितला होता. त्या सभेमुळे आपल्या २२व्या वर्षी केलेल्या गर्भपाताच्या कटूस्मृती जाग्या झाल्याचं त्यांनी आपल्या 'माय लाइफ ऑन द रोड्स' या पुस्तकात नमूद केलं होतं.

त्यांनी १९७१मध्ये डोरोथी पिटमन ह्यूजेस यांच्यासह 'मिस' हे मासिक सुरू केलं. या मासिकाने महिला म्हणजे सौंदर्य, नजाकत वगैरे साचे मोडण्याचा प्रयत्न केला. त्याच्या पहिल्या अंकाच्या मुखपृष्ठावर चित्र होतं वंडरवुमनचं. डीसी कॉमिक्समध्ये तेव्हा वंडरवुमनने तिच्या प्रियकरासोबत राहण्यासाठी आपल्या सुपरपॉवर्सचा त्याग केल्याचं कथानक मांडण्यात आलं होतं. तिला तिच्या सुपरपॉवर्स परत देण्यात याव्यात, बाईने पुरुषासाठी तिचं स्वत्व त्यागण्याची काहीच गरज नाही, असा विचार त्यातून मांडण्यात आला. या मासिकातला 'इफ मेन कुड मेन्स्टुएट' हा लेख चर्चेचा आणि वादाचाही विषय ठरला होता.

'आउटरेजस ॲक्ट अँड एव्हरीडे रिबेलियन', 'मुव्हिंग बियाँड वर्ड्स', 'द ट्रुथ विल सेट यू फ्री बट फर्स्ट इट विल पिस यू ऑफ', 'ॲन अनएक्स्पेक्टेड लाइफ' या पुस्तकांतून ग्लोरिया यांनी महिलांच्या प्रश्नांना वाचा फोडली. भारतातील आपल्या फेलोशिपच्या काळात आलेल्या अनुभवांवर आधारित 'द थाउजंड इंडियाज' हे पुस्तक त्यांनी लिहिलं. अमेरिकेतील विद्यार्थ्यांना भारतात येण्यास प्रोत्साहन देण्यासाठी काय करता येईल, याविषयीच्या सूचना त्यात केल्या होत्या. त्यांनी कौटुंबिक हिंसाचार, अश्लील साहित्याचा उद्योग आणि व्हिएतनाम व आखाती युद्धं, 'ब्लॅक लाइव्हज मॅटर', कोरियाचं एकत्रीकरण, महिलांचे प्रजननविषयक अधिकार, एलजीबीटीक्यू-प्लस वर्गाचे अधिकार अशा याविषयांवर विपुल लेखन केलं. १९८४ मध्ये, वॉशिंग्टन डीसी येथील दक्षिण आफ्रिकेच्या दूतावासाबाहेर वर्णभेदाविरुद्ध निदर्शने करत असताना त्यांना अटक करण्यात आली होती.

ग्लोरिया यांच्या प्रवासाला आता पूर्णविराम मिळाला असला, तरीही साठच्या दशकापासून आजवरच्या विविध टप्प्यांवर स्त्रीवादाला दिशा देण्यात त्यांचं योगदान मोलाचं ठरलं, हे निश्चित!

## बुक-नेट

### कथाप्रेमाची दास्तान...




**सप्टेंबर आणि** ऑक्टोबर या दोन महिन्यांत अनुक्रमे 'ओ हेन्री प्राइझ स्टोरीज' आणि 'बेस्ट अमेरिकन शॉर्ट स्टोरीज' हे दोन कथाखंड बाजारात दाखल होतात. राम कोलारकरांच्या 'सर्वोत्कृष्ट मराठी कथा' या पुस्तकांची प्रेरणा या नियमित प्रसिद्ध होणाऱ्या वार्षिक ग्रंथांत होती. पुढे कोलारकरांसारखे काम कुणीच करावयास धजले नसल्याने तो उपक्रम दोन दशकांत बंद पडला. पण शतकी नियमितता असलेले अमेरिकेतील कथाखंड अजूनही गंभीरपणे निघत आहेत. २९ सप्टेंबर रोजी 'ओ हेन्री प्राइझ स्टोरीज'चा खंड प्रकाशित होईल. त्या संग्रहाचे संपादन लेखक टॉमी ऑरेंज करतायत. नेटिव्ह अमेरिकी असलेले ऑरेंज यांचे कथाप्रेम पुस्तक दुकानात काम करताना सुरू झाले. त्यानंतर वाचनाच्या नादातून त्यांच्या समूदायाचा परिसर आणि माणसे पुस्तकांत आली. त्यांनी संपादन केलेल्या खंडाची प्रस्तावना, ज्यात कथावाचनाचे आणि लिखाणाचे आत्मकथन बऱ्यापैकी उतरले आहे, ती संपूर्ण वाचता येईल. त्याशिवाय या संग्रहात त्यांनी निवडलेल्या काही कथाही येथे मोफत वाचता येतील.

- https://tinyurl.com/25k4vapb
- https://tinyurl.com/3k9yrhvm
- https://tinyurl.com/yycjdfbw
- https://tinyurl.com/eh8czfkt




### पुस्तकविक्रीची मखलाशी...

**हा लेख** गेल्या आठवड्यातील 'गार्डियन' वृत्तपत्राच्या आठवडी ग्रंथ पुरवणीमधील चर्चेचा मुख्य मुद्दा. तो ब्रिटनमधील ग्रंथव्यवहारावर प्रामुख्याने लक्ष वेधत असला, तरी जगभरातील विक्री व्यवहाराशी पडताळून पाहता येण्यासारखा. समाजातील तसेच माध्यमांतील प्रेरक व्यक्तिमत्त्वांच्या प्रचाराचा, पुस्तकाच्या मुखपृष्ठांचा आणि एकूणच दुकानांच्या प्रयत्नांचा एकूण परिणाम कसा होतो, त्याविषयी रोचक माहिती यातून होते. जपानी खूपविक्या पुस्तकांचे विक्रीमूल्य मुखपृष्ठांवर असलेल्या चित्रांत मांजर काढल्याने कसे वाढते, चित्रकार ते संपादक आणि हौशी किंवा पुस्तकांच्या दुकानांची साखळी असलेल्या संस्था विकत घेऊन ग्रंथ वाचणाऱ्यांना आकर्षित कसे करतात, त्यांचे अर्थकारण कसे चालते, याचा तपशील यात आला आहे.

- https://tinyurl.com/e6hx2vrx

# वर्दीत विरणारी विकासवाट...

## कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या नावावर नागरिकांच्या अधिकाराचे हनन होणे हा राष्ट्रीय प्रगतीतला मोठा अडथळा ठरतो, हे राज्यकर्त्यांना मान्यच नसल्याचे दिसते...

**राजापेक्षा राजनिष्ठ** असा लौकिक नेहमीच मिरवणाऱ्या पोलीस यंत्रणेवर काही भाष्य करण्याआधी अलीकडे घडलेल्या काही घटनांवर सविस्तर नजर टाकणे गरजेचे. आशीष जोशी हे केंद्र सरकारच्या सेवेतून अलीकडेच निवृत्त झालेले सनदी अधिकारी. समाजमाध्यमांवर मत व्यक्त करणे हा त्यांचा छंद. यातून ते सरकारवर टीका करत असतात. काही दिवसांपूर्वी त्यांनी सत्तावर्तुळात सर्वोच्चस्थानी असलेल्या एका नेत्याच्या कार्यपद्धतीवर ताशेरे ओढले. दोन दिवसांपूर्वी सकाळी ते नेहमीप्रमाणे फिरायला गेले. तिथूनच त्यांना दिल्ली पोलिसांनी उचलले. दिवसभर त्यांची चौकशी सुरू होती. या काळात त्यांना कुटुंबाशीसुद्धा संपर्क साधू दिला नाही. सायंकाळी त्यांना सोडण्यात आले. कशासाठी ताब्यात घेतले? प्रकरण काय? असे परस्पर उचलण्याचे कारण काय याविषयी पोलीस काहीही सांगायला तयार नाहीत. सध्या विद्यानंद बापटांमुळे गाजत असलेल्या पुण्यात एका समाजमाध्यम प्रभावकाला रात्री एक वाजता घरून ताब्यात घेण्यात आले. या प्रभावकाने एका 'लाडक्या' आमदाराच्या वाहनांची नंबरप्लेट नव्या स्वरूपातली नसल्याबद्दल प्रश्न उपस्थित केला, याखेरीज त्याचा गुन्हा काय असावा याची माहिती पोलिसांनी अद्याप दिलेली नाही. त्यासाठी मध्यरात्री अटक करण्याची बुद्धी पोलिसांना का सुचली याचे उत्तर कुणाकडे नाही. दिल्लीत सरकारने आयोजित केलेल्या एका कार्यक्रमाचे वार्तांकन करण्यासाठी गेलेल्या दोन महिला पत्रकारांनी तेथे हजर असलेल्या सत्ताधाऱ्यांचे वाहन अडवून प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला. हा रस्ता अडवण्याचाच प्रकार असे पोलिसांचे म्हणणे, तर आमची मुस्लीम आडनावे ऐकताच आम्हाला पोलीस ठाण्यात नेऊन मारहाण सुरू झाली असे या पत्रकारांचे म्हणणे. आजकाल कुठलाही कार्यक्रम संपवून नेते निघाले की पत्रकार त्यांना अडवतात. हे विशिष्ट धर्मीयांनीच करावे अशी दिल्ली पोलिसांची भूमिका आहे काय हे कळायला मार्ग नाही. गेल्या एप्रिलमध्ये नोएडात असंघटित कामगारांचे मोठे आंदोलन झाले. त्याला हिंसक वळण लागले. त्यासाठी जबाबदार धरून दिल्ली विद्यापीठातील कायद्याची विद्यार्थिनी आकृती चौधरीवर रासुका लावून तुरुंगात डांबण्यात आले. ही कारवाईच अनाठायी ठरवून अलाहाबाद उच्च न्यायालयाने गुन्हा रद्द केला व तो लावण्याची शिफारस करणाऱ्या नोएडाच्या जिल्हाधिकाऱ्यांवर पाच लाखांचा दंड ठोठावला. इथे तर पोलीस व दंडाधिकाऱ्यांची पुरती अब्रू गेली. मुंबईत एका सायकलवरून सामानाची नेआण करणाऱ्या एका सायकलस्वाराला पोलिसांनी अडवले. रस्त्याच्या मध्ये का येतो विचारत सायकल बाजूला फेकून दिली. सायकलवरील जिन्नस रस्त्यावर विखुरले. हे सारे कशासाठी तर एका आमदाराच्या वाहनाला रस्ता मोकळा मिळावा म्हणून. हा प्रसंग शिंदे शिवसेनेचे खासदार मिलिंद देवरांनी त्यांच्या समाजमाध्यम खात्यावर नोंदवला. गुरुवारी पुण्यात विद्यानंद बापटांना मारहाण झाली. पोलीस आले. बापटांनाही घेऊन गेले व दिवसभर ठाण्यात बसवून ठेवले. चौकशीच्या या काळात त्यांच्या समर्थकांनाही भेटू दिले नाही. फिर्यादीलाच आरोपीसारखी वागणूक देण्याचा हा प्रसंग नेमके काय दर्शवतो? या सर्व घटना सर्वसामान्यांच्या मनात भीती व चीड निर्माण करणाऱ्या; हे पोलीस यंत्रणेच्या लक्षात येत नसेल का? की राजनिष्ठा सिद्ध करण्याच्या नादात ही यंत्रणा सारासार विवेक हरवून बसली?

जबाबदारीच्या तुलनेत अधिकार जास्त असे या यंत्रणेच्या बाबतीत नेहमी बोलले जाते. याचा प्रत्यय अलीकडे वारंवार येताना दिसतो. कायद्याचे पालन करताना नागरिकांच्या हक्काची गळचेपी, अवहेलना होऊ नये, त्यांच्या स्वातंत्र्याचा संकोच होऊ नये याची काळजी घेणे हे या यंत्रणेचे कर्तव्य. आजवरचा इतिहास बघितला तर न्यायपालिकेने असंख्य वेळा याची आठवण या यंत्रणेला करून दिली आहे. तरीही त्यात सुधारणा होण्याऐवजी दिवसेंदिवस स्थिती खालावत असेल तर याला जबाबदार धरायचे तरी कुणाला? सत्तावुर्तळातील अदृश्य शक्तींच्या पाठिंब्याशिवाय पोलीस असे धाडसी प्रयोग करू धजतील? अलीकडे तर सत्ताच जे कुणी विरोधक ते सारे राष्ट्रद्रोही अशी उघड भूमिका घेऊ लागलेली. अशा उन्मादी वातावरणात या यंत्रणेकडून सातत्याने आगळीक घडत असेल तर केवळ त्यांनाच दोष देऊन उपयोग काय?

> ... 'यात नवे ते काय? जो कुणी सत्तेत येईल त्याच्या मर्जीने पोलीस वागणारच' यासारख्या युक्तिवादातून आधीच्या चुकांचे समर्थन आणि अनुकरणही होत असल्याकडे दुर्लक्ष सुरू राहाते...

पोलीस आताच म्हणजे गेल्या बारा वर्षाच्या कालखंडात असे वागू लागले असा निष्कर्ष काढणेसुद्धा चूक. त्या आधीच्या सत्ताकाळातसुद्धा या यंत्रणेचे वर्तन असेच होते व त्याचा त्रास तेव्हाही सर्वसामान्य तसेच विरोधकांना भोगावा लागला. आणीबाणीच्या काळात तर या पक्षपाती वर्तनाने कळस गाठला होता. त्यामुळे 'यात नवे ते काय? जो कुणी सत्तेत येईल त्याच्या मर्जीने पोलीस वागणारच' असा युक्तिवाद अलीकडे भक्तमंडळींकडून सर्रास केला जातो. यातून आणीबाणीचे अप्रत्यक्ष समर्थनच नव्हे तर प्रत्यक्ष अनुकरण होते आहे, हे या अर्धवटांच्या गावीही नसते. एकीकडे भारत २०४७ पर्यंत विकसित देशांच्या श्रेणीत प्रवेश करणार असल्याच्या बढाया मारायच्या व दुसरीकडे सर्वांना समान वागणूक, प्रत्येकाच्या घटनादत्त स्वातंत्र्यांचा सन्मान अशा गोष्टी पायदळी तुडवायच्या या विरोधाभासाचे काय? कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या नावावर होत असलेले नागरिकांच्या अधिकाराचे हनन हा विकास प्रक्रियेतील महत्त्वाचा अडथळा आहे हे सत्य देशातील राज्यकर्त्यांना मान्यच नसल्याचे दिसते- आधीही व आतासुद्धा यात काहीही बदल दिसून येत नाही. मग लोकशाही प्रगल्भ झाली असे म्हणायचे तरी कसे? विदेशात जाऊन सर्वधर्मसमभावाच्या गप्पा मारायच्या व देशात धार्मिक असमानतेला आडून प्रोत्साहन तरी द्यायचे किंवा मूकदर्शक बनून राहायचे हे किती काळ चालणार? पोलीस व न्यायपालिकेतील सुधारणांचा विषय गेल्या आठ दशकांपासून नुसता चर्चिलाच जात आहे. याविषयीचे अनेक अहवाल आले, पण अंमलबजावणी शून्य. सत्तेच्या बळावर सर्व यंत्रणांना वेठीस धरून राजकीय स्वार्थासाठी सारे नियम व कायदे पायदळी तुडवायचे यातच राज्यकर्ते धन्यता मानत आलेले. त्यांना यातून सर्वंकष सत्तेचा आनंद मिळतो, पण यात सामान्यांची नाहक ससेहोलपट होते त्याचे काय?

न्याय हा श्रीमंतांना मिळतो, गरिबांना नाही अशी धारणा या देशात अशाने रूढ होऊ लागते. पोलीस यंत्रणेचे वर्तन त्यात भरच घालणारे आहे. काही वर्षांपूर्वी गडचिरोलीतील सूरजागड परिसरात नवे पोलीस ठाणे उभारले गेले. उद्देश हाच की तेव्हा सक्रिय असलेल्या नक्षलींपासून तेथे सुरू असलेल्या खनिज उत्खननाला संरक्षण मिळावे. हा हेतू ठीक. मात्र, या ठाण्याला सोयीसुविधा पुरवण्याची जबाबदारी खाण- उद्योजकांनीच घेतली. आता काही दिवसांपूर्वी नवी मुंबई विमानतळ परिसरात सुरू झालेल्या पोलीस ठाण्याला अशाच सुविधा या विमानतळाचे संचालन करणाऱ्या उद्योगपतीने पुरवल्या. तेही जाहीर कार्यक्रम करून. एरवीही पोलीस रस्त्यावर लावण्याचे संरक्षक कठडे, ब्रेथलायझर आदी मिळवण्यासाठी श्रीमंतांच्या दारात कायम उभे असतात. हे सारे सामान्य नागरिकांच्या लक्षात येत नसेल काय? मग कारवाईचा मुद्दा आला की सामान्यांना एक तर धनिकांना दुसरा न्याय असे वर्तन या यंत्रणेकडून घडते. ही भेदभावाची वागणूक पाहून लोकांच्या मनात या यंत्रणेवर असलेल्या विश्वासाला तडा जात असतो, त्याचे काय? व्यवस्थेतील प्रत्येक यंत्रणा ही जनतेला उत्तरदायी असायला हवी, हे लोकशाहीतील खरे सूत्र. प्रत्यक्षात या यंत्रणा राज्यकर्त्यांना उत्तरदायी राहण्यात समाधान मानतात. हे संविधानाचे उल्लंघनच, पण त्याबद्दल हाक ना बोंब. कारण सामान्यांना विचारतो कोण हीच भावना अलीकडे प्रबळ झालेली. म्हणूनच वरून आदेश आला की उचला त्याला ही वृत्ती बळावत चालली. वर्दीत वावरणाऱ्यांच्या अशा वर्तनामुळे विकासाची आधीच खडतर वाट धूसर होते आहे, विरत जाते आहे, हे आता तरी लक्षात घ्यायला हवे.

---

# शिक्षण हेच संरक्षण!

अन्यथा
गिरीश कुबेर
girish.kuber
@expressindia.com
@girishkuber

**गेल्या आठवड्यात** आपल्या जवळच्या आशियाई देशातील एका महत्त्वाच्या व्यक्तीची भेट झाली. ते त्यांच्या देशात चीनविषयक खात्याचे प्रमुख आहेत. चीनचं सगळं काही माहिती असतं त्यांना. वर्षातला बराच काळ चीनमधेच जातो त्यांचा. पुस्तकं वगैरे आहेत त्यांची चीनवर. माणूस अत्यंत अभ्यासू. त्यामुळे चीनकडे खूप वेगवेगळ्या नजरेनं बघत असतात ते. या गप्पांत असं काही सांगत होते चीनविषयी की थक्क व्हायला होत होतं. बऱ्याच विषयांवर सांगण्यासारखं आहे. ते नंतर कधी तरी. तूर्त आपल्याला भेडसावणाऱ्या एका मुद्द्याविषयी.

मुद्दा विद्यार्थ्यांच्या स्थलांतराचा. बोलता बोलता विषय निघाला. भारतीय मुलं/मुली शिक्षणासाठी कुठे कुठे जात असतात वगैरे. एकेकाळी स्थलांतराबाबत मेक्सिको आघाडीवर होता. मग चीन. आता आपण आहोत. विकसित म्हणजे अमेरिका, युरोपातले अनेक देश, इंग्लंड वगैरे आहेतच. पण अगदी इंडोनेशिया, मलेशिया, युक्रेन, रशिया वगैरे जिथे मिळेल संधी तिथे भारतीय विद्यार्थी शिक्षणासाठी जात असतात. त्यातल्या अनेकांचं म्हणणं हे स्थलांतर दोन कारणांनी होतं. एक तर इंडोनेशिया, मलेशिया, युक्रेन, रशिया वगैरे देशांतल्या विद्यापीठांत प्रवेश मिळणं वगैरे खूप सोपं आहे. आणि दुसरं त्यापेक्षा महत्त्वाचं कारण म्हणजे आपल्यापेक्षा तिकडे शिक्षण स्वस्त आहे. 'या' देशांतलं ठीक. तिथनं शिकून आल्यावर काहीतरी समकक्ष परीक्षा द्यावी लागते. ती दिली की 'त्या' शिक्षणाचा उपयोग इकडे करायला हे विद्यार्थी तयार. ते ठीक. पण खरा प्रश्न आहे तो अमेरिका, इंग्लंड, युरोपातले अनेक देश अशा ठिकाणी जाणाऱ्या आपल्या मुलांचा.

हा प्रश्न आहे कारण त्यांना परत मायदेशी यायचं नसतं. तिकडे अगदी हॉटेलात, दुकानांत कामं करून ते चार पैसे कमावतील, त्यातनं पुढच्या कोणत्या ना कोणत्या शिक्षणाची सोय करत राहतील. असं करत रहायचं. का? तर परत भारतात जायची वेळ येऊ नये म्हणून. खरं तर एरवी या परदेशस्थ विद्यार्थ्यांचं भारत-प्रेम बघून, आपले पंतप्रधान किंवा अन्य कोणी तिकडे गेले की त्यांना ओवाळायला, त्यांच्या पाया पडायला गर्दी करणाऱ्यांचा उत्साह पाहून कोणाला वाटेल किती जीव तुटत असेल त्यांचा भारतात परतण्यासाठी. शिवाय तिकडे ते किती उत्साहात सण साजरे करतात, भर रस्त्यावर लेझीम खेळतात, ढोल वाजवतात, गरब्याचा फेर धरतात, तिकडच्या निमंत्रणासाठी डोळ्यात प्राण आणून वाट पहात असणाऱ्या इथल्या कलाकारांना बोलावतात, जुनी मराठी गाणी नव्यानं ऐकतात, उकडीचे मोदक-बिदक खाऊ घालतात. असे किती दाखले द्यावेत त्यांच्या भारत-प्रेमाचे!!

> आमच्याकडे जगातली पहिली प्लास्टिक सर्जरी झाली. औषधांचा शोध आम्हीच लावला. विमानं तर आमचे पूर्वज किरकोळीत वापरायचे वगैरे पुराणातली वानगी त्यांच्याकडे नाहीत. त्यांच्याकडे आहे अस्सल विज्ञान. जगातले वैज्ञानिक तोंडात बोट घालतील असं शास्त्रोक्त संशोधन.

पण तरी भारतात काही ते परतत नाहीत. सगळं काही तिकडे राहून.

नेमकं यावरच ही महत्त्वाची व्यक्ती बोलत गेली. चीनची सगळ्यात मोठी ताकद ही परदेशातनं मायदेशात परतणारे गुणवान ही आहे, असं त्याचं म्हणणं. ते मांडताना त्यांनी आकडेवारी सादर केली. ती ऐकून माझे डोळे पांढरे पडायची वेळ आली.

कारण गेल्या वर्षी परदेशात शिकत असलेल्या चिनी विद्यार्थ्यांतले तब्बल ९६ टक्के विद्यार्थी चीनमधे परतले. इतकंच नाही तर त्यातल्या निम्म्यापेक्षा अधिकांनी काही ना काही नवनवे उद्योग सुरू केले, नव्या कल्पना प्रत्यक्षात आणल्या आणि भारतीय राज्यकर्त्यांचा ''नोकऱ्या मागणारे नको; तर नोकऱ्या देणारे व्हा'' हा सल्ला प्रत्यक्षात आणला. धक्का बसेल असा हाच मुद्दा नाही, तर दोन दशकांपूर्वी चीनमधे परत येणाऱ्या विद्यार्थ्यांचं प्रमाण अवघं दोन टक्के इतकं होतं. म्हणजे गेल्या जवळपास २० वर्षांत ते दोन टक्क्यांवरून थेट ९६ टक्क्यांपर्यंत गेलं. अगदी अलीकडे दोन वर्षांपूर्वी २०२४ साली जवळपास पाच लाख चिनी विद्यार्थी मायदेशी परतले. त्याआधीच्या चार-पाच दशकांत मिळून जगभरातल्या विद्यापीठांत जवळपास ७४ लाख चिनी विद्यार्थी होते. त्यातले तब्बल ६४ लाखांहून अधिक २०२४ पर्यंत परत चीनमधे आले. तेव्हा हे प्रमाण ८७ टक्के होतं. आता त्यात आणखी नऊ टक्क्यांची भर पडलीये.

हे ऐकल्यावर त्यांना विचारलं, परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांकडनं चीन सरकार काय हमी वगैरे घेतं की काय परत येण्यासाठी? का त्यांच्या पालकांना ओलीस ठेवतं?

यातलं काहीही चीन सरकारला करावं लागत नाही. सरकारनं केलंय, ते करतंय ते इतकंच. देशातल्या विद्यापीठांची, अन्य शैक्षणिक संस्थांची, विज्ञान संशोधनात गुंतलेल्यांची परिस्थिती चीन सरकारने इतकी सुधारलीये की ''परदेशात असं काय आहे जे आपल्याकडे नाही'' असा प्रश्न विचारला तर सहज ''काहीही नाही'' असंच उत्तर येईल. यासंदर्भात त्यांनी दाखला दिला तो त्सिंगहुआ (Tsinghua) या विद्यापीठाचा. हे बीजिंगमध्ये आहे. संगणक विज्ञान, उच्च दर्जाची अभियांत्रिकी, गणिताधारित संशोधन ही या विद्यापीठाची बलस्थानं. या क्षेत्रात या विद्यापीठाचा लौकिक गेल्या काही वर्षांत किती वाढला असावा?

तर अमेरिकेतल्या मॅसेच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी म्हणजे जगद्विख्यात 'एमआयटी' या संस्थेला आता त्सिंगहुआ टक्कर देतंय. अगदी तोडीस तोड म्हणता येईल अशी स्पर्धा. ''एक तर माओ यांच्यानंतरचा चीनचा प्रत्येक सत्ताधीश हा कोणत्या ना कोणत्या क्षेत्रातला अभियंता असतो. त्यामुळे त्यांना अभियांत्रिकी शिक्षणाचं महत्त्व फार. चिनी सत्ताधीशांनी विद्यापीठांच्या गुणवत्ता सुधारणांवर सातत्यानं इतकं लक्ष केंद्रित केलंय की ही विद्यापीठं जागतिक पातळीवरची मानली जाऊ लागलीयेत'', असं त्यांनी सांगितल्यावर मी मायदेशातली परिस्थिती आठवून मान खाली घातली. झेझियांग विद्यापीठाबाबतही असंच म्हणतात. हॉर्वर्ड, ऑक्सफर्ड-केंब्रिजला स्पर्धा वाटू लागलीये या विद्यापीठांची. जगभरातली सर्वोच्च म्हणता येतील अशी हजार विद्यापीठं निवडली तर त्यात एकट्या चीनमधली २३४ आहेत. परत नुसती सर्वोच्च १०० घेतली तर त्यातही १६ विद्यापीठं चिनी आहेत. पहिल्या पन्नासात ही संख्या पाच आहे. म्हणजे त्यातही १० टक्के इतका वाटा एकट्या चीनचा. जगात अभियांत्रिकी, वैज्ञानिक कौशल्याचा एक निर्देशांक आहे. त्यातही देश म्हणून चीन आघाडीवर आहे. ते सांगत गेले आणि मला मौनाचं महत्त्व अधिकाधिक जाणवू लागलं.

आणि चिनी पंचाईत ही की हे सगळं ताजं, कोरं, आताच्या काळाचं करकरीत विज्ञान संशोधन आहे. म्हणजे आमच्याकडे जगातली पहिली प्लास्टिक सर्जरी झाली, औषधांचा शोध आम्हीच लावला, विमानं तर आमचे पूर्वज किरकोळीत वापरायचे वगैरे पुराणातली वानगी नाहीत. अस्सल विज्ञान. जगातले वैज्ञानिक तोंडात बोट घालतील असं शास्त्रोक्त संशोधन. ''त्याचमुळे आज चीन 'एआय' (आर्टिफिशियल इंटलिजन्स- कृत्रिम प्रज्ञा) विकासाच्या मुद्द्यावर अमेरिकेला घाम फोडतोय'' ही अधिकारी व्यक्ती म्हणाली. खरंय त्यांचं. औषधं, रसायन विज्ञान, एआय, अभियांत्रिकी, ऑटोमेशन, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा वगैरे असं एक क्षेत्र नाहीये की ज्यात चीनची मक्तेदारी नाही.

या चर्चेचा खरा धक्का शेवटी आला. चीन शिक्षणावर वर्षाला ९० हजार कोटी डॉलर्स (९०० बिलियन डॉलर्स) इतका प्रचंड खर्च करतो. त्या देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या चार-साडेचार टक्के रक्कम शुद्ध शिक्षणावर खर्च होते, असं त्यांनी सांगितलं. याचं अजिबात आश्चर्य वाटलं नाही. कारण हे माहिती होतं. धक्का होता तो या अधिकाऱ्यांनी दिलेल्या दृष्टिकोनात. ''चीनचा शिक्षणावरचा खर्च हा अमेरिकेच्या संरक्षणावरच्या खर्चाइतका, कदाचित कांकणभर जास्तही आहे.''

'शिक्षण हेच संरक्षण' हा संदेश देईल असं यापेक्षा अधिक परिणामकारक उदाहरण असेल कोणतं?

---

# डेसिबलच्या दहशतीविरुद्ध डॉ. यशवंत ओक यांनी कसा केला होता संघर्ष?

विशेष विश्लेषण
विनायक परब
vinayak.parab@loksatta.com

> डीजेविरोधात उभ्या राहिलेल्या विद्यानंद बापट यांच्या संघर्षाने ध्वनिप्रदूषणाचा प्रश्न पुन्हा एकदा सार्वजनिक चर्चेच्या केंद्रस्थानी आणला आहे. या चर्चेत एक नाव अभावानेच ऐकू येते ते डॉ. यशवंत ओक यांचे. ८० च्या दशकापासून ध्वनिप्रदूषणाच्या विरोधात ते लढले. त्यांच्यामुळेच देशात ध्वनिप्रदूषण नियमन आणि नियंत्रण नियमावली अस्तित्वात आली.

**डॉ. ओक यांनी काय केले?**

भारतात आवाज हा केवळ त्रासदायक घटक नसून सार्वजनिक आरोग्याला धोका निर्माण करणारे प्रदूषण आहे, ही भूमिका वैज्ञानिक पुराव्यांसह न्यायालयात नेण्याचे महत्त्वाचे काम डॉ. यशवंत ओक यांनी केले. आज देशात अस्तित्वात असलेली ध्वनिप्रदूषण नियंत्रणाची कायदेशीर चौकट, रात्रीच्या वेळी ध्वनिक्षेपकांवरील निर्बंध, शांतता क्षेत्रांची संकल्पना आणि डेसिबल मर्यादांबाबतची सार्वजनिक चर्चा यामागे डॉ. ओक यांचा दीर्घ संघर्ष दडलेला आहे.

**उत्सवाला आवाजाची जोड कधी मिळाली?**

ढोल-ताशे, बँजो, डीजे, लाऊडस्पीकर आणि फटाक्यांच्या प्रचंड आवाजाला 'उत्सवाचे अपरिहार्य लक्षण' मानण्याची मानसिकता आपल्या समाजात इतकी रुजली आहे की, त्यावर प्रश्न उपस्थित करणेही अनेकदा धोकादायक ठरते. आवाज कमी करा, एवढी साधी मागणी केली तरी त्याचा अर्थ उत्सव बंद करा, असा घेतला जातो. आवाजाची मर्यादा ओलांडली गेली तरी त्याला विरोध करणाऱ्यालाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाते. ही मानसिकता समजून घेतल्याशिवाय डॉ. ओक यांचा संघर्ष समजणार नाही.

**एका साध्या अनुभवातून निर्माण झालेला प्रश्न**

१९६७ मध्ये इंग्लंडमध्ये पाच वर्षे बालरोगतज्ज्ञ म्हणून काम केल्यानंतर डॉ. यशवंत ओक भारतात परतले आणि त्यांना लगेच जाणवलेला फरक होता तो शांतता आणि गोंगाट यामधला. त्यांनी या प्रश्नाचा वैज्ञानिक अभ्यास सुरू केला. १९७९ मध्ये केईएम रुग्णालयातील प्रा. पी. पी. कर्णिक यांच्याकडून त्यांना अत्याधिक आवाजामुळे श्रवणशक्तीवर होणाऱ्या परिणामांची माहिती मिळाली. त्यानंतर जर्मनीतील डॉ. आयसिंग यांच्या उच्च ध्वनीपातळी आणि उच्च रक्तदाबाच्या संबंधावरील संशोधनाचा त्यांनी अभ्यास केला. दरम्यान, जागतिक आरोग्य संघटनेनेही ध्वनिप्रदूषणाच्या परिणामांकडे गांभीर्याने पाहण्यास सुरुवात केली होती. यातून डॉ. ओक एका महत्त्वाच्या निष्कर्षाप्रत पोहोचले तो म्हणजे, आवाज हा केवळ कानांचा प्रश्न नाही; तो संपूर्ण शरीराचा आणि मानसिक आरोग्याचा प्रश्न आहे.

**संघर्षाची सुरुवात घरापासून**

डॉ. ओक यांच्या सोसायटीजवळ सुरू झालेल्या औद्योगिक शेडमुळे होणारा प्रचंड आवाज हा त्यांचा पहिला प्रत्यक्ष संघर्ष ठरला. त्यांनी त्याविरोधात न्यायालयात दाद मागितली. अखेरीस त्या औद्योगिक उपक्रमावर निर्बंध आले. त्यानंतर त्यांनी रुग्णालयाबाहेरच्या सार्वजनिक आरोग्याच्या लढ्याची जबाबदारी स्वीकारली. १९८०च्या दशकात मुंबईत 'डिस्को दांडिया' सुरू झाला. खेळाच्या मैदानांवर रात्रभर चालणाऱ्या कार्यक्रमांमधील प्रचंड क्षमतेच्या ध्वनिक्षेपकांमुळे परिसरातील रहिवाशांना मोठा त्रास होत होता. डॉ. ओक यांनी अशा एखाद्या कार्यक्रमाविरोधात तक्रार करण्यापेक्षा प्रश्नाला कायदेशीर आणि सार्वजनिक आरोग्याचा आधार दिला. 'सोसायटी फॉर क्लीन एन्व्हायर्नमेंट'च्या माध्यमातून त्यांनी ध्वनीपातळीची माहिती गोळा केली. पोलीस कायद्यातील तरतुदींचा अभ्यास केला. वृत्तपत्रांतून या प्रश्नावर लेखन केले. त्याला महाराष्ट्रभरातून प्रतिसाद मिळाला. शेकडो नागरिकांनी ध्वनिप्रदूषणाच्या तक्रारी पाठवल्या. यातून एक गोष्ट स्पष्ट झाली, ती म्हणजे हा काही मोजक्या संवेदनशील लोकांचा प्रश्न नव्हता. त्रास सर्वत्र होता. अभाव होता तो सामूहिक प्रतिकाराचा.

**न्यायव्यवस्थेला महत्त्वाचा प्रश्न विचारला**

१९८५ मध्ये आवाजाबाबतच्या जागतिक संशोधनाचा संदर्भ देत डॉ. ओक यांनी उच्च न्यायालयाला एखाद्या नागरिकाला दुसऱ्या नागरिकाच्या आवाजापासून राज्य संरक्षण देऊ शकते का, हा महत्त्वाचा प्रश्न विचारला. उत्तर शोधण्यासाठी न्यायालयाने नेमलेल्या तज्ज्ञ समितीने ध्वनिक्षेपकांच्या वापरावर वेळेच्या आणि जागेच्या मर्यादा घालण्यासह अनेक सूचना केल्या. शांतता क्षेत्रांमध्ये विशेष संरक्षण, रात्रीच्या वेळी ध्वनिक्षेपकांवर बंदी आणि अनावश्यक कर्कश आवाजावर नियंत्रण यासारख्या संकल्पना पुढे आल्या. पण अनेकांना हा परंपरा तसेच धर्मावरील हल्ला वाटला. पण डॉ. ओक यांनी ध्वनिप्रदूषणाकडे पाहण्याची दृष्टी बदलण्यास सरकारलाही भाग पाडले. पूर्वी फक्त 'सार्वजनिक त्रास' म्हणून पाहिल्या जाणाऱ्या आवाज या घटकाकडे डॉ. ओक यांच्या लढ्यानंतर प्रदूषण या दृष्टिकोनातूनही पाहिले जाऊ लागले.

पण नियम असूनही विविध परवानग्यांच्या आधारे रात्री उशिरापर्यंत ध्वनिक्षेपक सुरू ठेवले जात होते. मग पुन्हा न्यायालय. डॉ. ओक, डॉ. प्रदीप राव आणि पर्यावरण कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे कायद्याची अंमलबजावणी करण्याची मागणी केली. न्यायालयानेही ध्वनिप्रदूषण नियंत्रणासंबंधी कायदे आणि नियम अधिक सुसंगत करण्याचे निर्देश दिले. त्यानंतरही पोलीस अनेकदा आवाजाची प्रत्यक्ष मोजणी करत नसल्याचे निदर्शनास आले. अखेरीस २००० साली केंद्र सरकारने 'ध्वनिप्रदूषण (नियमन आणि नियंत्रण) नियमावली' जारी केली. त्यानंतरही उत्सवांसाठी विशेष सवलतींची मागणी सुरूच राहिली.

**शांतता ही चैनीची गोष्ट नाही**

ध्वनिप्रदूषणाबाबत डॉ. ओक यांनी मांडलेला सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'जुलुमाचे श्रोते' हा होय. घराजवळ रात्री डीजे सुरू झाला आणि बंद खिडक्यांमधूनही सारे काही भेदत त्याचा आवाज घरात घुमत असेल, तर तुम्ही त्या आवाजाची निवड केलेली नसते. तुम्हाला तो ऐकवला जात असतो. याचे परिणाम केवळ कानांपुरते मर्यादित नसतात. सततचा अत्याधिक आवाज श्रवणशक्तीवर परिणाम करू शकतो, चिडचिड आणि मानसिक तणाव वाढवू शकतो, झोपेचा व्यत्यय आणू शकतो आणि कालांतराने आरोग्याच्या विविध समस्या निर्माण करू शकतो. म्हणूनच शांतता हा काही निवडक लोकांचा विशेषाधिकार नाही, हे न्यायव्यवस्थेवर बिंबवण्यात डॉ. ओक यांना यश आले. त्यांच्या या लढ्याने नागरिकांना शांततेचा अधिकार मिळवून दिला.

**विस्मृतीत गेलेल्या लढ्याची आठवण**

आज ध्वनिप्रदूषणाविरोधात लढणाऱ्या अनेक संस्था आहेत. या लढ्याचा इतिहास लिहिताना डॉ. यशवंत ओक यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. कारण त्यांनी या संघर्षाच्या निमित्ताने एक महत्त्वाची वैचारिक लढाई भारतासारख्या देशात जिंकली. त्यांनी समाजाला सांगितले की, मोठा आवाज म्हणजे मोठा उत्सव नव्हे. आणि न्यायालयाला वैज्ञानिक पुराव्यांच्या आधारे पटवून दिले की आवाजावर नियंत्रण हा केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नाही, तर तो सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आहे. आज डीजेच्या आवाजाविरोधात नव्याने उभ्या राहिलेल्या चळवळींकडे पाहताना म्हणूनच डॉ. यशवंत ओक यांची आठवण महत्त्वाची ठरते.

---

## लोकमानस

loksatta@expressindia.com

### मारहाणीचा प्रकार निषेधार्ह!

**केरळमधल्या इस्लामी** धर्मगुरूने स्त्रियांबाबत काढलेल्या उद्गारासंदर्भात ''तो 'धर्म', 'ती' धार्मिकता''! या अग्रलेखात (४ सप्टेंबर) 'विवेकाला रजा देऊन एकदा का कट्टरता बाणण्यास सुरुवात झाली की सर्व काही खुपू लागते आणि स्वधर्मीयांनाच मारणेही सुरू होते' हे मत पुण्यात विद्यानंद बापट यांना झालेल्या मारहाणीसंदर्भात तंतोतंत लागू पडते. हिंदू धर्म हा शेकडो वर्षांपासून सुधारणावादी आहे आणि महाराष्ट्रात व विशेषतः पुण्यात अनेक सुधारणावादी नेते, कार्यकर्ते होऊन गेले. गुलालाचे उच्चाटन काही वर्षांपूर्वीपासून उत्सवांच्या मिरवणुकांमधून झाले ही वायू प्रदूषणापासून मुक्त होण्याची चांगली गोष्ट झाली. मुळात इतर धर्मातील कट्टरतावादाबद्दल आपण बोलण्याचे काही कारण नाही. त्याचे दुष्परिणाम त्या त्या धर्मातले नागरिक बघतील, पण म्हणून आपणदेखील कट्टरतावाद जपला पाहिजे या म्हणण्याचे समर्थन होऊ शकत नाही. त्यामुळे अशा मारहाणीच्या घटनांचा निषेधच व्हायला हवा.

■ **ॲड. सुरेश पटवर्धन,** कल्याण

### सत्य किती दिवस दाबणार?

**'डीजेवरून काहूर!'** ही बातमी (४ सप्टेंबर) वाचली. डीजेच्या वाढत्या कर्कश आवाजाविरोधात कायदेशीर मुद्दा घेणारे सामाजिक कार्यकर्ते दयानंद बापट यांना दिवसाढवळ्या मारहाण ही सरकार पुरस्कृतच म्हणावी लागेल. कायदे, नियम धाब्यावर बसवून आमचा कार्यक्रम, आमचा आवाज ही मानसिकता बदलणार की नाही? डीजेच्या मर्यादेपेक्षा जास्त आवाजामुळे विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, लहान मुलांना त्रास सहन करावा लागतो, याचा विचार होणार की नाही? दुसरी घटना पुण्यातील प्रश्नांसंदर्भात आवाज उठवणारे संतोष पंडित यांना मध्यरात्री घरात घुसून बेकायदेशीर अटक केली गेली. सरकार सत्य बोलणाऱ्यांचा आवाज किती दिवस दाबणार?

■ **राजेंद्र पाडवी,** तळोदा, (नंदुरबार)

### मारून आवाज दबू शकत नाही

**पुण्यामध्ये विद्यानंद** बापट यांच्यावर झालेला हल्ला निषेधार्ह आहे. राज्याची सांस्कृतिक राजधानी या पुणे शहराच्या प्रतिमेला गालबोट लागणे शोभनीय नाही. बापट यांनी गणेशोत्सवातील कर्कश आवाजाला केलेला विरोध योग्यच आहे. अशा आवाजाचा रुग्ण, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक यांना किती त्रास होतो ते स्पष्ट आहे. शिवाय एखाद्या व्यक्तीला मारून कुणीही तिचे विचार, मत, व्यक्तिस्वातंत्र्य हिरावून घेऊ शकत नाही.

■ **सिद्धार्थ बागुल,** बोपोडी, पुणे

### गैरव्यवहारमुक्त भरती?

**'पारदर्शक भरतीसाठी** ऐवढे तरी कराच!' हा लेख (४ सप्टेंबर) वाचला. गेली अनेक वर्षे प्रलंबित असलेली वरिष्ठ महाविद्यालयातील ५,०१२ जागांच्या प्राध्यापक भरतीसाठी शासन निर्णयही सरकारने जाहीर केला. मात्र या भरतीची चर्चा सुरू झाल्यापासून गैरव्यवहार होण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे. नुकतीच 'लोकसत्ता'ने 'प्राध्यापकपदासाठी सव्वा कोटीची लाच' अशा मथळ्याखाली बातमीही प्रसिद्ध केली होती. या शासन निर्णयातदेखील मुलाखत मंडळ निवडण्याची जबाबदारी संस्थाचालकांना देऊन एक प्रकारे हा गैरव्यवहार होण्याच्या शक्यतेकडे दुर्लक्ष केल्याचे दिसते. उमेदवारांची शैक्षणिक पात्रता, अनुभव, संशोधन या गोष्टीचे मूल्यमापन केवळ मुलाखतीसाठी ग्राह्य धरले जाणार असून नियुक्ती ही केवळ मुलाखतीच्या गुणांच्या आधारे होणार असल्यामुळेच ही प्राध्यापक भरती गैरव्यवहारमुक्त व पारदर्शक होईल का, असा महाराष्ट्रातील तमाम पात्रताधारकांचा प्रश्न आहे.

■ **प्रा. मदन कानिफनाथ सोनवणे,**
मु. मोरगव्हाण, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर

### निवड करणारेही हितसंबंधीच

**'पारदर्शक भरतीसाठी** एवढे तरी कराच!' हा लेख वाचला. मुलाखतीसाठी निवड घेणाऱ्या समितीच्या सदस्यांची निवड मुलाखतीच्या अगदी काही काळ आधी केली जावी अशी सूचना त्यात आहे. परंतु हे सदस्य कुठल्या न कुठल्या महाविद्यालयाचे प्राध्यापक असतात आणि ते अनेक वर्षांपासून निवड प्रक्रियेत लाचखोरी किंवा हितसंबंध जोपासत आलेले आहेत. असे असताना उमेदवाराकडून देणगी मागितली जाणार नाही हे खात्रीने सांगता येत नाही.

■ **प्रशांत चव्हाण,** यवतमाळ

# आरे मेट्रो स्थानकाखाली खासगी बसला आग

**मुंबई :** पश्चिम उपनगरातील गोरेगाव आरे मेट्रो स्थानकाखाली एका खाजगी बसला शुक्रवारी संध्याकाळी ६.१५ च्या सुमारास अचानक आग लागली. महादेव ट्रॅव्हल्स कंपनीच्या स्लीपर कोच बसला आग लागली असून अग्निशमन दलाने या आगीवर नियंत्रण मिळवले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागली असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले.

या घटनेत कोणीही जखमी झाले नाही, मात्र बस पूर्णपणे जळून खाक झाली.

# मुख्यमंत्र्यांनी कोल्हापूरचा प्रवास करावा – राऊत

**कोल्हापूर :** शक्तीपीठ महामार्ग बांधण्यापूर्वी मुख्यमंत्र्यांनी राष्ट्रीय महामार्गावरून कोल्हापूरचा प्रवास करून प्रवाशांच्या यातना पाहाव्यात, अशी टीका खासदार संजय राऊत यांनी शुक्रवारी येथे पत्रकार परिषदेत केली. अनेक वर्षे दुरुस्तीच्या नावाखाली हा रस्ता रखडला असून प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे ते म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना केंद्रीय मंत्रिमंडळात मोठे बदल करायचे आहेत, मात्र भाजपमधील अंतर्गत बंडाळीमुळे ते शक्य होत नसल्याचा दावा ही राऊत यांनी केला. भाजपच्या मूळच्या चार केंद्रीय मंत्र्यांनी राजीनाम्यास नकार देत आधी अमित शहा यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे, तर संघाने उपपंतप्रधानपद निर्माण करून तेथे संघाचा कार्यकर्ता बसवण्याची भूमिका घेतली असल्याचे त्यांनी सांगितले.

गृहमंत्री देवेंद्र फडणवीस हे पुणे आणि नागपुरात 'डीजे'च्या मुद्द्यावर दुटप्पी भूमिका घेत असून, कायद्याची चौकट एक नसल्याने गोंधळ निर्माण होत असल्याची टीकाही त्यांनी केली. कोल्हापुरात उद्धव ठाकरे यांची शिवसेना अपयशी ठरल्याचा दावा राऊत यांनी फेटाळला.

# 'एसटीच्या एनसीएमसी कार्डसक्ती रद्द करा'

**मुंबई :** एसटी प्रवासात शासकीय सवलतींचा लाभ घेण्यासाठी महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) अनिवार्य केल्याने राज्यभरात मोठा गोंधळ उडाला आहे. गणेशोत्सवाच्या काळात पुरेशा पूर्वतयारीशिवाय या निर्णयाची अंमलबजावणी सुरू केल्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत असून ही जाचक अट तात्काळ रद्द करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) आमदार जयंत पाटील यांनी केली आहे. याप्रकरणी त्यांनी शुक्रवारी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना पत्र पाठवून लक्ष वेधले आहे.

राज्यभरात सध्या सर्व्हर डाऊन होणे, कार्डाचा तुटवडा असणे आणि रिचार्जमधील त्रुटींमुळे मोठी अडचण निर्माण झाली आहे. तांत्रिक गोंधळामुळे हक्काची सवलत नाकारली गेल्याने प्रवाशांना नाईलाजाने पूर्ण तिकिटाचे पैसे मोजावे लागत आहेत. या समस्येवर एसटी महामंडळाने १४ आणि ३० सप्टेंबरपर्यंत दिलेली तात्पुरती सूट म्हणजे केवळ मलमपट्टी आहे. या निर्णयामागील मूळ तांत्रिक अडचणी दूर झाल्याशिवाय हा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार नाही, असे जयंत पाटील यांनी पत्रात नमूद केले.

# गुणपत्रिकेत फेरफार करणाऱ्या विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द

**मुंबई :** सीईटीच्या गुणपत्रिकेत फेरफार करून अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचा प्रवेश मिळवण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका विद्यार्थ्याला मुंबई उच्च न्यायालयाने मोठा झटका दिला आहे. गुणपत्रिकेतील हेराफेरी उघडकीस आल्यानंतर न्यायालयाने या विद्यार्थ्याची याचिका फेटाळून लावत त्याचा तात्पुरता प्रवेश रद्द करण्याचा विद्यापीठाचा निर्णय कायम ठेवला आहे.

संबंधित विद्यार्थ्याने पुण्यातील एका खासगी विद्यापीठात बी. टेक. (रिन्यूएबल एनर्जी इंजिनीअरिंग) प्रथम वर्षासाठी तात्पुरता प्रवेश घेतला होता. मात्र, प्रवेशासाठी सादर केलेल्या गुणपत्रिकेविषयी विसंगती आढळल्याने विद्यापीठाला संशय आला. विद्यापीठाने खात्री करून १४ जुलै रोजी ई-मेलद्वारे त्याचा प्रवेश रद्द केला. या निर्णयाविरोधात विद्यार्थ्याने सीईटीच्या संकेतस्थळावरूनच गुणपत्रिका डाऊनलोड केल्याचा दावा करत १७ जुलै रोजी उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती.

---

## निडो होम फायनान्स लिमिटेड

**(पूर्वीचे नाव एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) (निडो), नोंदणीकृत कार्यालय टॉवर ३, ५वा मजला, विंग बी, कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (प), मुंबई - ४०००७० येथे स्थित आहे. प्रादेशिक कार्यालयः कार्यालय क्रमांक ४०७-४१०, ४था मजला, काकडे बिझ आयकॉन, सीटीएस २६८७बी, गणेशखिंड रोड, भांबुर्डे, शिवाजी नगर, पुणे, महाराष्ट्र ४११०१६ येथे.**

nido HOME FINANCE

### सरफेसी कायदा, २००२च्या कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, खालील कर्जदारांनी निडोकडून घेतलेल्या कर्ज सुविधांच्या मुद्दल आणि व्याजाची परतफेड करण्यास कसूर केली असून, सदर कर्ज खाते/ खाती अनुत्पादक मालमत्ता (एनपीए) म्हणून वर्गीकृत करण्यात आली आहेत. त्यांना त्यांच्या शेवटच्या ज्ञात पत्त्यावर, वित्तीय मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी अधिनियम २००२ (सरफेसी अधिनियम)च्या कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना बजावण्यात आली होती. सदर मागणी सूचनेव्यतिरिक्त, त्यांना या सार्वजनिक सूचनेद्वारे माहिती देण्यात आली आहे. कर्जदारांचा तपशील, तारण, थकीत देयके, कलम १३(२) अंतर्गत पाठवलेली मागणी सूचना आणि त्याअंतर्गत दावा केलेली रक्कम खालीलप्रमाणे दिली आहेः

**१. कर्जदार, सह-कर्जदार, जामीनदार यांचे नाव व पत्ता आणि कर्जाची रक्कमः-**
**स्वप्नील सुभाष शार्दुल (कर्जदार) संगिता सुभाष शार्दुल (सह-कर्जदार) सुभाष रघुनाथ शार्दुल (सह-कर्जदार)** एन-११, सी-१, १०/३, गजानन नगर हुडको, साई मैदानाजवळ, औरंगाबाद- ४३१००१
**LAN. NO.** : LAURSTH0000036095 **कर्ज करार दिनांकः** २९.१२.२०१७
**कर्जाची रक्कमः** रु. १८,९५,६६१/- (फक्त अठरा लाख पंच्याण्णव हजार सहाशे एकसष्ट रुपये)
**एनपीए दिनांकः** ०४.०८.२०२६ **मागणी सूचना दिनांकः-** २२.०८.२०२६
दिनांक २२.०८.२०२६ रोजीनुसार देय असलेली **रक्कम रु. १६,९५,५४६.९८/-** (रुपये फक्त सोळा लाख पंच्याण्णव हजार पाचशे शेहेचाळीस आणि अठ्ठ्याण्णव पैसे).

**मालमत्तेची अनुसूची :** एकूण ८०१०० चौ. मीटर क्षेत्रफळाच्या जमिनीपैकी सर्व भाग आणि भूखंड. गट क्रमांक २३४/२/पी, सेक्टर 'ई' (जे 'सारा परिवर्तन सेक्टर- 'ई'' म्हणून ओळखले जाते) येथे, विंग १०-'एन' इमारतीमधील स्टिल्ट पहिल्या मजल्यावर फ्लॅट क्रमांक ४ आहे. फ्लॅट क्रमांक ४चे कार्पेट क्षेत्रफळ ४९.७२ चौरस मीटर, बिल्ट-अप क्षेत्रफळ ५१.९२ चौरस मीटर, बाल्कनी क्षेत्रफळ ५.९८ चौरस मीटर आणि ओपन टेरेस क्षेत्रफळ ४.०० चौरस मीटर आहे. हे गाव सावंगी, सिडको औरंगाबाद येथे असून मुख्यालय उपनिबंधक, औरंगाबाद १च्या हद्दीत येते. **सदर मालमत्तेच्या सीमा खालीलप्रमाणे आहेतः** पूर्वः फ्लॅट क्रमांक ३, विंग क्रमांक ९, पश्चिमः फ्लॅट क्रमांक ३, विंग क्रमांक १०, दक्षिणः फ्लॅट क्रमांक ५, विंग क्रमांक १० आणि डक्ट, उत्तरः प्लॉट क्रमांक बाजूची मार्जिनल जागा.

**२. कर्जदार, सह-कर्जदार, जामीनदार यांचे नाव व पत्ता आणि कर्जाची रक्कमः-**
**शेखर दौलत सुर्यवंशी (कर्जदार) सोनाली शेखर सुर्यवंशी (सह-कर्जदार)**
घर क्रमांक १०/१२९८, शांती नगर, रेल्वे ड्रेनेजजवळ, भुसावळ जळगाव- ४२५२०१
**LAN. NO.** : L2450STHL000005331622 **कर्ज करार दिनांकः** ३१.१०.२०२३
**कर्जाची रक्कमः** रु. २८,७४,४१८/- (फक्त अठ्ठावीस लाख चौऱ्याहत्तर हजार चारशे अठरा रुपये.)
**एनपीए दिनांकः** ०४.०८.२०२६ **मागणी सूचना दिनांकः-** १३.०८.२०२६
दिनांक १३.०८.२०२६ रोजीनुसार देय असलेली **रक्कम रु. २८,४०,४१६.६६/-** (अठ्ठावीस लाख चाळीस हजार चारशे सोळा आणि पैसे सहासष्ट फक्त).

मालमत्तेची अनुसूचीः बिगरशेती भूखंडाच्या पूर्व-उत्तर बाजूचा तो संपूर्ण तुकडा प्लॉट क्र. १०. एकूण २७९.०० चौ.मी. क्षेत्रफळापैकी, ज्याचे क्षेत्रफळ ७९.०० चौ.मी. आहे, त्यावर उभ्या असलेल्या निवासी दुमजली इमारतीसह. तळमजल्याचे बांधकाम क्षेत्रफळ ४४.८२ चौ.मी. आणि पहिल्या मजल्याचे बांधकाम क्षेत्रफळ १६.२३६ चौ.मी. असून, एकूण बांधकाम क्षेत्रफळ ६१.०५६ चौ.मी. आहे. या मालमत्तेचा महानगरपालिका घर क्रमांक जुना १०/११६३ आणि नवीन घर क्रमांक झेड/२पी/१००००६०८ असून, ती टी.पी. योजना क्र. २ भूखंड क्र. ७० अंतर्गत येते, भुसावळ नगर परिषदेच्या हद्दीत, मौजे सातारे, तालुका भुसावळ, जिल्हा जळगाव- ४२५२०१. सीमाबद्धः पूर्वः त्याच सर्व्हे क्रमांकातील भूखंड क्र. ९, दक्षिणः सदर भूखंडाचा काही भाग आणि अंशतः ६ मीटर रुंद रस्ता, पश्चिमः त्याच सर्व्हे क्रमांकातील भूखंड क्र. १०, उत्तरः त्याच सर्व्हे क्रमांकातील भूखंड क्र. ५.

**३. कर्जदार, सह-कर्जदार, जामीनदार यांचे नाव व पत्ता आणि कर्जाची रक्कमः-**
**गोपीनाथ लालजी दळवी (कर्जदार) रेणुका गोपीनाथ दळवी (सह-कर्जदार)**
गल्ली नंबर २२ इंदिरा नगर दक्षिण भाग ०४ इंदिरा नगर न्यू बयाजीपुरा गणपती मंदिर औरंगाबाद, ४३१००१
**LAN. NO.** : LAURSTH0000065224 **कर्ज करार दिनांकः** २८.०१.२०१९
**कर्जाची रक्कमः** रु. १५,६६,१११/- (फक्त पंधरा लाख सहासष्ट हजार एकशे अकरा रुपये)
**एनपीए दिनांकः** ०४.०८.२०२६ **मागणी सूचना दिनांकः-** २२.०८.२०२६
दिनांक २२.०८.२०२६ रोजीनुसार देय असलेली **रक्कम रु. १४,०८,१०४.८७/-** (चौदा लाख आठ हजार एकशे चार आणि सत्याऐंशी पैसे फक्त).

**मालमत्तेची अनुसूचीः** फ्लॅट नं. १, तळमजला, विंग ०१, ए४ प्रकारची इमारत, सारा स्वप्नांगन, कार्पेट मोजमाप ४६ चौ. मी., बिल्टअप ४९.६८ चौ. मी., गट नं. ९३/भाग आणि ९५/भाग, गंगापूर, जहांगीर, औरंगाबाद येथील सर्व भाग.
**सीमाबद्धः-** पूर्वः पार्किंग, पश्चिमः बाजूची मोकळी जागा, उत्तरः फ्लॅट क्र. २ विंग १, दक्षिणः पायवाट.

म्हणून, उपरोक्त कर्जदारांना आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी वर नमूद केलेली थकबाकी या सूचनेच्या ६० दिवसांच्या आत पूर्णपणे भरावी, अन्यथा उपरोक्त नमूद केलेल्या प्रतिभूतींची अंमलबजावणी करण्यासाठी स्वाक्षरी करणाऱ्यास सरफेसी कायद्यांतर्गत कारवाई करणे भाग पडेल. कृपया नोंद घ्यावी की, उक्त कायद्याच्या कलम १३(१३) नुसार, आमच्या संमतीशिवाय उपरोक्त संदर्भित प्रतिभूतींची विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करण्यास तुम्हाला प्रतिबंध आहे.

**ठिकाणः औरंगाबाद** — **सही/- अधिकृत अधिकारी**
**दिनांकः ०६.०९.२०२६** — **निडो होम फायनान्स लिमिटेडसाठी, (पूर्वीचे नाव एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड)**

---

## ICICI Bank

**शाखा कार्यालय :** आयसीआयसीआय बँक लिमिटेड, रघुवीर कॉम्प्लेक्स, जिल्हा कोर्ट समोर, अदालत रोड, औरंगाबाद- ४३१००१

### जाहीर सूचना – तारण मत्तेच्या विक्रीसाठी निविदा ई- लिलाव
**[ नियम ८(६) चे तरतुदीकडे पहा ]**
**स्थावर मिळकतीच्या विक्रीकरिता सूचना**

वित्तीय मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी अधिनियम, २००२ अन्वये तसेच सुरक्षा हितसंबंध (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८(६) च्या परंतुकासह स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.
सर्वसामान्य लोक आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदार यांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता जी सिक्युअर्ड क्रेडीटर यांच्याकडे गहाण/ चार्ज करण्यात आली असुन, त्याचा **प्रत्यक्ष ताबा** आयसीआयसीआय बँक लि.चे अधिकारी यांनी घेतला असून ती ''जसे आहे जिथे आहे'', ''जे आहे ते आहे'' आणि ''तेथे जे असेल ते'' या आधारे होणार आहे, त्याचे तपशील खाली देण्यात आले आहेत.

| अ. क्र. | कर्जदाराचे/सह-कर्जदाराचे/ हमीदाराचे नाव/ कर्ज खाते क्रमांक | काही असल्यास ज्ञात बोजासह तारण मत्तेचा तपशील | थकबाकी रक्कम ₹ | आरक्षित मूल्य (₹) / इसारा अनामत ठेव ₹ | मालमत्तेच्या परीक्षणाची तारीख आणि वेळ | ई-लिलाव तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| (ए) | (बी) | (सी) | (डी) | (ई) | (एफ) | (जी) |
| 1. | श्री पूजा वासुदेव व्यवहारे (कर्जदाराचे), वासुदेव नारायण व्यवहारे (सह-कर्जदाराचे), कर्ज खाते क्रमांकः LBAUR00004368130 | फ्लॅट क्र. १५, स्टिल्ट व दुसऱ्या मजल्यावर, साई अंबिका अपार्टमेंट, प्लॉट क्र. ०३, गट क्र. १०६, मु. नक्षत्रवाडी, संताजी पोलीस स्टेशन समोर, पैठण रोड, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र); मोजमापित क्षेत्र- कार्पेट एरिया ४२.७९ चौ.मी. + जिना व लॉबी क्षेत्रापैकी प्रमाणशीर सामायिक क्षेत्र १४.३९ चौ.मी. + बॉक्स व बाल्कनीचे क्षेत्रफळ १०.२४ चौ.मी. | ₹ १४,०५,५४२/- (ऑगस्ट २६, २०२६ पर्यंत) | ₹ १२,२५,०००/- / ₹ १,२२,५००/- | सप्टेंबर १६,२०२६ दुपारी ०२:०० ते संध्याकाळी ०५:००पर्यंत | सप्टेंबर २८,२०२६ सकाळी ११:०० पासून |

ऑनलाईन लिलाव **(URL Link-https://BidDeal.in) व्हॅल्यूट्रस्ट कॅपिटल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड** या ई-लिलाव एजन्सीच्या वेबसाईटवर आयोजित करण्यात येईल. तारणदार/नोटीसी यांना **सप्टेंबर २५, २०२६** रोजी **सकाळी १०.००** वाजेपूर्वी एकूण थकबाकी आणि पुढील व्याजासह रक्कम परतफेड करण्याची संधी देण्यात येत आहे. अन्यथा सदर तारण मालमत्तावरील परिशिष्टाप्रमाणे विक्री करण्यात येईल.
संभाव्य बोलीदारांनी बयाणा रक्कम (ईएमडी) **आयसीआयसीआय बँक लिमिटेड, रघुवीर कॉम्प्लेक्स, जिल्हा कोर्ट समोर, अदालत रोड, औरंगाबाद- ४३१००१** यांचेकडे डीमांड ड्राफ्ट (डीडी) (कॉलम ई पहा) **सप्टेंबर २५, २०२६** रोजी **संध्याकाळी ०४.००** वाजेपूर्वी सादर करावी आणि त्यानंतर त्यांनी त्यांचा प्रस्ताव फक्त वर नमूद वेबसाईटमार्फत **सप्टेंबर २५, २०२६** रोजी **संध्याकाळी ०५.००** वाजेपूर्वी ईएमडीच्या पैसे भरल्याच्या पुराव्यासाठी बँक पोचसह – डीडीची स्कॅन केलेल्या ईमेजसह सादर करणे आवश्यक आहे. कृपया नोंद घ्यावी, जर संभाव्य बोलीदारांना वेबसाईटमार्फत त्यांचे प्रस्ताव सादर करणे शक्य नसल्यास, स्वाक्षरीकृत निविदा दस्तावेजाची प्रत **आयसीआयसीआय बँक लिमिटेड, रघुवीर कॉम्प्लेक्स, जिल्हा कोर्ट समोर, अदालत रोड, औरंगाबाद- ४३१००१** येथे **सप्टेंबर २५, २०२६** रोजी **संध्याकाळी ५.००** वाजेपूर्वी सादर करता येतील. बयाणा रक्कम राष्ट्रीयकृत/वर्गीकृत बँकेकडील डीडी/पीओ **''आयसीआयसीआय बँक लिमिटेड''** यांच्या नावे **औरंगाबाद** येथे देय सादर करावा.
पाहणीसंबंधित, ई-लिलावाच्या शर्ती व अटी किंवा निविदा सादर करण्याशी संबंधित कोणत्याही खुलाशाकरिता कृपया संपर्क **आयसीआयसीआय बँक लिमिटेडशी ७२७६६७६७०३/९५६१०८७५२२** वर संपर्क करा.
कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व बोली स्विकारणे किंवा नाकारणेचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे राखीव आहे.
विक्रीच्या विस्तृत शर्ती व अटींकरिता कृपया भेटा **www.icicibank.com/n4p4s**

**दिनांक : सप्टेंबर ०५, २०२६** — **प्राधिकृत अधिकारी**
**ठिकाण : औरंगाबाद** — **आयसीआयसीआय बँक लिमिटेड**

---

## युनिटी स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड

UNITY Small Finance Bank

पाचवा मजला, टॉवर १, सीवूड्स ग्रँड सेंट्रल, सेक्टर-४०, सीवूड्स, सीवूड्स दरावे रेल्वे स्टेशनच्या वर, नवी मुंबई - ४००७०६

### ताबा सूचना
**(सुरक्षितता हितसंबंध (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ८(१) अंतर्गत)**

यास्तव, मी, **युनिटी स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड** (यापुढे ''यूएसएफबीएल'' म्हणून उल्लेखित)चा अधिकृत अधिकारी असून, जिचे नोंदणीकृत कार्यालय ५वा मजला, टॉवर १, सीवुड्स ग्रँड सेंट्रल, सेक्टर-४०, सीवुड्स, सीवुड्स दरावे रेल्वे स्टेशनच्या वर, नवी मुंबई- ४००७०६ येथे आहे, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (२००२चा ५४) अन्वये, आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२च्या नियम ३सह वाचन केलेल्या कलम १३ (१२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, उक्त कायद्याच्या कलम १३(२) अन्वये खाली नमूद केलेल्या तारखेची मागणी सूचना जारी केली आहे, ज्याद्वारे आपणास, कर्जदार (नावे आणि पत्ते खाली नमूद केलेले) यांना, उक्त सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत उक्त सूचनेत नमूद केलेली रक्कम आणि त्यावरील व्याज परतफेड करण्यास सांगितले आहे. खाली नमूद केलेल्या कर्जदाराने रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, खाली नमूद केलेल्या कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, मी, स्वाक्षरी करणाऱ्याने, कायद्याच्या कलम १३च्या उप-कलम (४) अन्वये, सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, २००२च्या नियम ८सह वाचून, मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः वर नमूद केलेल्या कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येत आहे की, त्यांनी सदर मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी केलेला कोणताही व्यवहार, खाली नमूद केलेल्या रकमेसाठी आणि त्यावरील व्याजासाठी **युनिटी स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड**च्या बोज्याच्या अधीन असेल. तारण ठेवलेल्या मालमत्तेची परतफेड करण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेसंदर्भात, कायद्याच्या कलम १३च्या उप-कलम (८)च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधले जात आहे.

| अनु. क्र. | कर्जदार(रां)चे/ सह-कर्जदार(रां)ची नावे | स्थावर मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे आहे | मागणी सूचना तारीख आणि रक्कम | ताब्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| २) | **शाखा : कळम** **कर्जदार : श्री. अविनाश हरिभाऊ उमप,** मु /पोस्ट-हिंगणगाव, ता.कळम, जि. धाराशिव-४१३५२८ **जामीनदार : १) सौ. ज्योती अविनाश उमप,** मु/पोस्ट-हिंगणगाव, ता.कळम, जि. धाराशिव-४१३५२८. | रु. २२,९०,८८९.८०/- ( रुपये बावीस लाख नव्वद हजार आठशे एकोण नवद रुपये आणि ऐंशी पैसे फक्त) + व्याज खर्च आणि इतर त्यावरील शुल्क (लागू असेल त्याप्रमाणे) दिनांक १३/११/२०२५ पासून लागू | **मालमत्ता क्र.२** **श्री. अविनाश हरिभाऊ उमाप आणि सौ. ज्योती अविनाश उमाप यांच्या नावे मालमत्तेचे गहाण.** फ्लॅट क्र.२१८ असलेल्या निवासी मालमत्तेचे सर्व सामाईक भाग, दुसरा मजला, बिल्डिंग ई-७/बी-२, प्लॉट क्र. आर-१, जमीन सर्वे नं.१२४, योजना ३१४/७५६ /टी/एस ईडब्ल्यूएस, एमआयडीसी, तालुका.लातूर शहर, लातूर आणि **खालीलप्रमाणे चर्तु:सीमा : पूर्व :** डक्ट, **पश्चिम :** जिना आणि लॉबी, **दक्षिण :** बिल्डिंग ची मागील बाजू, **उत्तर :** फ्लॅट क्र.२१७ **ताबा : प्रतिकात्मक** | राखीव किंमत रु. ९,००,०००/- ( रुपये नऊ लाख फक्त) ईएमडी रु. ९०,०००/- ( रुपये नव्वद हजार रुपये फक्त ) वाढीव बोलीची रक्कम : रु.२५,०००.००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) |
| ३) | **शाखा : ईट** **कर्जदार : मेसर्स. साई डेअरी आणि मिल्क प्रॉडक्ट प्रोप. अविनाश चंद्रकांत पवार, रा** : घर नं.३६४, घाटनांदूर, ता.भूम, जि. उस्मानाबाद. **जामीनदार : २) श्री. रमेश अशोक पवार, रा.** मु/पो. घाटनांदूर, ता. भूम, जि.उस्मानाबाद. | रु. ५,१२,७८८.६२/- ( रुपये पाच लाख बारा हजार सातशे अठ्ठयाऐंशी आणि बासष्ट पैसे फक्त) + लागु न केलेले व्याज + कायदेशीर खर्च दि. ०३/०४/२०२३ पासून | **मालमत्ता क्र.३** **अविनाश चंद्रकांत पवार यांच्या नावावर मालमत्ता** नोंदणीकृत गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे सर्व सामाईक भाग, घर क्र. ३६८, क्षेत्रफळ १०८९ चौ.फूट घाटनांदूर, ता.भूम, जि. उस्मानाबाद येथे आणि **खालीलप्रमाणे चर्तु:सीमा : पूर्व :** स्वत:च्या प्लॉट ची मालमत्ता, **पश्चिम :** रस्ता, **उत्तर :** रस्ता, **दक्षिण :** स्वत:च्या प्लॉटची मालमत्ता **ताबा : प्रतिकात्मक** | राखीव किंमत रु. २,१८,०००/- ( रुपये दोन लाख अठरा हजार फक्त) ईएमडी रु. २१,८००/- ( रुपये एकवीस हजार आठशे फक्त ) वाढीव बोलीची रक्कम : रु.२५,०००.००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) |
| | | | **मालमत्ता क्र.४** नोंदणीकृत गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे सर्व सामाईक भाग, घर क्र. ३६९, क्षेत्रफळ १०८९ चौ.फूट घाटनांदूर, ता.भूम, जि. उस्मानाबाद येथे आणि **खालीलप्रमाणे चर्तु:सीमा : पूर्व :** श्री. शिलावती पवार यांची मालमत्ता, **पश्चिम :** रस्ता, **उत्तर :** स्वत:ची मालमत्ता, **दक्षिण :** सुरेश पवार यांची मालमत्ता **ताबा : प्रतिकात्मक** | राखीव किंमत रु. २,१८,०००/- ( रुपये दोन लाख अठरा हजार फक्त ) ईएमडी रु.२१,८००/- (रुपये एकवीस हजार आठशे फक्त) वाढीव बोलीची रक्कम : रु.२५,०००.००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) |
| ४) | **शाखा : ईट** **कर्जदार : मेसर्स जगदंबा सिमेंट एजन्सी, प्रोप. श्री. भास्कर मोतीराम थोरात, रा :** मु/पोस्ट-जी पी घर क्र.३६५, डोकेवाडी, ता.भूम उस्मानाबाद. **जामीनदार : श्री. सुनी पोपटराव देशमुख, रा :** मु/पोस्ट-ईट ता.भूम, जि.उस्मानाबाद. | रु. ८,४३,१५२/- ( रुपये आठ लाख त्रेचाळीस हजार एकशे बावन्न फक्त ) + लागु न केलेले व्याज + कायदेशीर खर्च दि. १९/०३/२०२३ पासून | **मालमत्ता क्र.५** **भास्कर मोतीराम थोरात यांच्या नावे असलेली गहाण मालमत्ता: वस्तू क्र.१ :** नोंदणीकृत गहाण ठेवलेली मालमत्ता, ग्रामपंचायत घर क्र.३६५, डोकेवाडी, ता.भूम, जि.धाराशिव येथे स्थित, **खालीलप्रमाणे चर्तु:सीमा : उत्तर :** रस्ता, **दक्षिण :** भास्कर डोके यांचे घर, **पूर्व :** मंदाबाई खैरे यांचे घर, **पश्चिम :** रोहिदास चव्हाण यांचे घर **ताबा : प्रत्यक्ष** | राखीव किंमत रु. १,४०,०००/- ( रुपये एक लाख चाळीस हजार फक्त) ईएमडी रु. १४,०००/- ( रुपये चौदा हजार फक्त ) वाढीव बोलीची रक्कम : रु.२५,०००.००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) |
| | | | **मालमत्ता क्र.६** **वस्तू क्र.२ :** ग्रामपंचायत घर क्र. ३०२ असलेल्या मालमत्तेचे सर्व सामाईक भाग, डोकेवाडी, तालुका.भूम, जिल्हा.धाराशिव येथे स्थित, आणि **खालीलप्रमाणे चर्तु:सीमा : उत्तर :** सुरेश पवार, **दक्षिण :** वेताळ स्वामी मंदिर, **पूर्व :** बाबा मांडवे, **पश्चिम :** स्वत. **ताबा : प्रतिकात्मक** | राखीव किंमत रु. ६,३५,०००/- ( रुपये सहा लाख पस्तीस हजार फक्त) ईएमडी रु. ६,३५,०००/- ( रुपये त्रेसष्ट हजार पाचशे फक्त ) वाढीव बोलीची रक्कम : रु.२५,०००.००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) |
| | | | **मालमत्ता क्र.७** **वस्तू क्र.३ :** ग्रामपंचायत घर क्र. ३३२ असलेल्या मालमत्तेचे सर्व सामाईक भाग, डोकेवाडी, तालुका.भूम, जिल्हा.धाराशिव येथे स्थित, आणि **खालीलप्रमाणे चर्तु:सीमा : उत्तर :** खंडू थोरात, **दक्षिण :** तुकाराम थोरात, **पूर्व :** शासकीय रस्ता, **पश्चिम :** मांडूबाई थोरात. **ताबा : प्रतिकात्मक** | राखीव किंमत रु. १,५६,०००/- ( रुपये एक लाख छप्पन्न हजार फक्त) ईएमडी रु. १५,६००/- ( रुपये पंधरा हजार सहाशे फक्त) वाढीव बोलीची रक्कम : रु.२५,०००.००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) |
| ५) | **शाखा : ईट** **आदित्य ट्रेडर्स, प्रोप.धनाजी महारुद्र कारगल,** घर नं.२३०, चांदवड, ता.भूम, जि.उस्मानाबाद.**जामीनदार : श्री. ऋषिकेश आश्रू बर्गल,** ईट ता.भूम, जि.उस्मानाबाद. | रु. ४,७८,०६२/- ( रुपये चार लाख अठ्ठयाहत्तर हजार बासष्ट फक्त ) + लागु न केलेले व्याज + कायदेशीर खर्च, दिनांक १६/०९/२०२२ पासून | **मालमत्ता क्र.८** घर क्र.२३० येथील जमीन आणि बिल्डिंग यासह संपूर्ण मालमत्तेचेसामाईक भाग, क्षेत्रफळ ४०० चौ.मी., चांदवड, तालुका.भूम, जिल्हा.उस्मानाबाद आणि **खालीलप्रमाणे चर्तु:सीमा : पूर्व :** मोकळा रस्ता, **दक्षिण :** लक्ष्मण जानू कारगल यांची मालमत्ता,**पश्चिम :** खंडेराव यांची मालमत्ता, **उत्तर :** स्वत:ची जमीन. **ताबा : प्रतिकात्मक** | राखीव किंमत रु. ६,९०,०००/- ( रुपये सहा लाख नव्वद हजार फक्त ) ईएमडी : रु. ६९,०००/- ( रुपये एकोणसत्तर हजार फक्त ) वाढीव बोलीची रक्कम : रु.२५,०००.००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) |
| ६) | **शाखा : तुळजापूर** **कर्जदार : श्री. सचिन दत्ता भोसले, रा : शिवछत्रपती नगर.** | रु. २५,८४,९८०/- ( रुपये पंचवीस लाख चौऱ्याऐंशी हजार नऊशे ऐंशी फक्त) | **मालमत्ता क्र.९** गट क्र.१७८ असलेल्या मालमत्तेचे सर्व सामाईक भाग, प्लॉट क्र.०२, ०३ आणि ०७, सिंदफळ, ता.तुळजापूर, जि.धाराशिव-४१३६२३ येथे स्थित, **श्री. सचिन दत्ता भोसले यांच्या नावे** ३२६.०० चौ.मी. क्षेत्रफळाची **ताबा : प्रतिकात्मक** | राखीव किंमत : रु. ७,५०,०००/- ( रुपये सात लाख पन्नास हजार फक्त) ईएमडी : रु. ७५,०००/- ( रुपये पंच्याहत्तर हजार फक्त) वाढीव बोलीची रक्कम : रु.२५,०००.००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) |

टीप:

| अ. क्र. | तपशील | | तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|
| १. | दिनांक आणि ई-लिलावाची वेळ | अ.क्र.१ ते ६ साठी आणि मालमत्ता क्र.१ ते ९ | दि. २१/०९/२०२६ सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत. |
| २. | ईएमडी राखीव ठेवीसह बोली सादर करण्याचा शेवटची तारिख | | दि. २०/०९/२०२६ दुपारी ०४.०० वाजेपर्यंत |
| ३. | तपासणीची दिनांक आणि वेळ | अ.क्र.१ ते ६ साठी आणि मालमत्ता क्र.१ ते ९ | दि. १४/०९/२०२६ ते दि. १८/०९/२०२६ सकाळी १०:०० ते संध्याकाळी ५:०० वाजेपर्यंत |

**महत्त्वाची माहिती** - देखभाल शुल्क इत्यादींचा दावा करणाऱ्या संबंधित सोसायटीची काही देणी असू शकतात. त्यामुळे लिलावात ठेवलेल्या मालमत्तेसाठी संबंधित सोसायटीकडून किंवा सरकारी अधिकाऱ्यांकडून किंवा बिल्डरची कोणतीही थकबाकी न भरलेली कोणतीही थकबाकी याची खात्री करण्यासाठी बोलीदारांना सूचित केले जाते. संबंधित मालमत्तेवर काही देय असल्यास शुल्क बोलीदाराने वहन केले जाईल.

**टीप १.** बँकेकडे कोणतेही ज्ञात भार नसताना ताबा आहे. तथापि, संबंधित सोसायट्या, सरकारी / स्थानिक प्राधिकरण / मेंटेनन्स चार्जेसचा दावा करणाऱ्या संस्थांकडून काही देय असू शकतात. त्यामुळे बोलीदारांनी संबंधित सोसायटी / अधिकारी / बिल्डरकडून देय / शुल्क / भारांची पुष्टी करण्याचा सल्ला दिला जातो. संबंधित मालमत्तेवर देय / शुल्क / बोजा, जर काही देय असेल तर, बोलीदाराने वहन केले पाहिजे.

**PSB** द्वारे ई-लिलाव आयोजित केला जाईल. बोलीदारांना **https://baanknet.com** 'वेबसाइटवर लॉग इन करावे लागेल आणि स्वत:ची नोंदणी करावी लागेल. या संदर्भात कृपया लक्षात घ्या की केवायसी कागदपत्रांच्या पडताळणीसाठी २-३ दिवसांचा कालावधी लागतो. शेवटच्या क्षणी घाई गर्दी टाळण्यासाठी म्हणून बोली लावणाऱ्यांना केवायसी दस्तऐवजांची नोंदणी आणि अपलोड करण्याचा सल्ला दिला जातो. नोंदणी संबंधित प्रश्नांसाठी, संपर्क क्रमांक ८१०२६२२१४१ आहे आणि ईमेल आयडी **"support.baanknet@psballiance.com"** आहे.

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी, कृपया बँकेच्या वेबसाइटवर प्रदान केलेल्या **"https://www.bankofmaharashtra.in/properties_for_sale.asp"** या लिंकचा संदर्भ घ्यावा.

दिनांक : ०४/०९/२०२६
ठिकाण : सोलापूर
( टिप : स्वैर भाषांतर तफावत पडल्यास मूळ इंग्रजी ग्राह्य )

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन

SHREE

# ‘पारंपरिक’ लढत पुन्हा एकतर्फी?

## भारत-पाकिस्तान महिला संघ आज आमनेसामने

**वृत्तसंस्था, दुबई**




**महिला आशिया** चषक ट्वेन्टी-२० स्पर्धेत तुलनेने दुबळ्या प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व गाजवत उपांत्य फेरीतील स्थान आधीच निश्चित केलेल्या भारतीय संघाची आज, शनिवारी पाकिस्तानशी गाठ पडणार आहे. पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांतील या द्वंद्वाची उत्सुकता कायम असली, तरी इतिहास आणि दोन्ही संघांची लय पाहता भारताचे पारडे जड मानले जात आहे.

बहुराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारत-पाकिस्तान सामन्यांना नेहमीच मोठे महत्त्व मिळते. मात्र, अलीकडच्या काळात प्रत्यक्ष मैदानावरील लढती पूर्णपणे एकतर्फी झाल्याचे आणि त्यात भारतीय संघच सरस ठरत असल्याचे चित्र आहे. भारत आणि पाकिस्तानचे महिला संघ ट्वेन्टी-२० प्रारूपात आतापर्यंत १७ वेळा आमनेसामने आले असून यात भारताने १४ लढतींत बाजी मारली आहे. आता हाच दबदबा कायम राखण्यासाठी हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघ प्रयत्नशील असेल.

उपांत्य फेरी गाठल्यानंतरही भारतासाठी हा सामना केवळ औपचारिक राहणार नाही. आगामी महत्त्वाच्या स्पर्धा आणि विश्वचषक लक्षात घेता संघाला आपल्या काही उणीवा दूर करण्याची गरज आहे. विशेषतः मधल्या फळीतील फलंदाजांची कामगिरी भारतासाठी चिंतेचा विषय ठरत आहे. दुबई येथे सुरू असलेल्या आशिया चषकातील सलामीच्या लढतीत थायलंडवरील विजयात शफाली वर्माने शानदार अर्धशतकी खेळी केली. दुसऱ्या लढतीत भारताने हाँगकाँगचा धुव्वा उडवला, त्यात स्मृती मनधानाने उत्कृष्ट शतक साकारले. मात्र, स्मृती आणि शफाली या सलामीच्या फलंदाज वगळता भारताची एकही फलंदाज प्रभाव पाडू शकलेली नाही. त्यामुळे पाकिस्तानविरुद्ध संधी मिळाल्यास, त्यांनी कामगिरी उंचावणे गरजेचे आहे.

पाकिस्तानला विजय मिळवायचा असल्यास, सर्व प्रथम फलंदाजीतील उणीवा दूर कराव्या लागतील. गेल्या अनेक वर्षांपासून पाकिस्तानच्या संघाला फलंदाजांच्या निराशाजनक कामगिरीचा फटका बसत आहे. थायलंडविरुद्धच्या गेल्या सामन्यातही पाकिस्तानची अवस्था बिकट झाली होती. सुरुवातीलाच तीन फलंदाज बाद झाल्याने संघावर मोठे दडपण आले. अखेरीस पाकिस्तानने केवळ ११९ धावांचे आव्हान उभे केले, पण तुलनेने दुबळ्या थायलंडविरुद्ध त्यांना या धावा पुरेशा ठरल्या. आता भारताविरुद्ध त्यांच्या फलंदाजांना अधिक मोठे योगदान द्यावे लागेल. पाकिस्तानचा संघ सलामीची फलंदाज मुनीबा अली आणि कर्णधार फातिमा सना यांच्यावर प्रामुख्याने अवलंबून असेल.

## भारत-जपान संघांत ऐतिहासिक ट्वेन्टी-२० लढत

**नवी दिल्ली :** विश्वविजेता भारतीय पुरुष क्रिकेट संघ २२ सप्टेंबर रोजी जपानविरुद्ध प्रथमच आंतरराष्ट्रीय ट्वेन्टी-२० सामना खेळणार आहे. भारत-जपान राजकीय संबंधांना ७५ वर्षे पूर्ण होत असून त्या निमित्ताने होणाऱ्या वर्षभराच्या कार्यक्रमांना या सामन्याने सुरुवात होईल.

जपानमधील तोचिगी प्रांतातील सानो आंतरराष्ट्रीय क्रिकेट मैदानावर हा सामना होईल. दोन्ही संघ ‘सुजुकी चषका’साठी आमनेसामने येणार आहेत. जपान येथेच १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेपूर्वी संघरचना निश्चित करण्यासाठी, तसेच खेळाडूंना सामन्याचा सराव मिळवून देण्यासाठी ही लढत उपयुक्त ठरू शकेल.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) आणि जपान क्रिकेट संघटनेने (जेसीए) संयुक्त निवेदनाद्वारे या सामन्याची घोषणा केली. भारत-जपान देशांतील क्रीडा क्षेत्रातील सहकार्य व परस्पर संपर्क वाढवण्याच्या उद्देशाने ‘स्पोर्ट ७५’ हा उपक्रम राबवण्यात येत आहे. भारताने २०३६ मध्ये ऑलिम्पिक आणि पॅरालिम्पिक स्पर्धांचे यजमानपद मिळवण्याची व्यक्त केलेली महत्त्वाकांक्षा लक्षात घेऊन या उपक्रमाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे.

भारतीय संघाचे नेतृत्व श्रेयस अय्यर करेल, तर संघात वैभव सूर्यवंशी, अभिषेक शर्मा, जसप्रीत बुमरा यांसारख्या तारांकितांचाही समावेश असेल.

# ‘खराब’ कामगिरीनंतरही झ्वेरेव विजयी

## सलग दुसऱ्या फेरीतील संघर्षामुळे नाखुश

**वृत्तसंस्था, न्यूयॉर्क**

**ग्रँडस्लॅम कारकीर्दीत** प्रथमच अग्रमानांकित म्हणून खेळणाऱ्या जर्मनीच्या ॲलेक्झांडर झ्वेरेवला अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत सलग दुसऱ्या सामन्यात पाच सेटपर्यंत झुंजावे लागले. यानंतरही झ्वेरेवला विजय मिळवण्यात यश आले. मात्र, याबाबत तो फारसा समाधानी नव्हता. दुसऱ्या फेरीतील लढतीत माझी कामगिरी अत्यंत ‘खराब’ होती, असे सामन्यानंतर झ्वेरेव म्हणाला.

फ्रेंच स्पर्धेतील विजेतेपदानंतर झ्वेरेवकडून अपेक्षा वाढल्या. अमेरिकन स्पर्धेतही त्याने आगेकूच कायम राखली असली, तरी अद्याप त्याला सर्वोत्तम खेळ करता आलेला नाही. पहिल्या फेरीत त्याला लॉरेन्झो सोनेगोने पाच सेट झुंजवले. आता दुसऱ्या फेरीत फ्रान्सच्या क्वेंटिन हॅलिसने पुन्हा एकदा पाच सेटपर्यंत त्याच्या क्षमतेची कसोटी पाहिली. झ्वेरेवने ही लढत ६-४, ४-६, ७-६ (७-३), ६-७ (३-७), ६-३ अशी जिंकली. झ्वेरेव एकंदर कामगिरीबाबत नाखुश असला, तरी विजय मिळवणे सर्वांत महत्त्वाचे असे सांगत त्याने लवकरच सर्वोत्तम लय मिळण्याचा विश्वास व्यक्त केला.

‘‘मला पहिल्या दोन लढतींत संघर्ष करावा लागला हे खरे असले, तरी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या मी चांगल्या स्थितीत आहे. मी खराब खेळूनही जिंकत आहे. जेव्हा तुम्ही सर्वोत्तम टेनिस खेळत नसता, तेव्हा कसे जिंकायचे हे माहीत असणे हे देखील एक कौशल्य आहे. मी सध्या याच गोष्टीवर पकड मिळवली आहे. लवकरच मी सर्वोत्तम लयीत खेळताना दिसेन,’’ असे झ्वेरेव म्हणाला.



‘‘अमेरिकन टेनिस स्पर्धा माझ्यासाठी नेहमीच आव्हानात्मक ठरली आहे. येथील परिस्थितीमुळे इथे चांगला खेळ करणे खरोखर कठीण जाते. मात्र, मी यातून मार्ग काढेन,’’ असेही झ्वेरेवने सांगितले. तिसऱ्या फेरीत त्याची चिलीच्या अलेहांद्रो ताबिलोशी गाठ पडेल.

# सात्त्विक-चिराग उपांत्य फेरीत

## पुरुष एकेरीत श्रीकांतचे आव्हान संपुष्टात

**वृत्तसंस्था, शेन्झेन**



**भारताची पुरुष** दुहेरीतील आघाडीची जोडी सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टीने चीन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या (सुपर ७५० दर्जा) उपांत्य फेरीत धडक मारली. मात्र, पुरुष एकेरीत किदम्बी श्रीकांतचे आव्हान उपांत्यपूर्व फेरीतच संपुष्टात आले.

चौथ्या मानांकित भारतीय जोडीने ७० मिनिटे चाललेल्या अटीतटीच्या लढतीत डेन्मार्कच्या किम अस्ट्रुप आणि अँडर्स स्कारूप रॅस्मसेन जोडीवर २१-१३, १६-२१, २१-१८ असा विजय मिळवला. दुसरीकडे, श्रीकांतला हाँगकाँगच्या ली चेयुक यियू याच्याकडून १६-२१, १६-२१ असा सरळ गेममध्ये पराभव पत्करावा लागला.

सात्त्विक-चिरागने धडाकेबाज सुरुवात करत ५-१ अशी आघाडी घेतली. आक्रमक फटक्यांच्या जोरावर त्यांनी रॅलींवर नियंत्रण मिळवले. हीच लय कायम ठेवत भारतीय जोडीने १६-९ अशी भक्कम आघाडी घेतली आणि पहिला गेम सहज जिंकला. दुसऱ्या गेममध्ये डेन्मार्कच्या जोडीने खेळाचा वेग वाढवत भारतीय जोडीला तोडीसतोड उत्तर दिले. १५-१५ अशी बरोबरी असताना अस्ट्रुप आणि रॅस्मसेन यांनी सलग सहा गुण मिळवत निर्णायक आघाडी घेतली.

तिसऱ्या गेममध्ये एकवेळ १७-१७ अशी बरोबरी असताना सात्त्विक-चिरागने उत्कृष्ट खेळ करत सलग तीन महत्त्वाचे गुण मिळवले आणि २०-१७ अशी आघाडी घेतली. त्यानंतर डेन्मार्कच्या जोडीने आणखी एक गुण मिळवला. मात्र, भारतीय जोडीने संयम राखत पुढचा गुण जिंकला आणि सामना आपल्या नावे केला.


## गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : ६वा मजला, "बी" बिल्डिंग, गंगा ट्रूईनो, लोहेगाव, पुणे-४११०१४, महाराष्ट्र.

परिशिष्ट IV (रुल ८(१) पाहा) ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)

ज्याअर्थी, **गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**चे, यापुढे वरील कॉर्पोरेट / नोंदणीकृत कार्यालयाचे सुरक्षित धनको म्हणून संदर्भित, प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (यापुढे "उक्त ॲक्ट" म्हणून संदर्भित) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ३ यासह वाचलेल्या उक्त ॲक्टच्या सेक्शन १३ (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याकरिता खालील ऋणकोंवर फर्माविणारी खालील दिनांकित मागणी सूचना निर्गमित केली आहे.
ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, ऋणको तसेच आम जनतेस याद्वारा सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी **आज दिनांक १० जुलै, २०२६ रोजी** सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ च्या उक्त रुल्सच्या रुल ८ यासह वाचलेल्या उक्त ॲक्टच्या सेक्शन १३ (४) अंतर्गत त्याला / तिला प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.
विशेषकरून ऋणको तसेच आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार रक्कम व त्यावरील व्याजासह सुरक्षित धनकोच्या आकाराच्या विषयाधीन असणार आहे. सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता ॲक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (८) च्या तरतुदींकडे ऋणकोंचे लक्ष वेधीत आहोत. ताबा घेतलेल्या मालमत्तेचा तपशील याखाली देण्यात आला आहे.

| अनु क्र. | ऋणकोंची नावे | मालमत्तेचे वर्णन | ताबा घेतल्याची तारीख | सांविधिक मागणी सूचनेची तारीख | मागणी सूचनेमधील रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | संजय मोहनराव पगारे अंजू पगारे | पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - प्लॉट नं. ५५, मोजमापाचा एरिआ ११०.० चौ.मी., सीटीएस नं. १३८२, मौजे पल्ठण, ता. पल्ठण व जि. औरंगाबाद आणि **मालमत्ता पुढीलप्रमाणे सिमित** : पूर्व : अनिल कार्कोटक यांचे हाऊस, पश्चिम : सरस्वतीबाई घनवट यांचे हाऊस, उत्तर : रोड, दक्षिण : विद्या दौंड यांचे हाऊस. | ०२/०९/२०२६ | ११/११/२०२५ | **लोन नं. LAP02102000000005002826** रु. १२००७०३/- (रुपये बारा लाख सातशे तीन फक्त) वसूलीपर्यंत प्र. व. १५.८५% दराने व्याजासह ११/११/२०२५ रोजी प्रमाणे देय |

*जर कोणत्याही बाबतीत स्थानिक भाषेतील प्रसिद्धी व इंग्रजी वृत्तपत्राच्या प्रसिद्धीतील मजकुरात कोणतीही विसंगती आढळून आल्यास, "दि इंडियन एक्सप्रेस" या इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेली जाहिरात ग्राह्य धरण्यात येईल.*

स्थळ : औरंगाबाद, दिनांकित : ०५.०९.२०२६ स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी, गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड



## मुथूट हाउसिंग फायनान्स कंपनी लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय:टीसी क्र.१४/२०७४-७, मुथूट सेंटर, पुन्नेन रोड, तिरुवनंतपुरम-६९५०३४. CIN क्र. – U65922KL2010PLC025624
कॉर्पोरेट कार्यालय: १२/ए०१, तेरावा मजला, परीनी क्रेसेन्झो, प्लॉट क्र. सी३८ व सी ३९, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स-जी ब्लॉक (पूर्व), मुंबई-४०००५१ टेली क्र.: ०२२-६२७२८५१७
शाखेचा पत्ता: प्लॉट क्र. २२ ए, वॉर्ड एफ-७, नोंद. क्र. बी-८७/२३७, दीप नगर, स्टेट बँक ऑफ इंडिया समोर, सहकार चौकाजवळ, औरंगाबाद, महाराष्ट्र - ४३१००१
प्राधिकृत अधिकारी: संपर्क व्यक्ती: अमित शहाणे - ९७६४८२३७७९, ईमेल आयडी: authorised.officer@muthoot.com

### अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलावासाठी जाहीर सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ मधील नियम ८(६) च्या तरतुदीसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.
याद्वारे कर्जदार/ गहाणकार व जामीनदार आणि आम जनतेस सूचित करण्यात येते की सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ मधील अनुच्छेद १३(२) अंतर्गत जारी करण्यात आलेल्या मागणी सूचनेच्या अनुषंगाने मुथूट हाउसिंग फायनान्स कंपनी लि. यांचेकडे तारण/ भारग्रस्त असलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्तांचा सुरक्षित धनको मुथूट हाउसिंग फायनान्स कंपनी लि. च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी ताबा घेतलेला असून तिची पुढील कर्ज खात्यामध्ये कर्जदार/ गहाणकार व जामीनदारांकडून मुथूट हाउसिंग फायनान्स कंपनी लि. यांना घेणे असलेल्या थकबाकी अधिक व्याजाच्या वसुलीसाठी ‘जशी आहे जेथे आहे’, ‘जशी आहे जे काही आहे’, ‘तेथे जे काही आहे’ आणि ‘इतर कोणताही उपाय नाही’ तत्त्वावर विक्री करण्यात येईल. ही विक्री https://sarfaesi.auctiontiger.net/EPROC/ या वेब पोर्टलवर राबविण्यात येईल.

| अ. क्र. | कर्ज खाते क्र./ कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदार/ गहाणकाराचे नाव | थकबाकी रक्कम (रु.) पुढील लागू व्याज | ताब्याचा प्रकार व दिनांक | पाहणीचा दिनांक व वेळ | आरक्षित किंमत | बयाणा रक्कम | ई-लिलाव दिनांक व वेळ | बोली सादरीकरणाचा शेवटचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०१०४०८७६५२, १. अमोल रामराव चोरमळे २. परमेश्वर रामराव चोरमळे ३. शीतल शेषराव ढोणे, ४. रामराव देवराव चोरमळे ५. गणेश विठ्ठलराव टोगे (जामीनदार) | १२-ऑगस्ट-२०२६ रोजीनुसार रु. ९,२४,८२६.७४/- (रुपये नऊ लक्ष चोवीस हजार आठशे सव्वीस आणि चौऱ्याहत्तर पैसे फक्त) | २८-फेब्रुवारी-२०२६ रोजी प्रत्यक्ष ताबा | १८/सप्टेंबर/२०२६ स. ११.०० ते दु. ०३.०० वाजेपर्यंत | रु. ७,९२,०००/- (रुपये सात लक्ष ब्याण्णव हजार फक्त) | रु. ७९,२००/- (रुपये एकोणऐंशी हजार दोनशे फक्त) | १३.१०.२०२६, दु. १.०० ते २.०० वाजेपर्यंत | १२.१०.२०२६ स. १०.०० ते सायं. ०५.०० वाजेपर्यंत |
| | **तारण मालमत्तांचे वर्णन:** मिळकत क्र. १४०/१, रो हाऊस क्र. १४, क्षेत्रफळ सुमारे ३३० चौ.फू., बिल्ट-अप क्षेत्रफळ सुमारे ३३० चौ.फू., जोगेश्वरी गाव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद. चतुःसीमा: पूर्वेस – रो हाऊस क्र. २३, पश्चिमेस – १५ फुटी रस्ता, दक्षिणेस – रो हाऊस क्र. १३, उत्तरेस – रो हाऊस क्र. १५. | | | | | | | |

**अटी व शर्ती:-** १) विक्री ही पूर्णपणे सर्फेसी अधिनियम, २००२ अंतर्गत प्रचलित मार्गदर्शक तत्त्वे तसेच इच्छुक बोलीदार सादर करणार असलेल्या प्रस्ताव/निविदा दस्तावेजात नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. २) मालमत्तेची विक्री ही तीवरील बोज्यांसह ‘जशी आहे जेथे आहे’, ‘जशी आहे, जे काही आहे’, ‘तेथे जे काही आहे’ व ‘इतर कोणताही उपाय नाही’ तत्त्वावर करण्यात येईल. ३) इच्छुक बोलीदारांनी https://sarfaesi.auctiontiger.net/EPROC/ वर उपलब्ध असलेल्या ई-लिलाव पोर्टलवर उपलब्ध असलेल्या विहित बोली/ प्रस्ताव/ निविदा प्रपत्रात आपला प्रस्ताव/ बोली सादर करावी आणि त्यासोबत ‘मुथूट हाउसिंग फायनान्स कंपनी लिमिटेड’ यांचे नावे काढण्यात आलेली बयाणा रक्कम असावी. इच्छुक बोलीदारांनी बोली/ निविदा/ प्रस्ताव दस्तावेजांसह केवायसी दस्तावेज, म्हणजे PAN कार्ड, बोलीदाराचा ओळखीचा पुरावा आणि पासपोर्ट, निवडणूक आयोग ओळखपत्र, रेशन कार्ड, चालक परवाना इ. सारखा पत्त्याचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे. ४) मुथूट हाउसिंग फायनान्स कंपनी लि. च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार आणि मालमत्तांच्या उपलब्ध रेकॉर्डमध्ये जाहीर करण्यात आलेल्या बाबींशिवाय मालमत्तेवर कोणतेही बोजे/ दावे नाहीत. परंतु, सदर मालमत्तेच्या संदर्भात विक्री प्रमाणपत्राच्या नोंदणीच्या संदर्भातील मुद्रांक शुल्क, जीएसटी, नोंदणी शुल्के, हस्तांतरण शुल्के व इतर कोणतेही खर्च व अधिभार यांसह कोणतीही वैधानिक थकबाकी/ बोजे/ तिसऱ्या पक्षाने केलेली हक्क/ दावे/ थकबाकीची मागणी/ महापालिका कर, देखभाल/ सोसायटीची शुल्के, वीज व पाणी कर किंवा इतर कोणतीही थकबाकी ही जबाबदारी एमएचएफसीएल यांची नसेल आणि हा खर्च यशस्वी बोलीदार/ खरेदीदारास करावा लागेल. इच्छुक बोलीदारांनी बोजे, मालमत्तेचा मालकी हक्क यांबाबत स्वत: स्वतंत्रपणे चौकशी करावी आणि ते सर्व पाहून स्वत:चे समाधान करून घ्यावे. ५) यशस्वी बोलीदार/ खरेदीदारास प्राधिकृत अधिकाऱ्यांनी प्रस्ताव स्वीकारण्याच्या दिनांकापासून पुढील कामकाजाच्या दिवसांच्या आत अंतिम बोली रकमेच्या २५% एवढ्या रकमेचा (तोवर भरलेली १०% बयाणा रक्कम धरून) भरणा करावा लागेल. ६) विक्री किमतीपैकी उर्वरित ७५% रकमेचा भरणा प्राधिकृत अधिकाऱ्यांनी यशस्वी खरेदीदारास विक्रीची निश्चिती कळविण्याच्या दिवसापासून ३० दिवसांचे आत किंवा प्राधिकृत अधिकाऱ्यांनी लेखी संमती दिलेल्या वाढीव कालावधीत करावा लागेल. यशस्वी बोलीदाराने भरणा करण्यात कसूर केल्यास तोवर भरलेली रक्कम जप्त करण्यात येईल आणि मालमत्ता पुन्हा विक्रीस काढण्यात येईल आणि अशी कसूर करणाऱ्या खरेदीदारास सदर मालमत्ता आणि रकमेवर कोणताही दावा करता येणार नाही. ७) ज्या इच्छुक बोलीदारांनी बयाणा रक्कम सादर केलेली आहे आणि ई-लिलाव पोर्टलवर लॉग इन करणे, बोली सादर करणे, ई-बोली प्रक्रियेचे प्रशिक्षण प्राप्त करणे इ. बाबत काही मदत हवी असल्यास त्यांनी कामकाजाच्या दिवशी कामकाजाच्या वेळेत मे. ई-प्रोक्युरमेंट टेक्नोलॉजीज लिमिटेड – (ऑक्शन टायगर), हेल्पलाईन क्र.: ९१७२५२८७२७ व ६३५१८ ९६६४३, श्री मौलिक श्रीमाळी, ई-मेल आयडी: maulik.shrimali@auctiontiger.net येथे संपर्क साधावा आणि मालमत्तेशी संबंधित कोणत्याही चौकशीसाठी वर नमूद प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधावा. ८) कोणतेही कारण न देता कोणतीही/ सर्वच बोली फेटाळण्याचा हक्क प्राधिकृत अधिकारी राखून ठेवतात. संभाव्य बोलीदारांकडून प्राप्त होणाऱ्या सर्व बोली एमएचएफसीएल यांचेविरुद्ध कोणतेही दायित्व/ दाव्याविना परत करण्यात येतील. ९) अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदाराचे लक्ष सर्फेसी अधिनियमातील अनुच्छेद १३ मधील उप-विभाग ८ कडे वेधण्यात येते. १०) कर्जदार/ गहाणकार आणि आम जनतेने हे लक्षात घ्यावे की येथे दिलेला लिलाव काही कारणास्तव अयशस्वी ठरल्यास सुरक्षित धनको खाजगी वाटाघाटीच्या माध्यमातून सुरक्षा हिताची अंमलबजावणी करू शकतात. ११) विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया आमच्या वेबसाईटला https://muthoothousing.com येथे आणि मे. ई-प्रोक्युरमेंट टेक्नोलॉजीज लिमिटेड – (ऑक्शन टायगर) च्या वेब पोर्टलला https://sarfaesi.auctiontiger.net/EPROC येथे भेट द्यावी.
याद्वारे कर्जदार/ जामीनदार/ गहाणकारांना सर्फेसी अधिनियमाच्या सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्समधील नियम ८ व ९ अंतर्गत ३० दिवसांची वैधानिक सूचना देण्यात येत आहे.

स्थान: औरंगाबाद दिनांक: ०५-सप्टेंबर-२०२६ स्वा/- प्राधिकृत अधिकारी मुथूट हाउसिंग फायनान्स कंपनी लिमिटेडकरिता



## एलआयसी हौसिंग फायनान्स लि.

LIC HFL LIC HOUSING FINANCE LTD

बॅक ऑफिस : ‘‘जीवन श्री’’, १९०९, विद्यापीठ रोड, शिवाजीनगर, पुणे ४११०१६, महाराष्ट्र

### मागणी नोटीस

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ (सरफेसी ॲक्ट) च्या सेक्शन १३(२) मधील अंतर्गत सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल २००२ चा रूल ३(१) सह**

जसे की, खाली सही करणार **एलआयसी हौसिंग फायनान्स लिमिटेड (एलआयसीएचएफएल)** चे अधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रीकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या सेक्शन १३ (२) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या सेक्शन १३ (१२) व रूल ३ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करुन खालील कर्जदार/जामिनदार यांना मागणी नोटीस बजावली होती की, त्यांनी सदर नोटीसीत नमूद केलेली येणे असलेली एकूण रक्कम सदर नोटीस प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांच्या आत परत करावी. विविध कारणास्तव ह्या नोटीसेस संबंधित कर्जदार/मालमत्ताधारक/जामिनदार यांच्या पर्यंत पोचू शकल्या नाहीत. या नोटीसींच्या प्रती खाली सही करणार यांच्याकडे उपलब्ध आहेत आणि संबंधित कर्जदार/ मालमत्ताधारक/ जामीनदार त्यांच्या इच्छेनुसार खाली सही करणार यांच्याकडून कामाच्या कोणत्याही दिवशी कार्यालयीन वेळेत घेऊन जाऊ शकतात. परंतु, संबंधित कर्जदार यांना नोटीस देण्यात येते की त्यांचा जसा संबंध असेल त्यानुसार तो/ती किंवा त्यांचा वारस यांना ज्यांना लागू असेल त्यांनी ही नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत नोटीशीत नमूद केलेली रक्कम अधिक त्यावरील रक्कम जमा करण्याच्या तारखेपर्यंत होणारे व्याज, त्याचप्रमाणे कर्जाच्या आणि इतर करारानुसार तसेच संबंधितांनी केलेल्या करारानुसार अशी सर्व रक्कम एलआयसी हौसिंग फायनान्स लिमिटेड यांना परत करावीत. कर्जदारांच्या सुरक्षेसाठी आणि करारातील अटींनुसार कराराची कागदपत्रे व खाली नमूद केलेली मालमत्ता **एलआयसी हौसिंग फायनान्स लिमिटेड** यांच्याकडे गहाण ठेवण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव व पत्रव्यवहारासाठी पत्ता | गहाण मालमत्तांचा तपशिल | मागणी नोटीशीची तारीख | मागणी रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. शिवाजीराव शंकरराव बोडखे (कर्ज क्र. ६००२०६०००१८७२) | प्लॉट नं.३, आर एम -३००, बजाज नगर, एमआयडीसी वाळूंज, औरंगाबाद, महाराष्ट्र -- ४३११३६ | २५-०८-२०२६ | १,४६७,६९७.८६ |
| २) | सौ. ज्योती रमेश वाघ श्री. रमेश विठ्ठल वाघ (कर्ज क्र. ६००२०६०००४२७७) | सदनिका क्रमांक २४/०५, सर्व्हे क्रमांक १७ (भाग), सेक्टर-बी, एन-१५-बी, सदनिका क्रमांक २४/५, ११ वी योजना, एलआयजी प्रकार, सिडको, गाव मुकुंदवाडी, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र | २५-०८-२०२६ | ३,०४४,०१३.१२ |
| ३) | श्री/सौ. अक्षयकुमार जगदीश शर्मा श्री./सौ. पूजा अक्षयकुमार शर्मा (कर्ज क्र. ६००६०१००००८२) | फ्लॅट नं. १२२, दत्तप्रभा, प्लॉट नं. २३, मौजे धुळे शिवार, स. नं. ४८७, कोलावळे नगर, धुळे, महाराष्ट्र -- ४२४००२ | २४-०८-२०२६ | १,५५०,१५८.७९ |
| ४) | श्री/सौ. अक्षयकुमार जगदीश शर्मा श्री./सौ. पूजा अक्षयकुमार शर्मा (कर्ज क्र. ६००६०१००००८५) | फ्लॅट नं. १२२, दत्तप्रभा, प्लॉट नं. २३, मौजे धुळे शिवार, स. नं. ४८७, कोलावळे नगर, धुळे, महाराष्ट्र -- ४२४००२ | २४-०८-२०२६ | ७८९,१४७.१७ |
| ५) | श्री./सौ. वरपे भीमराव (कर्ज क्र. ६२०६०००००७०९) | ब्लॉक नं. १०, प्लॉट नं. आरएक्स-४/५, पारिजात सहकारी गृहनिर्माण संस्था, बजाज नगर, एमआयडीसी वाळूंज, वाळूंज, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), महाराष्ट्र -- ४३११३६ | २५-०८-२०२६ | ४५८,६४१.०२ |
| ६) | श्री. वरपे भीमराव सौ. लता भीमराव वरपे (कर्ज क्र. ६२०६०००००९११) | ब्लॉक नं. १०, प्लॉट नं. आरएक्स-४/५, पारिजात सहकारी गृहनिर्माण संस्था, बजाज नगर, एमआयडीसी वाळूंज, वाळूंज, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), महाराष्ट्र -- ४३११३६ | २५-०८-२०२६ | १८५,८४२.७४ |
| ७) | श्री. वरपे भीमराव (कर्ज क्र. ६२०६००००२९९८) | ब्लॉक नं. १०, प्लॉट नं. आरएक्स-४/५, पारिजात सहकारी गृहनिर्माण संस्था, बजाज नगर, एमआयडीसी वाळूंज, वाळूंज, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), महाराष्ट्र -- ४३११३६ | २५-०८-२०२६ | ३३९,७३१.९६ |
| ८) | श्री. रहिमुद्दीन गौस साहिख (कर्ज क्र. ६२०६००००३५८८) | घर क्रमांक ३-८-४३/१, सीटीएस क्रमांक ६८४३/२, शीट क्रमांक २१, मंजूरपुरा, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), महाराष्ट्र -- ४३१००१ | २५-०८-२०२६ | २०,८८०,६५०.६६ |
| ९) | श्री. रहिमुद्दीन गौस साहिख (कर्ज क्र. ६२०६००००४२२४) | घर क्रमांक ३-८-४३/१, सीटीएस क्रमांक ६८४३/२, शीट क्रमांक २१, मंजूरपुरा, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), महाराष्ट्र -- ४३१००१ | २५-०८-२०२६ | ४,४२३,३८७.९४ |
| १०) | श्री. प्रवीण लक्ष्मी रॉय सौ. उर्मिला लक्ष्मीप्रसाद रॉय (कर्ज क्र. ६२०६००००४८६४) | घर क्रमांक ०१, एस. नं. ५१/७, मावसिंगपुरा, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), महाराष्ट्र -- ४३१००१ | २५-०८-२०२६ | ६०५,४१९.९६ |
| ११) | श्री. वरपे भीमराव (कर्ज क्र. ६२०६००००४९७९) | ब्लॉक नं. १०, प्लॉट नं. आरएक्स-४/५, पारिजात सहकारी गृहनिर्माण संस्था, बजाज नगर, एमआयडीसी वाळूंज, वाळूंज, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), महाराष्ट्र -- ४३११३६ | २५-०८-२०२६ | २४५,६०२.२९ |
| १२) | श्री. शिवाजीराव शंकरराव बोडखे (कर्ज क्र. ६२०६००००६४९२) | प्लॉट क्रमांक आरएम-३००, बजाज नगर, वाळूंज एमआयडीसी, वडगाव कोल्हाटी, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), महाराष्ट्र -- ४३११३६ | २५-०८-२०२६ | २,२२३,४१४.४६ |
| १३) | श्री. अजीम शेखलाल शेख सौ. मुस्कान सलीम शेख (कर्ज क्र. ६२०६००००७५५२) | फ्लॅट क्रमांक ०५, स्टिल्ट पहिला मजला, यश रेसिडेन्सी, सीटीएस क्रमांक १९९२०, पदमपुरा, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), महाराष्ट्र -- ४३१००१ | २५-०८-२०२६ | ३,१०८,९१९.९८ |
| १४) | कु. ज्योती कांबळे श्री. जावेद शेख (कर्ज क्र. ६२०६००००८२२२) | रो हाउस नं. बी-१, इन्फिनिटी होम्स, गट नंबर १३, पडेगाव, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), महाराष्ट्र -- ४३१००५ | २५-०८-२०२६ | २,९४८,७९५.५४ |
| १५) | श्री. शरद तुकाराम ठाकरे सौ. कल्पना शरद ठाकरे श्री. पंडित आनंदा देशमुक जामीनदार (कर्ज क्र. ६२१२०००१६९५२) | प्लॉट क्र. ३६अ वर बंगला, तळ + पहिला मजला, एस. नं. १००४/१ (भाग), जेबापूर रोड, सामोदे, तालुका साक्री, जिल्हा धुळे, महाराष्ट्र -- ४२४३०६ | २७-०८-२०२६ | १,१०६,६५५.६५ |
| १६) | श्री./सौ. सुप्रिया महेश कोकणे श्री./सौ. महेश शांताराम कोकणे (कर्ज क्र. ६२१२००००३३३१) | फ्लॅट नं. ३०५, तिसरा मजला, तुळशी पूजा अपार्टमेंट, प्लॉट नं. ०१, एस. नं. ६४/३ए + ३बी, राज राजेश्वरी मंगल कार्यालयाजवळ, जागृति नगर क्रमांक ०३, गोजरे मळा, पंचक शिवार, जेलरोड, नाशिक, महाराष्ट्र --४२२१०१ | २७-०८-२०२६ | ७२६,८३७.६४ |
| १७) | श्री./सौ. रावसाहेब संभाजीराव देसले श्री./सौ. चित्रा रावसाहेब देसले (कर्ज क्र. ६२१२००००५८६९) | फ्लॅट क्र. २०४, दुसरा मजला, डी विंग, द कम्फर्ट झोन, गट नं. २७३/(१+२)/३, एकदंत नगर, अंबड शिवार, बुरकुले हॉल जवळ, अंबड, नाशिक, महाराष्ट्र -- ४२२०१० | २७-०८-२०२६ | १,१९९,६२९.८३ |
| १८) | श्री./सौ. भास्कर बबन बेनके श्री./सौ. धनश्री भास्कर बेनके (कर्ज क्र. ६२१२०००१०३३३) | फ्लॅट क्रमांक ०३, पहिला मजला, आर्निक अपार्टमेंट, प्लॉट क्रमांक ०६, एस. क्रमांक ३२०/३/३, स्ट्रॉबेरी प्लेग्रुप स्कूल समोर, पाथर्डी शिवार, पाथर्डी फाटा, नाशिक, महाराष्ट्र -- ४२२०१० | २७-०८-२०२६ | २९५,४४६.४० |
| १९) | श्री./सौ. भास्कर बबन बेनके श्री./सौ. धनश्री भास्कर बेनके (कर्ज क्र. ६२१२०००१०३३५) | फ्लॅट क्रमांक ०३, पहिला मजला, आर्निक अपार्टमेंट, प्लॉट क्रमांक ०६, एस. क्रमांक ३२०/३/३, स्ट्रॉबेरी प्लेग्रुप स्कूल समोर, पाथर्डी शिवार, पाथर्डी फाटा, नाशिक, महाराष्ट्र -- ४२२०१० | २७-०८-२०२६ | १,४५१,७३१.७९ |
| २०) | श्री./सौ. अविनाश महेंद्र जाधव श्री./सौ. महेंद्र जगन्नाथ जाधव (कर्ज क्र. ६२१२०००११६३८) | बंगला ‘‘छाया’’, प्लॉट क्र. १९, तळमजला, एस. नं. १३१/१ + २, गट नं. ३४८, शिवकृपा मिठाई समोर, महादेव मंदिराजवळ, कोणार्क नगर, आडगाव शिवार, नाशिक, महाराष्ट्र -- ४२२००३ | २७-०८-२०२६ | २,७०५,५५०.५२ |
| २१) | श्री. अविनाश महेंद्र जाधव श्री. महेंद्र जगन्नाथ जाधव (कर्ज क्र. ६२१२०००११६३९) | बंगला ‘‘छाया’’, प्लॉट क्र. १९, तळमजला, एस. नं. १३१/१ + २, गट नं. ३४८, शिवकृपा मिठाई समोर, महादेव मंदिराजवळ, कोणार्क नगर, आडगाव शिवार, नाशिक, महाराष्ट्र -- ४२२००३ | २७-०८-२०२६ | २,९४३,८६२.५७ |
| २२) | श्री. हिरालाल लक्ष्मण सोळसे (कर्ज क्र. ६२१२०००१२४७१) | रो हाउस नं.०५, ग्राउंड आणि एक, एस. नं. २२९/२, उमा पार्क रो हाउस, श्री कृष्ण नगर, लॉईर्स बेकरी समोर, महिंद्रा स्टॅम्पिंग गेटजवळ, अंबड डीजीपी नगर, नगर शहर, नगर शहर लिंक महाराष्ट्र - ४२२००२ | २७-०८-२०२६ | १,४२९,४१४.२७ |
| २३) | श्री./सौ. नितीन शंकर अहिरे श्री./सौ. प्रमोद शंकर पाटील श्री./सौ. पल्लवी नितीन अहिरे (कर्ज क्र. ६२१२०००१२७६५) | प्लॉट क्र. ७, तळ मजला, पश्चिम बाजू, एस. ११/१, पाटीलवाडी, कलंत्री बंगल्याजवळ, सूर्यवंशी भवनाजवळ, सौयगाव शिवार, तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक, महाराष्ट्र -- ४२३२०३ | २७-०८-२०२६ | १,९४४,३८९.९६ |
| २४) | श्री. हरविंदर सिंह सेठी सौ. राजकुवर सिंह सेठी (कर्ज क्र. ६२११०००३८१०) | फ्लॅट क्र. बी-९०२ ९वा मजला, ‘‘बी’’ विंग, ‘क्राबी’, ‘‘सम्राट ट्रॉपिकानो’’, प्लॉट क्र. ०१ आणि ०२ स.नं. ४४/३+४२/२, सेरेने मिडोज्जवळ, हॉटेल बॉबीच्या मागे, सिग्नेचर प्रोजेक्टच्या मागे, गंगापूर रोड आनंदवल्ली शिवार, नाशिक, ता. जि. नाशिक-४२२०१३ | १९-०८-२०२६ | ६,२७१,८६३.५४ |
| २५) | श्री. राहुल दत्तात्रय पगार कु. विद्या बाबुलाल शेलार (कर्ज क्र. ६२११००००४४०९) | फ्लॅट क्र. ०२, पहिला मजला, ‘‘साई सखा पार्क अपार्टमेंट’’, सीटीएस क्र. ४८६२+४८६३, शिवाजी चौक, कठडा, जुने नाशिक, द्वारका, नाशिक गावठाण, नाशिक ४२२०११ | १९-०८-२०२६ | ९९५,६८२.९८ |
| २६) | श्री. हरिश्चंद्र दागु वाघ सौ. दीपमाला हरिश्चंद्र वाघ (कर्ज क्र. ६२१९०००००४७५) | भूखंड क्र. ५१, स. नं. १८५/अ/२/२/ब्री/१, सरस्वती नगर, रहमत मस्जिद जवळ, येवला मनमाड रोड, मनमाड शिवार, ता. नांदगाव जि. नाशिक ४२३१०४ | १९-०८-२०२६ | १,५००,९९३.०० |
| २७) | श्री. निलेश चंद्रकांत निकम सौ. अश्विनी निलेश निकम (कर्ज क्र. ६००२११००००९७४) | फ्लॅट क्र. १८, ४था मजला, प्लॉट क्र. १८ आणि १९, ‘‘मंगलमूर्ती रेसिडेन्सी अपार्टमेंट’’, स.नं. १२३/ए/१, भूखंड क्र. १८ आणि १९, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, निगल पार्क ध्रुव नगर, मौजे गंगापूर, नाशिक ४२२०१२ | १९-०८-२०२६ | २,३२९,६४३.४४ |
| २८) | श्री. किरण अंबादास खाडे सौ. शारदा अंबादास खाडे (कर्ज क्र. ६००२११०००१८०३) | फ्लॅट क्र. डी-१६, ४था मजला, ‘‘श्री पेठकर प्लाझा को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लिमिटेड विंग डी’’, एस नं. ९९/अ/१/१बी, सीटीएस नं. ५८७०/अ/२, स्टेट बँक ऑफ इंडिया जवळ, समोर. पंचवटी प्राईड अपार्टमेंट, पेठ नाका, पेठ रोड नाशिक शिवार, ता. जि. नाशिक-४२२००३ | १९-०८-२०२६ | २,१७४,२६१.१३ |

जर संबंधित **एलआयसी हौसिंग फायनान्स लि.** ला सदर रक्कम परत करण्यास असफल ठरले तर, वर नमूद केलेल्या तारण मालमत्तेच्या संदर्भात सदर कायदा कलम १३(४) आणि लागू होणारे रूल्स यांसह संबंधित कर्जदार यांच्या खर्च आणि परीणामांसह जोखमीवर कारवाई करण्याचा एलआयसी हौसिंग फायनान्स लि. ला अधिकार आहे. सरफेसी ॲक्ट मधील तरतुदींनुसार संबंधित कर्जदार / जामीनदार यांना सदर मालमत्ता, कोणत्याही प्रकारे विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य मार्गाने **एलआयसी हौसिंग फायनान्स लि.** च्या लेखी अनुमतीशिवाय हस्तांतरीत करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. सदर तरतुदींचा भंग केल्यास सदर व्यक्ती सरफेसी ॲक्टमधील तरतुदींनुसार शिक्षा आणि / किंवा दंडास पात्र ठरेल.

दिनांक : ०५.०९.२०२६ ठिकाण : पुणे (मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा) सही /- अधिकृत अधिकारी एलआयसी हौसिंग फायनान्स लि.


हे पत्र वैदेही ठकार यांनी मालक द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, ई-२५, एमआयडीसी, वाळुंज, छत्रपती संभाजीनगर येथे छापून मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१ येथे प्रसिद्ध केले. लोकसत्ता **मुंबई कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७.
**महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **छत्रपती संभाजीनगर कार्यालय :** १०३, गोमटेश मार्केट, न्यू गुलमंडी रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००१. दूरध्वनी :०२४०-२३४६३०३, **नागपूर कार्यालय :** प्लॉट. न. ३८, ऑडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७.
■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** * (*पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) R. N. I. Reg. No. 1591/57 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई. ■ कोलकाता, दिल्लीसाठी प्रत्येकी १० रूपये.

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# चतुरंग

WWW.LOKSATTA.COM | आपल्या प्रतिक्रिया व सूचना देण्यासाठी chaturang@expressindia.com | शनिवार, ५ सप्टेंबर २०२६

लघुकथा

**आयुष्याचा कोरा कॅनव्हास**

- चारुशीला बिडवे

पान ४



आतील पानांत

लग्नाची पंचविशी - वंदना कुलकर्णी/ २

आहारानंदी थाळी - अमिता गद्रे/ ३

क्रीडा संस्कृ'ती' - डॉ. नीता ताटके/ ३

चारूशीला कुलकर्णी



# नि:स्पृह ज्ञानदान...!

**''बाई, मला लग्न नाही करायचंय... मला शिकायचंय...'' नाशिकच्या एका मुलीने केलेल्या या विनवणीने महापालिका शिक्षिका असलेल्या कुंदा बच्छाव यांचं मन इतकं हेलावलं की, अशा अनेक मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा त्यांनी चंगच बांधला. गावपातळीवरील शिक्षण ते जागतिक स्तरावर होत असलेले शाळेतले उपक्रम पाहिले की, कुंदा यांचे प्रयत्न या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी किती मोलाचे आहेत, याची प्रचीती येते.आजच्या शिक्षकदिनी त्यांना 'राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात येत आहे. त्या निमित्ताने त्यांच्या नि:स्पृह ज्ञानदानाविषयी.**

''बाई, मला तुमच्यासारखी शिक्षिका व्हायचं आहे. खूप शिकायचं आहे. स्वतःच्या पायावर उभं राहायचं आहे. पण आई-बाबा लग्नासाठी मागे लागलेत. मला लग्न नाही करायचं...'' आईने हात करकचून धरलेली फाल्गुनी जिवाच्या आकांताने सांगत होती. त्या क्षणीच ठरलं. अशा अकाली बोहल्यावर चढणाऱ्या, शिक्षणाच्या मुख्य प्रवाहातून लांब फेकल्या जाणाऱ्या मुलींसाठी काम करायचं. त्यांच्या मागे कोणी उभं नसेल, पण त्यांची ''मॅडम खंबीरपणे उभी आहे.'' असं सांगणाऱ्या नाशिक महानगरपालिकेच्या 'आनंदवली' शाळेतील शिक्षिका कुंदा बच्छाव यांचा हा ठाम निर्धार त्यांच्यातील शिक्षिकेला आजही स्वस्थ बसू देत नाही.

मागील २१ वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या बच्छाव यांनी 'शैक्षणिक पालकत्व' या त्यांच्या उपक्रमाच्या माध्यमातून आतापर्यंत १५० हून अधिक मुलींना शिक्षणाच्या



कुंदा बच्छाव

मुख्य प्रवाहात टिकवून ठेवले आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शिक्षणाची गंगा घराघरांत पोहोचवण्याचे काम महाराष्ट्राच्या गावागावांतील शिक्षक करत असतात. मात्र, कौटुंबिक पटलावर बालविवाहासारख्या प्रथांचा बळी ठरणाऱ्या आणि कौटुंबिक आर्थिक अडचणींमुळे शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या गरजू मुलींना दत्तक घेऊन त्यांच्या शिक्षणाचा पूर्ण खर्च उचलण्याचे कौतुकास्पद कार्य कुंदा करीत आहेत. अकरावीत असताना स्वतःचा विवाह ठरवला जात असताना केवळ शिक्षकांच्या समुपदेशनामुळे शिक्षण पूर्ण करू शकलेल्या बच्छाव यांनी शिक्षकच होण्याचा निर्णय घेतला. अर्थात त्यामागे शिक्षक काका आणि अन्य नातेवाईकांची प्रेरणाही होतीच.

''दहावीनंतर डी.एड. केले तर दोन वर्षांत शिक्षण पूर्ण होईल आणि शिक्षणासाठीचा खर्चही कमी होईल, असा विचार वडिलांनी त्यावेळी केल्यामुळे पुढील शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला. मात्र, शिक्षण सुरू असतानाच लग्नाचा हार गळ्यात पडला. पण माहेर तसेच सासरच्या पाठिंब्यामुळे शिक्षण सुरू राहिले.'' शिक्षिका म्हणून रुजू झाल्यावर जिल्हा परिषदेच्या आणि त्यानंतर महानगरपालिकेच्या विश्वासनगर व आनंदवली शाळेत पंधराहून अधिक



वर्षे त्यांनी सेवा दिली आहे. शासकीय शाळांमध्ये आठवीनंतर कौटुंबिक व आर्थिक अडचणींमुळे ५० टक्के मुली शाळा सोडतात आणि बालविवाहाच्या जाळ्यात अडकतात, हे विदारक सत्य त्यांनी जवळून अनुभवले.

''शिक्षणाच्या मुख्य प्रवाहातून बाहेर पडत लग्नाच्या बोहल्यावर चढणाऱ्या मुलींसाठी आवाज उठवण्याचे धैर्य माझ्यात नव्हते. लग्नानंतर अगदी वर्षभरात मुली आई झाल्या. काहींचे बाळंतपण जीवावर बेतल्याचेही पाहिले. पण फाल्गुनीच्या आर्त हाकेने माझ्यातील शिक्षक आणि आई खडबडून जागी झाली. माझे थांबणारे शिक्षण केवळ माझ्या शिक्षकांमुळे पूर्ण होऊ शकले. आता या मुलींच्या शिक्षणासाठी मी त्यांच्या पाठीशी उभी राहणार, हा निर्धार पक्का झाला,'' असे कुंदा सांगतात.

फाल्गुनीच्या पालकांचे समुपदेशन करण्यात आले. मात्र, ते ऐकत नसल्याचे पाहून त्यांना कायद्याची भीती दाखवण्यात आली. त्यानंतर नाखुशीने का होईना, पण पालकांनी तिचे होणारे लग्न थांबवून शिक्षण पूर्ण करण्याची तयारी दर्शविली. यासाठी बच्छाव यांनी तिच्या शिक्षणासाठी आर्थिक मदतीचा हात पुढे केला. त्यामुळे तिचे शिक्षण सुरू राहिले. बच्छाव यांनी २०२१ मध्ये पाच मुलींना दत्तक घेऊन 'शैक्षणिक पालकत्व' या उपक्रमाची सुरुवात केली. केवळ पाच मुलींपासून सुरू झालेल्या या मोहिमेला नंतर समाजमाध्यमांची भक्कम साथ मिळाली. 'फेसबुक'च्या माध्यमातून आवाहन केल्यानंतर देश-विदेशातून नागरिकांनी मदतीचा हात पुढे केला. २०२१ पासून आतापर्यंत या उपक्रमासाठी सुमारे १४ लाख रुपयांच्या वर निधी जमा झाला आहे. या निधीतून मुलींच्या वह्या-पुस्तके, गणवेश, महाविद्यालयीन शुल्क, वाहतूक खर्च आणि करिअर मार्गदर्शनाचा खर्च केला जातो.

या उपक्रमातून आज अनेक मुली पदविका अभियांत्रिकी, वैद्यकीय, दंतचिकित्सा, सीए, एसीए यासारख्या उच्च शिक्षणाच्या ▸ पान २ वर

अक्षय केंडे

# कोयता नको, लेखणी हवी

**बीड जिल्ह्यातल्या ऊसतोड कामगारांच्या पाल्यांची होत असलेली शैक्षणिक हेळसांड प्रा.डॉ. कविता यांना जाणवली आणि त्यांनी उसाच्या फडावरच पालक आणि पाल्यांच्या शिक्षणाचे स्वप्न फुलवले. ऊस कापण्यासाठी उद्या हातात येणारा कोयता काढून त्यांनी मुलांच्या हातात लेखणी दिली आहे. त्यांच्या याच कामासाठी आज ५ सप्टेंबर शिक्षक दिनाच्या दिवशी त्यांना 'राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात येत आहे. गेली २९ वर्षे मुलांसाठी शालोपयोगी उपक्रम राबवत त्यांना उच्च पदापर्यंत पोहोचवणाऱ्या प्रा. डॉ. कविता गित्ते यांच्याविषयी...**

बीड जिल्हा हा कायमच महाराष्ट्राच्या राजकारणात आणि अर्थकारणात केंद्रस्थानी राहिलेला आहे. या जिल्ह्यातून दरवर्षी हजारो ऊसतोड कामगार इतर जिल्ह्यात व शेजारच्या राज्यात ऊस तोडायला जातात. म्हणूनच बीड जिल्ह्याला ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून सर्वत्र ओळख आहे. दसरा झाला की, हातात कोयता घेत शेकडो किलोमीटरच्या प्रवासाला निघालेल्या ऊसतोड



प्रा.डॉ. कविता गित्ते



कामगारांच्या मुलांचे शिक्षण मात्र त्याच गतीने त्यांच्या उद्दिष्टांपासून दूर जात असते. हीच बाब लक्षात घेऊन ऊसतोड कामगारांच्या पाल्यांच्या या अंधारलेल्या शैक्षणिक विश्वात ज्ञानाचा दीप प्रज्वलित करण्याचे काम प्रा. डॉ. कविता गित्ते यांनी केले आहे.बीड जिल्ह्यातील केज तालुका येथे 'साने गुरुजी निवासी विद्यालया'त प्रा.डॉ. कविता गित्ते या मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. २९ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेत गित्ते यांनी ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या आयुष्यात आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. प्रा. डॉ. गित्ते यांच्या कार्याची दखल घेत त्यांना यावर्षीचा केंद्र सरकारचा 'राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार' दिला जाणार आहे. ज्याचे वितरण आज शिक्षकदिनी राष्ट्रपतींच्या हस्ते होणार आहे.

मुख्याध्यापिका म्हणून काम पाहणाऱ्या प्रा. डॉ. कविता गित्ते यांनी नोकरी करत असतानाच ऊसतोड कामगारांच्या तसेच अनाथ मुलांच्या शिक्षण व भविष्यासाठी काम चालू ठेवले. एम.ए., एम.कॉम., बी.एड., एम.एड., एम.फिल. पीएच.डी. आणि डी.लिट. अशी उच्च शैक्षणिक पात्रता असतानाही डॉ. कविता यांनी वातानुकूलित खोलीत बसून आपले काम न करता थेट उसाच्या फडाला आपले कर्मस्थान मानले आणि तेथील विद्यार्थ्यांसाठी स्वतःच्या ज्ञानाचा वापर केला.

प्रतिवर्षी एप्रिल आणि मे महिन्यात राबवली जाणारी 'पालक संवाद यात्रा' हा त्यांच्या उपक्रमाचा मुख्य भाग आहे. वस्ती, तांडे आणि थेट उसाच्या फडात जाऊन पालकांचे समुपदेशन करणे, ऊसतोड कामगारांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे आणि शिक्षणापासून कोसो दूर गेलेल्या मुलांना शाळेत दाखल करून घेत त्यांना शिक्षणाचे धडे देण्याचे काम २९ वर्षांपासून अविरत सुरू आहे. प्रा. डॉ. कविता यांच्या या प्रयत्नांमुळे आतापर्यंत हजारो विद्यार्थ्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले असून अनेक विद्यार्थी आजही शिकत आहेत.

ऊसतोड कामगारांची मुले महिनोन् महिने शाळेपासून दूर राहिल्यामुळे त्यांच्या अभ्यासक्रमातील संकल्पना कच्च्या असतात. यावर उपाय म्हणून २००५ पासून 'पायाभूत साक्षरता व संख्या ज्ञान' अंतर्गत शाळा सुटल्यानंतर रोज एक तास मराठी, गणित आणि इंग्रजीच्या विशेष तासिका घेतल्या जातात. परिणामी, अक्षरांचीही ओळख नसलेली ▸ पान ४ वर



आरती कदम

# आनंददायी 'डिजिटल' शिक्षण




सीमा शिंदे

**शिकवण्यासाठी समाजमाध्यमांचा प्रभावी वापर करणाऱ्या शिंदे मॅडम सध्या विद्यार्थ्यांमध्ये आणि शिक्षकांमध्येही लोकप्रिय आहेत ते त्यांच्या हसतखेळत शिकवण्याच्या पद्धतीमुळे. वेगवेगळी कोडी घालत, मुलांमध्ये कुतूहल निर्माण करणाऱ्या, त्यांच्या विचाराला चालना देणाऱ्या शिंदे मॅडम यांच्या कृतिशीलतेमुळे पुण्याजवळील जांबे जिल्हा परिषद शाळेतील मुलांसाठी शिक्षण म्हणजे आनंददायी प्रयोगशाळा ठरली आहे. गाव-खेड्यातील मुलांना एकजुटीने, एकात्मिक भावाने शिकवणाऱ्या सर्जनशील शिक्षिका सीमा शिंदे अर्थात शिंदे मॅडम यांच्या कामाविषयीचा लेख आजच्या (५ सप्टेंबर) शिक्षक दिनानिमित्ताने...**

- ३ ३ ३ = यामध्ये कोणतेही चिन्ह वापरा, मात्र त्याचे उत्तर १ यायला हवे.
- २४ ने विभाज्य असलेली खालीलपैकी सर्वांत मोठी संख्या कोणती? (चार पर्याय)
- आयताकृती कागदाचे क्षेत्रफळ न बदलता चौरसकृती करून दाखवा.
- चार ठिपक्यांपासून एक त्रिकोण कसा तयार कराल?
- कागदावरील चार रेषा रबर, पेन्सील न वापरता त्याच्या ३ रेषा करा.
- कालगणना मापन कसं कराल?
- ७ खंड आणि ५ महासागर लक्षात ठेवायची युक्ती कोणती?
- वर्ष - लीप वर्ष कसं तयार होतं?
- 'टेल' आणि 'से' या इंग्रजी शब्दांतील फरक काय?
- इंग्रजी व्याकरण गाण्यातून कसं लक्षात ठेवायचं?

असे एक ना अनेक प्रश्न विचारत, कोडी घालत सीमा शिंदे अर्थात सगळ्यांच्या शिंदे मॅडम मुलांना अभ्यासात रमवतात तेव्हा पुस्तकातलं आणि पुस्तकापलीकडचं शिक्षण आनंददायी होतं आणि अनेक विद्यार्थी दर महिन्याला एकही दिवस अनुपस्थित न राहण्याचं बक्षीस घेऊन जातात. शिक्षण, परीक्षा हे ओझं न होता माहितीचं भांडार खुलं करणारं विस्मयकारी जग होतं.

पुण्यातल्या जांबे गावातील जिल्हा परिषद शाळेतल्या पहिली ते पाचवी इयत्तेला सलगपणे शिकवणाऱ्या शिंदे मॅडम आणि त्यांचे विद्यार्थी सध्या जगभर पोहोचले आहेत ते समाज माध्यमांमुळे. वर्गात शिकवतानाचे त्यांचे हे व्हिडीओ अनेकांचे लक्ष वेधून घेत आहेत. त्यांचे 'इन्स्टाग्राम'वर ८ लाख ८ हजार तर 'यूट्यूब'वर ५ लाख ८९ हजार 'फॉलोअर्स' आहेत. त्यात जगभरातले विद्यार्थी आहेत आणि जवळजवळ ४० टक्के शिक्षकही.

अर्थात या समाजमाध्यमांतून शिकवण्याची सुरुवात झाली ते करोना साथीच्या काळात. तेव्हा सगळ्याच शाळा बंद होत्या आणि नंतर शाळा ऑनलाइन भरायला लागल्या. त्याची अजिबात सवय नसलेल्या मुलांना 'स्क्रीन'समोर खिळवून ठेवायचं तर काही वेगळं करावं लागणार होतं. त्यातूनच नवनवीन प्रयोग होऊ लागले. लहान मुलांना जर हसतखेळत, गंमत करत, कोडी घालत, युक्त्या सांगत शिकवलं तर कठीणातील कठीण विषयही सहज आत्मसात करता येतो हे गुपित शिंदे मॅडमना कळलं आणि त्यांनी त्याचाच वापर करत गणितच नव्हे तर विज्ञान, इतिहास, भूगोल, समाजशास्त्र अशा सगळ्याच विषयांतील कुतूहल निर्माण करणारी छोटी छोटी कोडी तयार केली आणि वर्गात विचारायला सुरुवात केली. साथीचा काळ संपल्यावर शाळा पूर्ववत सुरू झाल्यावर हाच प्रयोग त्यांनी प्रत्यक्ष वर्गात सुरू केला. आणि त्याचा अपेक्षित परिणाम तर होऊ लागलाच परंतु त्यातल्या व्हिडीओंमुळे अनोळखी लोकांपर्यंतही हा प्रयोग पोहोचला.

वर्गात कोडं समोर आलं की, त्यांचे विद्यार्थी काही वेळा विचारात पडतात, काही वेळा पुढे येऊन फळ्यावरचं ते कोडं सोडवायचा प्रयत्न करतात. त्यातल्या काहींचं कोडं सुटतं, काहींचं नाही. पण एवढ्या वर्षांत ही मुलं इतकी तयार झालीत की त्यातलं एक तरी पुढे येऊन ते सोडवतंच. त्याचबरोबरीने गोष्टीत लपलेली म्हण शोधा असेल किंवा कविता, गाणी म्हणण्यातून मुलांना भाषेचीसुद्धा वेगळ्या पद्धतीने ओळख होते. त्यांचा एक विद्यार्थी अनिरुद्ध तर फारच छान गातो. स्नेहसंमेलनात तर प्रत्येक मुलाने भाग घ्यायचाच हा शिंदे मॅडमचा आग्रह असतो. त्यामुळे रंगमंचावर येऊन बोलण्याचं भय नाहीसं होतं. शिवाय इतर स्पर्धांमध्येही मुलं भाग घेत असल्याने अवांतर वाचनही होत असतंच. त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी आणखी एक उत्साहाचा दिवस म्हणजे शासनाचा उपक्रम, आनंददायी शनिवार अर्थात दप्तराविना शाळा. त्यामुळे दर शनिवारी ही मुलं शाळेच्या मैदानात व्यायामाचे, शरीर संतुलनाचे प्रकार शिकत असतात. खुल्या मैदानातील खेळातून जे जे माणसाला मिळतं ते सगळं ही मुलं घेत असतात.

गेली १९ वर्षं शिक्षिकेचं व्रत पाळणाऱ्या सीमा मॅडमचं लग्न झालं तेव्हा त्याचं पदवीपर्यंतही शिक्षण झालं नव्हतं. पण लहानपणीच आत्याच्या मुलाशी ठरलेलं त्यांचं लग्न 'ठरवलेलं' असलं तरी प्रेमविवाहात बदललं आणि राजेंद्र शिंदे यांनीही आपल्या बायकोची शिक्षक होण्याची ▸ पान २ वर





## लग्नाची पंचविशी

वंदना कुलकर्णी

# सहजीवनातील लैंगिक समरसता!

**लग्नानंतर २५-३० वर्षं सातत्याने सहवासात असताना एकमेकांविषयीची समरसता, नवीन प्रयोग, वैवाहिक नात्याची विविधता आणि संपन्नता यातून लैंगिक जीवनाचा आनंद, समाधान अनुभवता येतो. भीड, संकोच न बाळगता जपलेले नावीन्य जोडप्यातील लैंगिक जीवन खुलवतं. पर्यायाने विवाह आणि कुटुंब संस्था अधिक निरामय आणि समृद्ध होते, हे सांगणारा 'वैवाहिक नात्यातील लैंगिक सहजीवन' या लेखाचा उत्तरार्ध.**



माझ्या मोठ्या मावशीचं लग्न जेव्हा आचार्य शंकर जावडेकर यांच्या मुलाबरोबर ठरलं, तेव्हा माझे आजोबा म्हणजे तिचे वडील, तिला तिच्या लैंगिक शिक्षणासाठी संततिनियमनाचे पुरस्कर्ते र. धों. कर्वे यांच्या दवाखान्यात घेऊन गेले होते. ही गोष्ट आहे १९४६ मधली! तेव्हा आजोबांकडे र. धो.कर्वे संपादित 'समाजस्वास्थ्य' मासिक यायचं. ज्यात लैंगिक प्रश्नांची उकल व्हायची. विशेष म्हणजे ते कधी लपवून ठेवलेलं नसायचं. त्या काळी माझ्या मावशीने एक मूल झाल्यावर कुटुंब नियोजन केलं होतं.

असे काही अपवाद वगळता, लैंगिकता हा विषय खूप वर्षं आपल्या समाजात गुप्त राखण्याचा प्रयत्न केला गेला. गंमत म्हणजे पूर्वीच्या पिढ्या असोत वा आत्ताच्या 'मिलेनियल्स', 'जेन झी', 'जेन अल्फा' पिढीतल्या सर्वांनाच या विषयात नेहमीच रस होता आणि आहे. निसर्गाने आपल्याला बहाल केलेल्या शरीराच्या अवयवांपैकीच हे लैंगिक अवयव! लग्न होणं, मूल असणं याविषयी अत्यंत आग्रही असलेल्या समाजात, या दोन्ही गोष्टींच्या केंद्रस्थानी लैंगिक संबंध आहेत हे माहीत असूनही, त्यांना कायम अनुल्लेखानं मारायचं ही मानसिकता दिसून येते.

पुण्याचे निष्णात, नामांकित, कमालीचे सहसंवेदनशील आणि वर्षानुवर्षं निरलस रुग्णसेवा करणारे रेडिओलॉजिस्ट डॉ. अरुण किनरे यांच्या बरोबर गप्पा मारण्याचा नुकताच योग आला. डॉक्टर लवकरच ८० वर्षांचे होतील. ते सांगत होते की, त्यांच्या पन्नासहून अधिक वर्षांच्या कारकीर्दीत, लग्न आणि मूल याविषयीची भारतीय मानसिकता फारशी बदललेली नाही. आजही अनेक घरात लग्नानंतर दोन-तीन वर्षांनी बाळ झालं नाही तर कुटुंब अस्वस्थ होतं. तसंच बेकायदेशीरपणे केलेल्या 'सोनोग्राफी' मध्ये गर्भ मुलीचा असेल तर अनेक कुटुंबात तिचे स्वागत तर होत नाहीच, उलट तिला मारून टाकण्याचे अघोरी कृत्य करणारे महाभागही आहेत. म्हणजे इथे सगळा लैंगिक 'व्यवहार' हा केवळ आणि केवळ मूल आणि त्यातही 'मुलगा' या भोवती फिरत असेल तर पती-पत्नीमधील परस्परांबद्दल प्रेम व्यक्त करणाऱ्या शरीर संवादाला काही स्थान तरी असेल का?

नवविवाहितच नाही, तर अनेक वर्षं विवाहित असणाऱ्या जोडप्यांनासुद्धा संपूर्ण लैंगिक क्रियेची माहिती असतेच असं नाही. लैंगिक क्रियेतील अत्युच्च आनंदाचे जे काही क्षण असतात त्या भावनोत्कटतेच्या (ऑरगॅझम) जैविक प्रेरणा तीन आहेत. प्रजोत्पादन (प्रोक्रिएशन), आनंदाचे निधान असलेली करमणूक (रिक्रिएशन) आणि मनोमिलन (बाँडिंग).

आनंदनिधानात लैंगिक क्रियेतील नावीन्य अनुस्यूत आहे. यातूनच वेगवेगळ्या स्थितीतील लैंगिक क्रिया जन्माला आल्या. नित्यकर्मांमध्ये माणसाला काहीतरी नूतनता, उत्तेजकता अपेक्षित असते; नाहीतर गोष्टी कंटाळवाण्या होऊन त्यात रस वाटेनासा होतो. मनोरंजन करणारी लैंगिक क्रीडा रंजक आणि आकर्षक करण्यासाठी ठिकाण बदल (पर्यटन), केशभूषा-वेशभूषा बदल (जगातील अंतर्वस्त्र व्यवसाय यावर तर प्रामुख्याने पैसे कमावतो आहे!) शरीरसुखासाठीच्या विविध कृती (पोझिशन्स), विविध प्रकारचे सुगंध-संगीताची पार्श्वभूमी या गोष्टी उभयतांनी जाणीवपूर्वक आणि रसिकतेने करायला हव्यात. सर्वात महत्त्वाचं म्हणजे परस्परांवर मनोमन प्रेम आणि विश्वास असेल तरंच या गोष्टी करता येतात आणि त्याची अनुपम्यता अनुभवता येते. त्यासाठी परस्परांमध्ये तेवढी मानसिक, भावनिक गुंतवणूक हवी.

आधीच्या पिढ्यांची जी भौतिक, आर्थिक परिस्थिती होती त्यामध्ये अनेकांसाठी या गोष्टी आवाक्यातीलच नव्हत्या हे खरंच; पण त्याबद्दल फार कधी कल्पकताही दाखवली गेली नसावी, असं वाटतं. मुळात हा विषय किती जणांच्या विषय पत्रिकेवर होता हाच संशोधनाचा विषय! त्यात एकाचं व्यक्तिमत्त्व प्रणयरम्य (रोमँटिक) असेल आणि जोडीदाराचं नेमकं विरुद्ध असेल तर रंग भरण्याआधीच होणारा बेरंग आपल्या विवाहसंस्थेतील अनेक जणांनी गेल्या पंचवीस काय त्याआधीही अनेक वर्षं अनुभवलेला असेल. या विषयाबद्दलच उदासीनता किंवा संकोच विशेषतः अनेक स्त्रियांच्या मनात, पुरेपूर भरलेला असायचा. एकदा मराठी मित्र-मैत्रिणी अमेरिकेत दिवाळी साजरी करण्यासाठी एकत्र जमली. सगळ्या नवऱ्यांनी एकत्र येऊन योजना ठरवली आणि पाडव्याला आपापल्या बायकांना प्रणयरम्य अंतर्वस्त्रांची भेट दिली! त्यावेळी बायकांचे जे काही चेहरे झाले होते त्याच्या वर्णनांनी अनेक दिवस हशा पिकत राहिला.

सलज्जता, भीड, उदासीनता या भावना आजच्या तरुण पिढीतील किती जणांच्या भावविश्वात आहेत माहीत नाही; पण ते किमान त्यांच्या लैंगिक भावनांबद्दल सजग आहेत, खुल्या विचारांचे आहेत असं दिसतं. ते आंधळेपणाने परंपरांमध्ये आणि 'टॅबू' तसंच शुचितेच्या अविवेकी कल्पनांमध्ये अडकलेले दिसत नाहीत. मात्र विवाहपूर्व लैंगिक संबंधांमध्ये तरी प्रामुख्याने मनोरंजन हा उद्देश असणारे बरेच जण दिसतात. 'वन नाइट स्टॅन्ड'च्या अनुभवात तर 'रात गयी, बात गयी' इतकी प्रासंगिक वृत्तीही दिसते. मात्र विवाहसंस्थेतील पतीपत्नीच्या नात्यात रंजन आणि मनोमीलन या दोन्हींचा अपूर्व संगम ही जोडप्याच्या लैंगिक सुखाची गुरुकिल्ली आहे. नर-मादीमध्ये नैसर्गिक आकर्षण असणारच; परंतु वर उद्धृत केल्याप्रमाणे प्रणयासाठीची पूर्वतयारी असेल तर प्रणयाची उत्कट इच्छा निर्माण होते. ती स्पर्शातून संवेदना अनुभवत, एकमेकांच्या कायेचा आनंद घेणं, लाड/कौतुक करणं, चुंबन घेणं या भावोत्कट कृतींमधून अनुभवता येतं. स्त्री ही भावनाप्रधान अधिक असते. जोडीदाराला आपल्याविषयी वाटणारी आस्था, आत्मीयता, आदरभाव, औत्सुक्य, कदर, प्रेम हे सारं ती स्पर्शातून अनुभवत असते. आपण जशा आहोत तशा त्याला आवडतो हे तिला सुखावणारं असतं. पूर्वक्रियेतून ती भावनिक बंध जुळण्याचा (इमोशनल इंटीमसी) अनुभव घेते. मग ती लैंगिक प्रणयासाठी सिद्ध होते. आनंदाचं हे लैंगिक चक्र म्हणजे स्त्री-पुरुष नात्यातील लैंगिक सहजीवनाची सशक्त अनुभूती आहे. किती स्त्री-पुरुषांना हे माहीत असतं? व्यक्त करता येतं?

पूर्वी ही अभिव्यक्ती करताच येत नव्हती आणि आता ती उघडीवाघडी झाली, असं म्हणावं का? परंतु, अशी अनुभूती जाणीवपूर्वक आणि अभ्यासपूर्वक उपभोगण्याचं भाग्य ज्या जोडप्यांना लाभतं, त्यांना आपल्या विवाहसंस्थेतील विवाह 'बंधन' कधीच क्लेशकारी, नकोसं होणार नाही. किंबहुना या समरसतेतून, नित्यनवीन प्रयोगांतून, वैवाहिक नात्याची विविधता आणि संपन्नता ते अनुभवत राहतील. त्यातून त्यांच्यामधील 'बंध'च अधिक दृढ होतील. अशा विवाहांमध्ये स्वतःचा आणि नात्याचा विकासही हातात हात घालून होत राहतो. तसंच, या प्रयोगशीलतेमुळे विवाहव्यवस्थेच्या चौकटीत अडकल्याची भावना न राहता, वचनबद्धतेतील शाश्वतता नात्यात अनुभवता येते.

लैंगिक नात्यांमध्ये संप्रेरकंही महत्त्वाची भूमिका बजावत असतात 'मेंदूचे कामशास्त्र' या विषयाचे अभ्यासक डॉ. जयदेव पंचवाघ यांची मांडणी इथे सर्वांना उपयोगी पडावी. ते म्हणतात, ''कामशास्त्र हा विषय इतका महत्त्वाचा का आहे? याचं साधं उत्तर म्हणजे निसर्गाने अगदी सामान्य व्यक्तींसाठीसुद्धा आत्यंतिक व अत्युच्च आनंदाचा अनुभव घेण्याचा रस्ता त्यातून उघडलेला आहे. हा अनुभव तात्पुरता असला तरी तृप्त समाधानाचा अनुभव देण्याची क्षमता त्यात आहे. अर्थातच निसर्गाचा यातला मूळ उद्देश प्रजनन हा आहे. म्हणूनच इतर प्राण्यांप्रमाणेच मनुष्यालाही कामक्रीडेकडे अत्यंत तीव्रतेनं खेचून घेण्याचं हे तंत्र निसर्गानं निर्माण केलं आहे.'' गंमत म्हणजे आधीच्या पिढ्यांनी याकडे अधिकतर प्रजनन म्हणूनच बघितलं तर अलीकडच्या पिढ्या त्यातील तात्पुरत्या अनुभवावर भर देताना दिसतात. 'कामा'तील 'क्रीडे'चा गाढ, दीर्घ व प्रगल्भ अनुभव ना मागच्या पिढ्यांनी घेतलेला दिसला, ना आजच्या घेताना दिसतात!

नव्या संशोधनाचे दाखले देत डॉ. पंचवाघ सांगतात, ''कामक्रीडेतल्या अत्युच्च आनंदाच्या क्षणी मेंदूतले एकमेकांपासून दूर असलेले अनेक भाग एकाच वेळी उद्दीपित होतात. लैंगिक भागांतील संवेदना जाणणारी, ज्या ठिकाणी आनंददायक चेतारसायनं स्रवतात अशी, शरीरातील विविध संप्रेरकं स्रवणाऱ्या ग्रंथी जिथून नियंत्रित होतात अशी, काही स्मृतीविषयक, तसंच विशिष्ट व्यक्तीबरोबर भावनिक बंध निर्माण करणारी अनेकानेक केंद्रं या अनेक भागांना एकाच वेळी उद्दीपित करतात. त्याच वेळी अत्यंत आनंद निर्माण करणाऱ्या रसायनांचा लोंढा फुटतो. त्यात उद्दीपनाच्या अगदी शेवटच्या काळात 'डोपामाइन' (आनंद निर्माण करणारे संप्रेरक) आणि त्यानंतर क्षणार्धात अत्यंत सुखद शांततेत ढकलणारं 'एंडोर्फिन' संप्रेरकं पाझरतात. त्यामुळे तृप्त शांततेचा अनुभव येतो. या प्रक्रिया इतक्या वेगळ्या प्रकारचा अनुभव निर्माण करतात की, या अनुभवाकडे माणसं अत्यंत तीव्रतेने खेचली जातात.''

ही सगळी शास्त्रीय माहिती करून घेणं राहिलं बाजूलाच, मात्र भारतासारख्या देशातील अनेक पिढ्यांवर अतिकर्मठ विचारसरणीचा प्रभाव! त्यामुळे अनेक माणसे आनंदी लैंगिक अनुभवांना मुकली. नव्या पिढ्यांतील काही जण प्रयोगशील आहेत, मात्र आजही याविषयीचे परिपूर्ण शिक्षण सुयोग्य वेळी देण्याचा अभाव, पूर्वीही होता आणि आताही आहेच. वात्सायनासारख्या व्यक्तींनी लैंगिकतेच्या विषयावर आस्थापूर्वक चिंतन का केलं आणि आजही अनेक स्तरावर विषयातील संशोधन का चालू आहे याचा, सामाजिक, कौटुंबिक धाक आणि भयगंड बाजूला ठेवून, विचार व्हायला हवा. तरच जोडप्याला कामशास्त्रातला डोळस अनुभव निर्भेळपणे आणि तणावमुक्त पद्धतीने घ्यायला शिकता येईल.

त्यानंतरच या अनुभवाच्या संपूर्ण खोलीपर्यंत पोहोचून आपण आपले आयुष्य आणि पर्यायाने आपली विवाह आणि कुटुंब संस्था अधिक निरामय आणि समृद्ध करू शकू.

(उत्तरार्ध)

vankulk57@yahoo.co.in

---

पान १ वरून / क्षेत्रात यशस्वीपणे वाटचाल करत आहेत. हा प्रवास सोपा नव्हता. प्रसंगी पदरमोडही करावी लागली. मुलींसाठी आर्थिक मदतीचा हात पुढे करताना त्याचा दुरुपयोग तर होत नाही ना, हे पाहण्याची जबाबदारी होतीच. यासाठी शाळेतील एक महिला सहकारीही मदतीला आली. या उपक्रमात केवळ नाशिकमधीलच नव्हे, तर राज्यातील अनेक जिल्ह्यांतील मुलींचा समावेश आहे. एक मुलगी विदर्भातील होती. समाजमाध्यमांवरील कुंदाबाईंची पोस्ट पाहून तिने मदतीची विचारणा केली आणि घरातील अडचणी सांगितल्या. आई हीच घरातील एकमेव कर्ती व्यक्ती असताना तिला दंतचिकित्सेचा अभ्यासक्रम पूर्ण करायचा होता. शासकीय शुल्कापोटी लागणारे चार लाख रुपये तिच्या कुटुंबाकडे नव्हते. बच्छाव यांनी तिच्या घरी जाऊन परिस्थितीची पाहणी केली आणि 'शैक्षणिक पालकत्व' उपक्रमातून तिच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली. अशा दीडशेहून अधिक मुलींना त्यांनी आतापर्यंत मदत केली आहे.

सामाजिक बांधिलकी जपत असतानाच शाळेतही केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी कुंदा यांनी अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले आहेत. यामध्ये ठळकपणे सांगता येईल असा 'संविधान सापशिडी' हा उपक्रम त्यांनी हाती घेतला. संविधानातील हक्क आणि कर्तव्ये खेळातून शिकवण्यासाठी त्यांनी 'संविधान सापशिडी'ची निर्मिती केली. मुलांमध्ये संस्कारांची रुजवणूक व्हावी, संविधानातील कलमांची माहिती व्हावी आणि हक्कांबरोबरच त्यांना



# निःस्पृह ज्ञानदान...!

कर्तव्यांची जाणीव व्हावी, यासाठी खेळाच्या माध्यमातून शिक्षण देण्यात येते. यासोबतच 'मूल्यमापन सापशिडी'ही तयार करण्यात आली. त्यातून मुले खेळत-खेळत मूल्यसंस्कार शिकली आणि ते प्रत्यक्ष जीवनात आणण्यासाठी क्षेत्रभेटी, मुलाखती, 'आनंदवली शिक्षण कट्टा' यासारख्या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष जीवनातील अध्ययन अनुभव मिळवून देण्यात आले.

तसेच अमेरिकेसोबत 'इ-ट्विनींग', बांगलादेशासोबत 'टेलिकोलाबरेशन' आणि जर्मनीसोबत 'लर्न जर्मन' यासारख्या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवर संवादाची संधी उपलब्ध करून देण्यात आली. यामध्ये जर्मन अंकलिपी तयार करण्यात आली. या माध्यमातून विद्यार्थी आणि त्यांचे पालक जर्मन भाषा शिकत आहेत. सामाजिक उपक्रमात योगदान देत पूरग्रस्तांसाठी विद्यार्थ्यांनी १५ हजार रुपयांचा निधी जमा करून तो मुख्यमंत्री मदत निधीला दिला. तसेच आनंदवली परिसरात दोन हजारांहून अधिक झाडांची लागवड करण्यात आली. याशिवाय बच्छाव यांच्या संकल्पनेतून शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत.

'मिशन मोबाईल-फ्री' अंतर्गत विद्यार्थी भ्रमणध्वनीपासून दूर राहावेत, यासाठी शाळेच्या आवारात 'ज्ञानभिंती' आणि 'आनंदवली शिक्षण कट्टा' सुरू करण्यात आला. शाळेच्या आवारातील वेगवेगळ्या कोपऱ्यांमध्ये विद्यार्थ्यांना वाचनासाठी पुस्तके ठेवण्यात आली आहेत. याशिवाय आनंदवली गावातील मारुती मंदिरात तसेच संत कबीर वस्तीतील समाज मंडळात मुले, पालक आणि गावकऱ्यांसाठी संपूर्णपणे लोकसहभागातून सुमारे दोन हजार पुस्तकांचे खुले वाचनालय सुरू करण्यात आले आहे.

पालकांना नेहमी चिंता वाटायची की, आम्ही कामावर गेल्यानंतर मुले शाळेत जातात की कुठेतरी वाईट संगतीत फिरतात? त्यांची ही चिंता दूर करण्यासाठी शाळेत 'स्मार्ट अटेंडन्स' सुरू करण्यात आला. यामध्ये मुलांना 'आरएफआयडी' कार्ड असलेले ओळखपत्र देण्यात आले. हे ओळखपत्र 'स्मार्ट अटेंडन्स किट'वर स्कॅन केल्यानंतर त्यांच्या पालकांना मुलं शाळेत आल्यावर आणि निघाल्यावर एक संदेश पाठवला जातो. यामुळे पालकांची आपल्या मुलांच्या सुरक्षिततेसाठीची चिंता मिटली.

मुलांचे शिक्षण केवळ शाळेच्या चार भिंतींपुरते मर्यादित न राहता संपूर्ण गावच त्यांच्यासाठी शिक्षण देणारे माध्यम बनावे, यासाठी आनंदवली गावात 'ज्ञानाच्या भिंती' उभारण्यात आल्या. गावातील ३० ते ३५ घरांच्या भिंती नकाशे, गणिताच्या क्लृप्त्या, इंग्रजी शब्द यांनी रंगवण्यात आल्या. त्यामुळे मुले आता घरी भ्रमणध्वनीवर खेळणे सोडून या भिंती वाचू लागली आहेत. त्यावरील कोडी सोडवू लागली आहेत. आई-वडिलांसोबत भिंतींजवळ उभे राहून शिक्षणाचा आनंद घेऊ लागली आहेत. शाळेत स्किल लॅब, रेकॉर्डिंग रूम, 'स्टेम' म्हणजेच विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित वर्ग यासारख्या उपक्रमांच्या माध्यमातून मुलांना तंत्रज्ञानाची मैत्री घडवून २१व्या शतकातील कौशल्ये रुजविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत.

वेगवेगळ्या संकल्पनांवर काम करत असताना बच्छाव यांना 'जेन अल्फा' पिढीसमोरची आव्हानेही जाणवतात. आजच्या 'जेन अल्फा' पिढीसमोर गॅजेट्स आणि समाजमाध्यमांवरील अनेक पर्याय उपलब्ध आहेत. अशा परिस्थितीत त्यांना केवळ माहिती देण्यापेक्षा नैतिक मूल्ये आणि संवेदना शिकवणे हे शिक्षकांचे खरे कर्तव्य असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. ''मुलांमध्ये नैतिक मूल्ये रुजवली जायला हवीत. माहिती त्यांना कोठूनही मिळेल; पण मूल्ये रुजवणे तितकेच महत्त्वाचे आहे,'' असे बच्छाव यांचे मत आहे.

आज आनंदवली महानगरपालिका शाळेत सुमारे ८०० विद्यार्थी शिक्षण घेत असून खासगी शाळांमध्ये शिकत असलेले अनेक विद्यार्थी या सरकारी शाळेत प्रवेश घेत आहेत. हीच त्यांच्या कामाची पावती आहे.

charu.kulkarni85@gmail.com

---

पान १ वरून / इच्छा पूर्ण करण्यासाठी त्यांच्या पुढच्या शिक्षणाला हातभार लावला, इतका की डीएड, बीएड, एमएड, एमए तर त्यांनी पूर्ण केलंच, आता पीएच.डी. करण्याचा विचार सुरू आहे.

अर्थात प्रत्येक स्त्रीला घरात काम करावं लागतंच. त्यात हे एकत्र कुटुंबं, परंतु सहकार्य करणारं. पहाटे ५ वाजता उठून सीमाताई कामाला लागतात. सकाळचं जेवण सीमाताई करणार आणि रात्रीचं जाऊबाई अशी सरळसोट विभागणी असल्याने संध्याकाळी घरी आल्यावर त्यांना व्हिडीओ एडिट करायला वेळ मिळतो. शिवाय मुलांना वाढवणं, त्यांचं शिक्षण, संसार याबरोबरीने नवऱ्याचं आजारपण (त्यांना हृदयविकाराचा झटका येऊन गेला आहे) यामुळे येणारा ताण या मुलांमध्ये विसरला जातो, हा त्यांना मिळणारा फायदा. पण त्यांना शिकवण्यात खूपच आनंद मिळतो हे त्यांच्या व्हिडीओंवरून सहज दिसतं.

# आनंददायी 'डिजिटल' शिक्षण



लहानपणापासून शिक्षकच व्हायचं हे ठरवलेल्या शिंदे मॅडम सुरुवातीला, २००८ पासून कोंढावळे गावातल्या शाळेत शिकवत होत्या. दोन महिन्यांचं बाळ आणि पतीचं आजारपण यातून मार्ग काढत शिकवत राहिल्या. सुरुवातीची शाळा चार शिक्षकी होती म्हणजे दोन वर्गाला एक शिक्षक असायचा. एका वर्गाला शिकवत असताना दुसऱ्या वर्गाला सरावासाठी काही तरी द्यायचं, यातूनच त्यांची सर्जकता आणि कल्पकता वाढीस लागली आणि तिथूनच मुलांना शिक्षणात रमवण्यासाठीचे खास प्रयत्न सुरू झाले. मुलांनी शिकलं पाहिजे हे त्यांना आतून वाटत होतं. कारण त्या समाज बघत होत्या, लोक बघत होत्या, आजूबाजूची परिस्थिती पाहत होत्या. गावात फारच कमी मुलं शिक्षण पूर्ण करताना दिसत होती, मुलीचं तर लवकर लग्न केलं जायचं. गावात एखादाच डॉक्टर, इंजिनीयर व्हायचा. सरकारी नोकरीतही फार कमी मुलं जायची. कारण शेती जास्त. आपण काही तरी करायला हवं हे सीमा मॅडमच्या लक्षात आलं. त्या सांगतात, ''आपल्याला समाज खूप काही देत असतो. समाजाचे पांग फेडायचे असतात हे माझ्या डोक्यात पक्कं असल्याने मी शिक्षणाच्या वाटेकडे वळले. हाडाची शिक्षक असल्याने मुलांना शिकवण्यासाठी त्यांच्या पोटात शिरून शिकवायला हवं हे माझ्या लक्षात आलं. मग मी कोडी घालायला लागले. उत्तर देणाऱ्याला बक्षीस द्यायला लागले. कधी बिस्किट, चॉकलेट तर कधी अगदी दोन रुपयांच्या पेनाचं मोलही मुलांसाठी खूप असतं. अनेकदा मुलांमध्ये मूल होऊन शिकवायला लागलं. अनेकदा तर मला माहीत नाही किंवा चुकीचं उत्तर देऊन बाईंना पण काही गोष्टी येत नाहीत याचा मुलांना मिळणारा आनंद घेऊ दिला. त्यामुळे मुलं अधिक मोकळी झाली.'' त्याच्या शिकवण्याचं सार हे असं त्यांच्या कृतीतून दिसतं.

त्यांची आताची जांबेतील शाळा ही जिल्हा परिषदेची - लोकप्रिय भाषेत, झेडपीची. त्यामुळे कोणत्याही आर्थिक, शैक्षणिक स्तरातील मुलं येतात. मजुरांची, वीटभट्टीतल्या पालकांची मुलं येतात. अनेक मुलं तर एकल पालकांची असतात. कुणाच्या बाबांनी आत्महत्या केलेली असते, काहींना आईच नसते. एकाची तर आजीच त्याला सांभाळते. त्यामुळे अनेक मुलं उपाशीच शाळेत येतात. मध्यान्ह जेवण असतं, परंतु तोपर्यंत मन तर स्थिर व्हायला हवं. मग बाई मुलांना विचारतात, ''काय रे काही खाऊन आलास -आलीस का?'' मुलांची मान खाली गेली की, लक्षात येतं की ते उपाशी आहेत. मग घरून येताना पर्समधून आणलेला बिस्किटचा पुडा किंवा असंच काही त्यांना खायला देतात. ''कसं रागावणार या मुलांवर काही चुकलं तरी? मस्ती केली तरी?'' असा प्रश्न त्या आपल्यालाच विचारतात. अर्थात म्हणून चुकीच्या गोष्टीला सहज माफी नाही. त्यातलीच एक वाईट गोष्ट शिव्या देणं. एकदा एका नवीन आलेल्या मुलाने फार घाणेरडी शिवी दिली. झालं, मुलं बाईंकडे आली. बाईंनी शिक्षा दिली. त्याच्या हातात पांढरी रिबीन बांधली गेली. दिवसभर ती रिबीन त्याच्या हातात होती. मुलांचं त्याच्याकडे लक्ष होतं. आपल्या चुकीची जाणीव इतक्या तीव्रपणे त्या मुलाला झाली की दुसऱ्या दिवसापासून त्याची शिवी गायब झाली. पण सीमा मॅडमच्या हे लक्षात आलंय, ही मुलं मित्रांमध्ये - मैत्रिणींमध्ये जास्त रमतात, मोकळी होतात. त्यांच्या वर्गात ५५ मुलं आहेत. त्यांनी पाच-पाच मुलांचे गट तयार केलेत. हुशार ते आकलनास कमी असणाऱ्या मुलांचा. मुलगे आणि मुली एकत्र. मुली गट अधिक चांगल्या प्रकारे हाताळतात असं त्यांचं निरीक्षण आहे. ही मुलं एकमेकांच्या सोबतीने शिकतात. त्यांच्यात मैत्रीभाव निर्माण करणं, एकात्मतेसाठी यापेक्षा चांगला मार्ग नाही, हे त्यांना अनुभवावरून पटलं आहे.

आठवीपर्यंत असणाऱ्या त्यांच्या या शाळेत आज ३७५ मुलं आहेत. शालेय शिक्षणाबरोबरच, स्कॉलरशिप परीक्षा, इतर परीक्षा यासाठी मुलांना तयार करावं लागतं. शिवाय सरकारी शाळा म्हणजे शासनाच्या योजना पूर्ण करण्यासाठीही त्यांना जावंच लागतं. त्यातूनही सीमा मॅडम असे विविध प्रयोग करत असतात. मात्र एक गोष्ट आहे, त्या पहिली ते पाचवीपर्यंत एकाच तुकडीला शिकवत आहेत. त्यामुळे त्यांच्या हाताखाली गेली चार वर्षं ही मुलं चांगली तयार झाली आहेत. अर्थात यंदा ८-१० नवीन मुलं आली आहेत. त्यांना या मुलांबरोबर आणायचं तर मेहनत करावी लागणार आहेच. पण एकमेका सहाय्य करू, असं म्हणत मुलांनीही ते स्वीकारलंय.

आज त्यांची ही जिल्हा परिषद शाळा आधुनिक होते आहे, सरकारी शिक्षण योजनेतील कौशल्यावर आधारित अनेक उपक्रम इथंही राबवले जात आहेत. परसबागेत छोटेखानी शेती पिकवली जातेय, 'रोबोटिक लॅब'मधलं कृत्रिम बुद्धमत्ता (एआय)चं प्रस्थ मुलांमध्येही वाढतंय. शिवाय कम्पुटर लॅब आहेच. त्याचा योग्य वापर मुलांकडून करून घेणं हे आव्हान हे शिक्षक स्वीकारत आहेत. अर्थात ही लॅब अजून अर्धवट आहे, त्यासाठी लागणारा अडीच लाख रुपयांचा अर्धा खर्च शाळेला उभा करायचा आहे. तो कुणाच्या मदतीने पूर्ण करणार हा प्रश्न आहे; परंतु मुलांचं हेही स्वप्न लवकर पूर्ण होईलच. आज शिंदे मॅडम यांच्या हाताखालून गेलेल्या अनेक मुली कुणी पोलीस भरती झालंय, कुणी रेल्वेत भरती झालंय, कुणी बँकेत आहेत, हे ही एक यशच.

उपक्रमशील असलेला जिल्हा म्हणून ज्याची ओळख आहे अशा पुणे जिल्हा परिषदेच्या दर महिन्याला होणाऱ्या शिक्षण परिषदेमध्ये गणित विषयासाठी शिंदे मॅडम सुलभक म्हणून जबाबदारी पार पाडतात. त्या सांगतात, ''आमचे मुख्याध्यापक नरेंद्र अमृतराव बाळसराफ व शाळेतील सहकारी शिक्षक, जांबे गावातील ग्रामस्थ तसेच शिक्षण विभागातील अधिकारी व पदाधिकारी या माझ्या कामासाठी मला नेहमी पाठिंबा देतात.''

विनोबा भावे यांचं प्रसिद्ध वचन, 'मुलांमध्ये मूल होऊन शिकणं आणि शिकवणं', हा सीमा शिंदे मॅडम यांचा जीवनाधार आहे. त्या तत्वावर घट्ट रुजलेल्या त्यांच्या विचारांची मुळं अनेकांच्या आयुष्यात खोलवर झिरपत जावोत, हीच आजच्या शिक्षकदिनी प्रार्थना.

arati.kadam@expressindia.com

# सणासुदीला काय खाल?



## आहारानंदी थाळी

■ अमिता गद्रे



**सणासुदीच्या काळात भडिमार होत असतो तो गोड आणि तेलकट, तुपकट खाद्यपदार्थांचा. साहजिकच हे खाद्यपदार्थ खाताना वजन वाढेल, रक्तातील साखर वाढेल याची भीती अनेकांना असते. तरीही अनेकांना गोडाधोडाचे पदार्थ आहारातून पूर्णतः वर्ज्य करता येत नाहीत. अपराधीभाव बाजूला सारून सणासुदीतल्या खाद्यपदार्थांचा आस्वाद घ्यायचा असेल तर कोणत्या क्रमाने खायचं, हे सांगणारा लेख.**

''तुम्ही सांगाल तसं डाएट मी नक्की सुरू करणार आहे. पण सध्या नको, श्रावण सुरू होतोय...'' माझ्याकडे सल्ल्यासाठी येणाऱ्या एकीचा नुकताच फोन आला होता. त्या गेल्या महिनाभरापासून स्वतःच्या आहारावर काम करण्यासाठी खूप उत्सुक होत्या, सतत पाठपुरावा करत होत्या आणि कसं नियोजन असेल याची माहिती घेत होत्या. मात्र प्रत्यक्षात कृती करायची वेळ आली तेव्हा टाळाटाळ करू लागल्या. शेवटी न राहवून मीच त्यांना थेट विचारलं, ''नक्की अडचण काय आहे?''

त्यावर त्या अगदी प्रामाणिकपणे म्हणाल्या, ''अहो, आता श्रावण सुरू झालाय. पाठोपाठ गणपती, नवरात्र, दिवाळी सणासुदीचे दिवस आहेत. घरात उपवास, पाहुणे, आणि रोज गोडधोड किंवा तळलेले पदार्थ बनणारच. अशा वातावरणात मी 'डाएट' कसं सांभाळणार? मला माझी सवय माहीत आहे. सुरुवातीला मी नियम पाळेन, पण उपवास किंवा सणामुळे नियम मोडतील, तेव्हा अपराधीपणाची भावना येईल आणि 'आज खाल्लंच आहे, तर अजून का नाही?' असं म्हणत जास्त खाईन आणि शेवटी सगळं सोडून देईन. असं करूया, सगळे सण-उत्सव संपू देत. त्यानंतर मी नक्की मनापासून, शिस्तीत नव्याने सुरुवात करेन.'' त्यांचं हे बोलणं ऐकून मला त्यांची भावना पूर्णपणे पटली. कारण ही केवळ त्यांची, एकटीची कथा नाही. बहुतेकांची हीच मानसिकता असते.

श्रावण संपू दे, गणपती, नवरात्र, आणि दिवाळीनंतर 'डाएट'नक्की सुरू करू!' ही आपल्याकडची अगदी रोजची गोष्ट आहे. आपण आरोग्यासाठी आणि वजन कमी करण्याला एका विशिष्ट 'मुहूर्ता'शी किंवा 'कॅलेंडर'शी जोडून टाकतो. पण जरा विचार करा, आपल्या भारतात दर दोन महिन्यांनी एखादा सण किंवा उत्सव असतोच. जर आपण सणांचं निमित्त करून आपल्या आरोग्याची हेळसांड करत राहिलो तर वर्षभरातले ४-५ महिने आपले आपल्या शरीराकडे पूर्णपणे दुर्लक्ष होईल.

आहारशास्त्र आणि विज्ञानाच्या दृष्टिकोनातून हाच विचार समजून घेऊ या. भारतीय सणासुदीच्या चार-पाच महिन्यांत 'फॅटी लिव्हर', 'इन्सुलिन रेझिस्टन्स' आणि 'टाइप-२ मधुमेह' रुग्णांची संख्या वैद्यकीय संशोधन आणि अभ्यासातील आकडेवारीनुसार अचानक वाढते. एवढंच नाही, तर ज्यांची रक्तातील 'साखर' आधी नियंत्रणात असते, त्यांची साखर याच दिवसांत थेट वाढते, पण इथे एक गोष्ट मनापासून समजून घेतली पाहिजे, या सगळ्याला आपले भारतीय सण किंवा आपल्या परंपरा अजिबात कारणीभूत नाहीत. मूळ अडचण सणांमध्ये नाही, ती नसतेच, तर सणांच्या नावाखाली आपणच स्वतःच्या शरीराची हेळसांड करतो, त्या मानसिकतेत आहे.

'सण आहे ना, मग आज चालतंय.', 'थोडंसं चालेल!', 'वर्षातून एकदाच तर येतो गणपती/दिवाळी!', 'आज उपवास आहे... साबुदाणा, मोदक, भजी आणि मिठाई तर हवीच', 'सण संपल्यावर बघू' म्हणून व्यायामालाही पुढे ढकलत राहणं ही आपली विचारसरणीच आजारांना आमंत्रण देते. प्रत्येक वेळी परिस्थिती अनुकूल असेलच असं नाही. आपल्याला परिस्थितीशी जुळवून घेऊन, प्रत्येक वेळी आपल्या शरीरासाठी काय योग्य आहे, हे ठरवता आलं पाहिजे. आपल्या संस्कृतीत सण-उत्सव हे एकत्र येऊन, आनंद साजरे करण्यासाठी असतात. मनावर ताण आणून, गोड-धोड खाण्यासाठी, आधी उपाशी राहून नंतर पश्चात्ताप करत बसण्यासाठी नाही. सण आले तरी निरोगी जीवनशैली थांबवू नका. उलट, सणांच्या काळात अन्नाकडे एक पोषक आणि कुटुंबाला जोडणारा दुवा म्हणून पाहणं गरजेचं आहे. सणांच्या दिवसांत आपलं मानसिक स्वास्थ्य आणि पचनक्रिया दोन्ही उत्तम ठेवण्यासाठी काही सोप्या, गोष्टी समजून घेऊयात.

■ **विचारांची योग्य दिशा – अति खाणं बंद करा.** 'आज मी एक गुलाबजाम खाल्ला, आता माझं डाएट पूर्ण बिघडलंच आहे, मग उरलेले पाचही खाऊन टाकते.' हा विचार सर्वात घातक आहे. एका गुलाबजामने तुमचं वजन वाढत नाही आणि एकदा सलाड खाल्ल्याने तुमचं वजन कमी होत नाही. अन्नावर कधीही 'चांगलं' किंवा 'वाईट' असा शिक्का मारू नका. जेव्हा तुम्ही एखाद्या दिवसाला 'चीट डे' म्हणता, तेव्हा तुम्ही स्वतःलाच फसवण्याची भावना निर्माण करता. त्याऐवजी, सणांचे पदार्थ तुमच्या रोजच्या जेवणात थोड्या प्रमाणात आणि आनंदाने ठेवायला शिका.

■ **सणाच्या ताटातील पदार्थ खाण्याचा क्रम आपण बदलू शकतो :** खाण्याची सुरुवात पुरणपोळी, बेसन लाडू किंवा करंजीने करण्याऐवजी पहिले ताटातील भाजी, कोशिंबीर किंवा सलाडने सुरुवात करा. वरण, आमटी, दही किंवा मोड आलेली कडधान्ये म्हणजेच प्रथिनं खा. त्याबरोबर जाईल तेवढाच भात आणि पोळी खा आणि नंतर आवडता गोड पदार्थ आनंदाने खा. जेव्हा तुम्ही तंतूमय पदार्थ आणि प्रथिनांनी सुरुवात करता, तेव्हा रक्तातील साखर अचानक वाढणे (ग्लुकोज स्पाइक) रोखले जाते आणि तुमचे पोटही लवकर भरते. आहार सेवनातील या साध्या बदलामुळे नेहमीच्या जेवणासोबतच सणासुदीचे विशेष पदार्थही सहज आनंदाने आणि प्रमाणात खाता येतात.

■ **सणांच्या दिवशी जेवणाचं नियोजन कसं करावं? –** दुपारच्या किंवा रात्रीच्या जेवणाआधी उपाशी राहू नका. संध्याकाळी पार्टी किंवा सणाचा बेत आहे म्हणून दिवसभर उपाशी राहून काहीच न खाणं ही सगळ्यात मोठी चूक आहे. यामुळे तुमची रक्तातील साखर कमी होते, त्यामुळे तुमची चिडचिड होते आणि संध्याकाळी तुम्ही गरजेपेक्षा तिप्पट जास्त खाता. दिवसभर नेहमीप्रमाणे प्रथिनं आणि भाज्या असलेला आहार घ्या, जेणेकरून संध्याकाळी अति खाणं होणार नाही. प्रमाणात खाल्लं जाईल आणि त्याचा आनंदही घेता येईल!

■ **विचारपूर्वक खा :** तुम्हाला आवडणारा गोड पदार्थ किंवा फराळ ताटात घेऊन तो घाईघाईत खाण्याऐवजी सावकाश आस्वाद घेत खा. जेव्हा आपण समाधानाने खाता, तेव्हा कमी असलं तरी मन भरतं. सणासुदीच्या काळात आणखी एक गोष्ट घडते. आपल्याला एका आठवड्यात अनेक आमंत्रणं असतात. अशा वेळी प्रत्येक ठिकाणी पूर्ण जेवण करणं आवश्यक नसतं. एखाद्या ठिकाणी फक्त दर्शन, गप्पा आणि थोडासा प्रसाद पुरेसा असतो. प्रत्येक कार्यक्रमात सर्व पदार्थ चाखण्यापेक्षा आवडीचे एक-दोन पदार्थ निवडणं अधिक शहाणपणाचं ठरतं. त्याचप्रमाणे, कार्यक्रमाला जाण्यापूर्वी घरी एखादा प्रथिनयुक्त पदार्थ खाल्ला, जसे दही, पनीर, मूग किंवा उसळ, तर तिथे पोहोचल्यावर अतिभूक लागत नाही. त्यामुळे जेवणाचा वेग कमी राहतो आणि प्रमाणावर नियंत्रण ठेवणं सोपं जातं. एक महत्त्वाची गोष्ट. पंगतीत जेवायला बसल्यावर ''अजून एक पुरणपोळी घ्या हो!'' असा आग्रहाचा शब्द आला नाही तर जेवण पूर्णच वाटत नाही, बरोबर ना? हा आग्रह म्हणजेच आपल्या संस्कृतीतील प्रेम आणि अतिथ्यशीलतेची खरी ओळख आहे. पण या गोड आग्रहाबरोबरच एक छोटीशी गोष्ट लक्षात ठेवूया. अन्नाचा आदर करणं जितकं गरजेचं आहे, तितकंच पोट भरल्यावर शरीराचे संकेत ओळखणंही महत्त्वाचे आहे. अति-आग्रहामुळे होणारा त्रास टाळण्यासाठी, खाऊन तृप्त झाल्यावर थांबणं हीसुद्धा आरोग्यासाठी एक सुंदर सवय आहे.

■ **उपवासाचे विज्ञान समजून घेऊया :** निर्जलीकरण आणि 'बिंजिंग'चा धोका - श्रावण, नवरात्र किंवा उपवासाच्या काळात 'फराळ' म्हणून आपण काय खातो? फराळी चिवडा, साबुदाणा वडा, बटाट्याचे वेफर्स आणि शेंगदाण्याचा कूट! यामध्ये अतिप्रक्रिया केलेली कर्बोदकं आणि सोडियमचं प्रमाण अफाट असतं. दिवसभर उपाशी राहून संध्याकाळी असा फराळ खाल्ल्यानं शरीरात पाण्याची कमतरता होते आणि इन्सुलिनचा स्तर बिघडतो. उपवासाच्या दिवशी भरपूर पाणी, लिंबू पाणी, ताक प्या आणि फराळात मखाणे, शिंगाड्याचे पीठ, वरईचा तांदूळ किंवा फळांचा समावेश करून एक सुखद उपवास तुमच्या शरीरासाठी ठेऊ शकता.

■ **सण संपल्यावर काय करायचं?** – 'आज बेसन लाडू जरा जास्तच खाल्ले, मग उद्या १ तास जास्त धावेन किंवा उपाशी राहीन,' अशा कोणत्याही 'डिटॉक्स' किंवा कुठल्याही भरपाई करायच्या जाळ्यात अडकू नका. सण संपल्यावर लगेच ३ दिवस फक्त ज्यूस पिणं, फक्त सूप पिणं किंवा 'जिम'मध्ये जाऊन ४ तास घाम गाळणं, याने शरीर 'डिटॉक्स' होत नाही, तर आपलीच पचनशक्ती मंदावते. यकृत आणि मूत्रपिंड नैसर्गिकरीत्या डिटॉक्स सतत करतात. तुम्ही फक्त तुमच्या दिनचर्येवर आणि नेहमीच्या जेवणावर परत या. जर तुम्ही जास्त तेलकट किंवा गोड खाल्लं, तर दुसऱ्या दिवशी तुम्हाला सुस्त वाटू शकतं. अशा वेळी दिवसभर भरपूर पाणी प्या, आहारात भाज्या वाढवा आणि जेवण झाल्यावर १५-२० मिनिटं चाला.

■ **शुगर फ्रीचे फॅड** – 'शुगर-फ्री' मिठाई किंवा 'बेक्ड' (भाजलेल्या) नमकीन चिवड्यात उत्पादक मोठ्या प्रमाणात मेद (फॅट्स) घालतात. त्यापेक्षा घरातल्या तुपातला एक लहान लाडू किंवा मोदक खाणं शरीरासाठी कधीही जास्त उत्तम आणि समाधानकारक असतं.

शेवटी एकच सांगते. आयुष्य जगण्यासाठी असतं त्यात सण साजरे करणं येतंच. पुढच्या वर्षीच्या '१ जानेवारी' ची किंवा सण संपण्याची वाट बघत बसू नका. निरोगी राहण्यासाठी सण-उत्सवात मनाविरुद्ध उपाशी राहायची गरज तर अजिबातच नाही.

आहारातला समतोल म्हणजे शिक्षा नव्हे, तर तो स्वतःच्या शरीरावर केलेला प्रेमाचा वर्षाव आहे. त्यामुळे, या सणासुदीच्या दिवसांतही स्वतःच्या आरोग्याची काळजी घेत कोणताही न्यूनगंड न बाळगता सणांचा पूर्ण आनंदाने आस्वाद घ्या! वाट बघत बसण्यापेक्षा, आजपासून आणि आत्तापासूनच आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यायला सुरुवात करूया.

सण नक्की साजरे करा, पण यावेळी सणांसोबतच तुमच्या शरीरालाही साजरं करा!

◆ amita@amitagadre.com

# खेळाडूंमागची शक्ती




## क्रीडा संस्कृ'ती'

■ डॉ. नीता ताटके



**क्रीडा क्षेत्रात दीर्घ काळ टिकून राहायचं असेल तर संयम, सातत्य महत्त्वाचं असतंच, पण यासोबतच गरजेचं असतं, मानसिक स्वास्थ्य उत्तम असणं. खेळाडूंच्या भावना, मानसिक आरोग्य समजून त्यांना अत्युच्च कामगिरीसाठी तयार करण्यात क्रीडामानसतज्ज्ञांचं योगदान मोठं असूनही आपण भारतीय क्रीडा क्षेत्रात क्रीडामानसतज्ज्ञांच्या कामाला किती महत्त्व देतो? याविषयी सांगणारा लेख.**

'पी. व्ही. सिंधूने मोडला अपयशांचा दुष्काळ! जपान खुली बॅडमिंटन स्पर्धा जिंकणारी पहिली भारतीय महिला', 'मीराबाईने इतिहास घडवला! राष्ट्रकुल स्पर्धेमध्ये सुवर्णपदकाची हॅटट्रिक साधणारी पहिली भारतीय स्त्री', 'राष्ट्रकुल मुष्टीयुद्ध स्पर्धेमध्ये भारताचे महिलाराज! पाच सुवर्ण व एक रौप्य अशी दमदार कामगिरी'!

गेल्या दोन महिन्यांतल्या या बातम्या वाचून काय मस्त वाटलं ना! या खेळाडूंच्या पदकप्रदान समारंभात भारताचा झेंडा वर जाताना आपण टीव्ही-दूरचित्रवाणीवर, समाजमाध्यमांवर बघितल्यावर आपल्याही अंगावर रोमांच उभे राहिले! खरं ना? या पदकविजेत्या कामगिरीमागे या खेळाडूंची अनेक वर्षांची कठोर तपश्चर्या, त्यांच्या प्रशिक्षकांची मेहेनत, त्यांच्या प्रशिक्षणासाठी ओतला गेलेला प्रचंड पैसा, फिजिओथेरपीस्ट', आहारतज्ज्ञ, तंदुरुस्ती प्रशिक्षक अशा तज्ज्ञांची फौज या सगळ्याचेच योगदान आहे. मात्र या स्त्रिया जरी खेळाडू असल्या तरी त्या प्रथम 'माणूस' आहेत, त्यांना भावभावना आहेत, त्यांनाही रोज सकाळी पाच वाजता उठून दहा किलोमीटर धावायला जायचा, व्यायाम करायचा कधी कधी कंटाळा येतो, यश-अपयशाची भीती वाटते, ताण-तणावांचा कोंडमारा सहन करायला लागतो, अगदी आइस्क्रीम, जिलबी असं गोड काही खाण्याचा मोहही होतो. अशा अनेक मनस्थितीतून जाणाऱ्या या स्त्रियांच्या मागे त्यांना प्रोत्साहित करणारी, मनापासून समजून घेणारी, त्यांचा आत्मविश्वास, भीती अशा सकारात्मक तसेच नकारात्मक विचारांवर काम करणारी एक 'शक्ती' उभी असते.

मीराबाई चानू. नोंगपोक काकचिंग या मणिपूरच्या छोट्याशा गावातली ही मुलगी वयाच्या चौथ्या-पाचव्या वर्षीही जड पाण्याचे हंडे सहज उचलून मैलोगणती चालत असे. लहानखुरी चण, पण प्रचंड ताकद असलेल्या मीराबाईने वयाच्या १२ व्या वर्षी स्पर्धेसाठी वजन उचलण्याचे प्रशिक्षण घ्यायला सुरुवात केली आणि अगदी वयाच्या १६-१७ व्या वर्षी राष्ट्रीय पदक पटकावलं. २०१४ मध्ये स्कॉटलंडच्या राष्ट्रकुल स्पर्धेमध्ये रौप्यपदकाची कमाई केली. मात्र २०१६ च्या 'रियो ऑलिम्पिक'मध्ये पदक जिंकण्याची अपेक्षा असलेल्या मीराबाईने साफ निराशा केली. तिच्या 'क्लीन अँड जर्क' स्पर्धेमध्ये तिला एकदाही वैध पद्धतीने वचन उचलता आले नाही आणि 'डिड नॉट फिनिश' असा अपयशाचा शिक्का बसून ती स्पर्धेतून बाद झाली. सतत आठ-नऊ वर्षं केलेली मेहनत अशा प्रकारे काही मिनिटांत पाण्यात गेलेली बघून, प्रचंड अपराधी जाणिवेने मीराबाई पूर्णपणे खचली. निराशेच्या गर्तेत गेली आणि ''आता बस्स... पुरे!'' म्हणत खेळ सोडण्याच्या निर्णयापर्यंत पोहोचली. मीराबाईला परत खेळाकडे वळविण्यामध्ये ''खेळात यश-अपयश असतंच, झालं ते गेलं, आता पुढचं बघ' असं म्हणून भक्कम आधार देणारी आई, ''तुला नक्की जमेल'' हा विश्वास देणारे तिचे प्रशिक्षक, यांच्याबरोबरच एक तिसरी 'शक्ती'ही मीराबाईच्या मागे उभी राहिली होती.

पी. व्ही. सिंधूने जपानच्या अकाने यामागुचीचा २१-१७, २१-१७ असा तिच्याच मायभूमीवर सरळ पराभव



करून परदेशात खेळलेल्या स्पर्धांमध्ये चार वर्षांनंतर विजेतेपद पटकावले. या आधी तिने २०२४ मध्ये भारतात आंतरराष्ट्रीय स्पर्धा जिंकण्याची कामगिरी केली होती. अनेक वेळा स्पर्धांच्या उपांत्य व अंतिम फेरीत गेलेल्या सिंधूला सातत्याने विजेतेपदाने हुलकावणी दिल्याने ती त्रस्त झाली होती. आपल्या कामगिरीविषयी चर्चा करायला तिने थेट 'किंग कोहली'ऊर्फ विराट कोहलीची सुद्धा भेट घेतली होती. जपानच्या विजयानंतर दिलेल्या एका मुलाखतीत सिंधूने ''मी नियमित सराव तर करत होतेच, मात्र गेली काही वर्षं आत्मसन्मान व आत्मविश्वास जपण्याचा कसोशीने प्रयत्न करत होते'' हे मोकळेपणे मान्य केले. हा आत्मविश्वास, आत्मसन्मान जपण्यासाठी मदत करणारी एक 'शक्ती' तिच्याही मागे उभी होती.

ही 'शक्ती' कोणती? ती आहे क्रीडामानसतज्ज्ञांची. निराशेच्या गर्तेतून पद्धतशीरपणे खेळाडूंना बाहेर काढणं, राग, द्वेष, चीड, हताशा, तसेच आनंद, समाधान या संमिश्र भावना हाताळणं, मनाला आधार देणं, उभारणं, याबरोबरच खेळाडूंच्या व्यक्तिमत्त्वानुसार विविध मानसतंत्रांच्या पद्धतशीर वापराने खेळाडूंची कामगिरी सर्वोत्तम होईल, त्यासाठी कसोशीने प्रयत्न करणारी, प्रामुख्याने स्त्री क्रीडामानसतज्ज्ञ असणारी फौज ज्यांचा चेहरा लोकांसमोर येत नाही, ज्यांची नावं समाजाला माहिती नसतात, मात्र खेळाडूंच्या मानसिक स्वास्थ्यासाठी सातत्याने कार्यरत राहणाऱ्या या फौजेचा भारताच्या क्रीडा यशात मोलाचं योगदान आहे.

आपल्या 'शिवछत्रपती पुरस्कार' विजेत्या खेळाच्या कारकीर्दीनंतर अवनीला (नाव बदलले आहे) क्रीडामानसतज्ज्ञ म्हणून भारताच्या राष्ट्रीय शिबिरात भारतीय स्त्री कुस्तीपटूंबरोबर काम करण्याची मोठी संधी मिळाली. प्रामुख्याने दिल्ली-हरियाणाच्या खेळाडूंचा भरणा असलेल्या या स्त्री खेळाडूंशी संवाद साधताना हरियाणवी लहेजा असलेली त्यांची भाषा आणि आपली मुंबईची हिंदी यांच्यात नेहमीच पेच निर्माण होई, पण त्यापेक्षाही त्या खेळाडू, त्यांचे प्रशिक्षक, पालक या सर्वांचाच 'हमे तो खेलना हैं, इसमे दिमाग का क्या काम है?' हा दृष्टिकोन बदलायला सुमारे एका वर्षाचा कालावधी गेला. क्रीडामानसशास्त्राकडे बघण्याचा भारतीय खेळाडूंचा दृष्टिकोन अजून खूप प्रगल्भ व्हायला हवा हे 'पॅरिस ऑलिम्पिक'च्या अनुभवावरून जाणवलं. ऑलिम्पिक आयोजकांनी खेळाडू राहतात त्या 'ऑलिम्पिक व्हीलेज'मध्ये अनेक सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. ऑलिम्पिकच्या इतिहासात बहुधा पहिल्यांदाच 'माइंड रूम'ची स्थापना करण्यात आली होती. तिथे ध्यानधारणा (Meditation), पूर्ण विश्रांती (Relaxation), कल्पनाचित्रण (Visualization) या मानसिक पद्धती, ज्याचा क्रीडामानसतज्ज्ञ खूप मोठ्या प्रमाणात वापर करतात, त्यासाठी खास सोय करण्यात आली होती.

परदेशी खेळाडू सातत्याने या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणावर दिसत होते, तिथे भारतीय खेळाडूंचा वावर तसा बराच कमी होता. या सुविधेची उपयुक्तता जाणवणं, ती मनात भिनणं आणि नियमित शारीरिक व्यायामासारखाच त्याचा सातत्याने वापर करणं यासाठी आपल्याला बरीच मजल मारायची आहे.

आज कौतुकाची बाब म्हणजे अनेक पुरुष संघाच्या क्रीडामानसतज्ज्ञही स्त्रियाच आहेत, या स्त्रियांचे अनुभव या क्षेत्रातील आव्हाने जाणवून देतात. पुरुषांच्या संघाबरोबर काम करणाऱ्या एक स्त्री क्रीडामानसतज्ज्ञाला ''आमचा जोश, जिगर, राग, द्वेष, पौरुषत्व तुम्हाला काय कळणार?'' असा थेट प्रश्नच पहिल्या भेटीत विचारण्यात आला. तीसुद्धा त्यांना पुरून उरली आणि या संघाने तिला सहकार्य करायला सुरुवात केली. संघाच्या कामगिरीतही फरक पडायला लागला आणि कालांतराने त्यांच्या देहबोलीतून तिच्याबद्दल आदर व्यक्त व्हायला सुरुवात झाली. असाच एक वेगळा अनुभव सेनादलांच्या खेळाडूंबरोबर आल्याचा एका स्त्री क्रीडामानसतज्ज्ञांनी सांगितलं. सेनादलाच्या सामाजिक शिष्टाचार पद्धतीनुसार अगदी पहिल्या सत्रापासून सर्व खेळाडू तिच्याशी अत्यंत आदबीने वागत होते, तिने वापरलेल्या वेगवेगळ्या मानसतंत्रांनाही सहकार्य करत होते, पण कुठेतरी काहीतरी कमी पडत आहे, आपण आणि त्यांच्यामध्ये एक अदृश्य भिंत उभी आहे हे तिला सतत जाणवत होतं. ताणतणाव, अपयश, नकारात्मकता हे विषय तर हसण्यावारीच नेले जात होते. एका सत्रामध्ये एकजण नकळतपणे बोलून गेला ''औरतों के सामने हम रोते नहीं हैं'' त्याक्षणी तिला या खेळाडूंची नस सापडली आणि खऱ्या अर्थाने तिने या खेळाडूंबरोबर यशस्वी कामगिरी पार पाडली.

सिडनीला स्थायिक झालेली 'मानस सल्लागार' म्हणून कार्यरत असलेली पुण्याची राष्ट्रीय खो-खोपटू वर्षा साठे-टेंबे हिचा अनुभव मात्र बरोबर याविरुद्ध आहे. मानसिक घटकांवर काम करण्याची आवश्यकता असते याचे समाजभान त्या देशात आहे, अशी मदत घेणाऱ्या व्यक्तींकडे बघण्याचा दृष्टिकोनही नकारात्मक नसतो. राज्य, राष्ट्र व आंतरराष्ट्रीय पातळीवरचे खेळाडू तर सोडूनच द्या, अगदी एका 'क्लब' पातळीवरच्या स्पर्धेमध्ये चांगली कामगिरी करण्याची इच्छा असलेल्या खेळाडू स्त्रीला 'मानसिक प्रशिक्षण' घेण्यासाठी तिचा नवरा वर्षाकडे घेऊन आल्याचा अनुभव तिने सांगितल्यावर आश्चर्यचकित व्हायला होतं.

आपला डॉक्टरांवर विश्वास असतो, औषधांमुळे आपण बरे होऊ ही खात्री असते, त्यामुळे त्यांच्याकडे जाण्याची लाज वाटत नाही. क्रीडा क्षेत्रात कार्यरत असलेले 'फिजिओथेरपीस्ट', आहारतज्ज्ञ, खेळाडूंच्या शारीरिक क्षमता, ताकद, तंदुरुस्ती, लवचीकता यावर काम करणारे 'स्ट्रेंथ अँड कंडिशनिंग' प्रशिक्षक यांनाही सहज स्वीकृती आहे, मात्र चिंता, हताशा याबरोबरच आत्मविश्वास, सकारात्मकता, यश-अपयश आणि प्रत्यक्ष खेळताना कोणत्याही पायऱ्यांवर न रेंगाळता 'या क्षणी काय करायला पाहिजे' याचं भान ठेवून खेळण्याची क्षमता वाढवणे अशा विविध घटकांवर काम करणाऱ्या क्रीडामानसतज्ज्ञांना ही स्वीकृती मात्र सहज लाभत नाही. मानसिक प्रशिक्षण शिकण्यासाठी खेळाडू आणि क्रीडामानसतज्ज्ञ या दोघांमध्ये परस्पर विश्वास, सामंजस्य आणि सलोख्याचे नातं निर्माण करण्याची प्रक्रिया ही पहिली पायरी असते. खेळाडूंबरोबरच, खेळाडूंचा प्रशिक्षक व पालक यांच्याबरोबरही हा संबंध प्रस्थापित व्हायला लागतो, या सर्वांशी सहकार्य साधण्यातच आठ-दहा महिने सहज निघून जातात. 'आम्हाला याची काय गरज आहे?' या प्रश्नापासून 'खरंच फायदा होतोय' हे समजेपर्यंत खूप महत्त्वाचा आणि मोठा कालावधी फुकट जातो. खेळाडू व पालक यांच्यासाठी प्रशिक्षकांचा शब्द अंतिम असतो, ''हे प्रशिक्षक इतर कुठल्याही मदतीला सहज होकार देतात, पण क्रीडामानसतज्ज्ञ म्हटला की, त्यांना असुरक्षित का वाटते हेच समजत नाही'' अशी प्रतिक्रिया बहुसंख्य क्रीडामानसतज्ज्ञांची होती. हे प्रशिक्षक विरोधही सरळ सरळ करत नाहीत. खेळाडूंबाबत मनमोकळेपणाने माहिती न देणे, खेळाडूंशी सुरुवातीचा संवाद सोपा करण्यास मदत न करणे, खेळाडूंच्या भेटीची वेळ ठरली की त्याच वेळेला खेळाडूंना दुसरे काही काम देणे अशा विविध प्रकारे हे असहकार्य दिसून येतात. 'दे आर हार्ड नट टू क्रॅक' असा अतिशय समर्पक शब्दप्रयोग एकीने केला. म्हणूनच क्रीडामानसतज्ज्ञांकडेही प्रचंड संयम आणि स्वतःचा आत्मसन्मान राखण्याकडे कल असावा लागतो.

खेळ खेळणाऱ्या बहुसंख्य स्त्रिया स्पर्धात्मक खेळाकडे वळत नाहीत, मात्र खेळाच्या सहभागाचे त्यांना अनेक शारीरिक व मानसिक फायदे आहेत. क्रीडामानसतज्ज्ञांचे या क्षेत्रातही चांगले योगदान आहे.

स्त्रियांचा संघ उभारण्यातील आव्हानं, स्त्री क्रीडापटूंवर झालेले अत्यल्प संशोधन, स्त्रियांसाठी क्रीडा धोरण या काही बाबींबद्दल आपण पाहूया पुढील लेखात...!

◆ tatkeneeta6@gmail.com

## तुम्हाला आलाय अनुभव जीवघेण्या टोमण्यांचा?

'कुणी यावे टपली मारून जावे', इतक्या सहजपणे एखाद्या व्यक्तीची तिच्या शारीरिक गुणदोषांवरून टिंगलटवाळी केली जाते. थोडक्यात, तिचं 'बॉडीशेमिंग' केलं जातं. जोपर्यंत ते सौम्य शब्दांतलं असतं तोपर्यंत ठीक परंतु जेव्हा ते सततच्या टोमण्यात बदलतं, कुणाचं तरी मानसिक खच्चीकरण करतं तेव्हा मात्र त्याचे गंभीर परिणाम होतात. माणूस आत्मविश्वास हरवून बसतो, लोकांमध्ये वावरण्याला घाबरतो. अनेकांचं तर आयुष्यच थांबून जातं. तो न्यूनगंडाच्या कोशात तरी अडकतो किंवा आत्महत्या तरी करतो. इतकं हे चिडवणं जीवघेणं ठरू शकतं. तुम्हाला आहे का असा अनुभव ? टिंगलटवाळीचा, टोमणे मारण्याचा ? 'बॉडीशेमिंग' चा ? काय मनःस्थिती होती तुमची आणि काय केलं त्यातून बाहेर पडण्यासाठी ? २०० शब्दांत आम्हाला पाठवा chaturang.loksatta@gmail.com या इमेल वर. सब्जेक्टमध्ये 'माझं शरीर, माझा निर्णय' अवश्य लिहा. दीर्घ प्रतिसादांना 'चतुरंग'मध्ये प्रसिद्धी दिली जाणार नाही, तेव्हा मोजकंच लिहा.

# कोयता नको, लेखणी हवी

पान १ वरून / मुले आत्मविश्वासाने शिकत आहेत आणि शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होताना दिसत आहेत.

यात मोठी सामाजिक अडचण होती ती मुलींच्या सुरक्षेची. ऊसतोड कामगार आपल्या १२-१३ वर्षांच्या मुलींना एकतर सोबत ऊसतोडीला घेऊन जातात किंवा त्यांचे बालविवाह लावून देतात. मात्र, डॉ. कविता यांनी शाळेत मुलींना सुरक्षित निवासाची हमी दिली. परिणामी, पालक आपल्या मुलींना विश्वासाने शाळेत पाठवू लागले. आज याच शाळेत २५० मुली बारावीपर्यंतचे शिक्षण घेत आहेत. आत्तापर्यंत हजारो मुलींनी आपले शिक्षण पूर्ण केले असून नव्या भविष्याकडे त्यांची वाटचाल सुरू आहे.

डॉ. कविता गित्ते यांनी केवळ मुले साक्षर करण्यावर भर दिलेला नाही, तर ऊसतोड कामगारांच्या मुलांना स्वावलंबी बनवण्यासाठी शासनाच्या शिक्षण योजनेचा फायदा घेत कौशल्याधिष्ठित शिक्षण (वेल्डिंग, प्लंबिंग, शिवणकाम, हस्तकला, पाककला) आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) प्रयोगशाळांच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली. याचा सकारात्मक परिणाम म्हणजे कालपर्यंत ऊसाच्या मोळीखाली दबलेल्या या मुलांनी आज राज्य व राष्ट्रीय स्तरावर सॉफ्टबॉल आणि बेसबॉलमध्ये २१० हून अधिक पदके मिळवली आहेत.

डॉ. कविता यांनी त्यांचे काम केवळ शिक्षणापुरते मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांच्या आहाराकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले. त्यासाठी 'माझी परसबाग' उपक्रमातून सांडपाणी फिल्टर करून तयार केलेल्या सेंद्रिय पालेभाज्यांचा वापर थेट विद्यार्थ्यांच्या पोषण आहारासाठी केला जातो. गित्ते यांच्या या उत्कृष्ट कार्याची दखल घेत 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियानात सलग दोन वर्षे 'साने गुरुजी निवासी विद्यालया'ने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला असून 'ए' श्रेणी मिळवली आहे. त्याचबरोबर जळगावच्या 'गांधी रिसर्च फाउंडेशन'च्या वतीने 'स्वच्छ शाळा सुंदर शाळा' हा उपक्रम राबवला जातो. यंदा देखील हा पुरस्कार याच शाळेला सलग तिसऱ्यांदा प्राप्त झाला आहे.

''आताचा काळ हा जेन झी व जेन अल्फा यांचाच आहे. त्यामुळे सध्या शिकवल्या जाणाऱ्या पारंपरिक शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल करणे आता गरजेचे झाले आहे. म्हणूनच आता शिकवण्याची जुनी पद्धत बंद करून वर्गात प्रश्न देऊन विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन अध्ययन, गटचर्चा आणि मित्रांच्या सहाय्याने अध्ययन यांसारखे उपक्रम राबवणे गरजेचे आहे. मुलांना ज्या भाषेत समजते त्याच भाषेत व विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता ओळखून त्यांना शिक्षण देणे गरजेचे आहे अशा मुलांना स्वतः शिकू द्या आणि हे मुलं जिथे थांबतील तिथे त्यांना मार्गदर्शक आणि सुलभकाची भूमिका बजावा. प्रत्येक विद्यार्थ्यांची विचार क्षमता वेगळी असते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रत्येक उत्तराचा आदर करणे हीच खरी शिकवण्याची पद्धत आता स्वीकारावी लागणार आहे. जेणेकरून मुलं उत्तरासाठी पुस्तकाकडे नाही तर स्वतःच्या कल्पकतेकडेही लक्ष देतील. आता मुलांना केवळ घडवायचे नाही तर मुलं घडत असताना त्यांना साथ देण्याचे काम शिक्षकांनी व पालकांनी केले पाहिजे,'' अशी भावना एक शिक्षक म्हणून प्रा. डॉ. कविता व्यक्त करतात.

त्या सांगतात, '' हल्ली आई-वडिलांचा मुलांशी संवाद झपाट्याने कमी होत आहे. हा संवाद कमी होणे मोठी चिंतेची बाब बनली आहे. संवादातून मार्ग निघत असतो आणि मुलांच्या अडचणी जाणून घेतल्याशिवाय त्यातून मार्ग निघू शकत नाही. त्यामुळे आई वडील, आजी आजोबा, यांचा घरातील मुलांबरोबर संवाद अबाधित राहणे अत्यंत गरजेचे आहे. डिजिटल तंत्रज्ञान मुलांसाठीचे भविष्य आहे त्यामुळे मुलं डिजिटल साधनांसोबत खेळत असतील तर त्यांना खेळू द्या फक्त ते काय खेळत आहेत याकडे पालकांचे लक्ष असले पाहिजे.''

प्रा.डॉ.कविता गित्ते यांच्याबद्दल भावना व्यक्त करताना त्यांचे माजी विद्यार्थी देखील भावनिक होतात. गित्ते यांचा माजी विद्यार्थी व सध्या नाशिक येथे पोलीस उपनिरीक्षक पदावर कार्यरत असलेले बिबीशन सांगळे सांगतात की, ''गित्ते मॅडम यांनी आम्हाला त्यांच्या मुलाप्रमाणे जपले. मी दोन वर्ष त्यांच्या शाळेत शिक्षण घेतलेले आहे. सुरुवातीचा काळ असल्याने पत्राच्या खोल्यांमध्ये आमची राहण्याची व्यवस्था होती. शेजारीच गित्ते मॅडम यांचे शेत असल्याने त्या शेतातून रोज भाज्या तोडून आणायच्या आणि आम्ही त्या खायच्या हा आमचा नित्यक्रम. माझ्या शैक्षणिक वर्षात मला व माझ्यासारख्या विद्यार्थ्यांना मॅडमनी पोटच्या मुलासारखे सांभाळले. आमच्या आयुष्याचा महत्त्वाचा टप्पा मॅडमच्या दूरदृष्टीमुळे यशस्वी झाला आहे. माझ्यासोबतचे अनेक विद्यार्थी आज एम.बी.बी.एस., भारतीय सैन्य दलात, पोलीस सेवेत कार्यरत आहेत. 'महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बल' (एसआरपीएफ) मधील जवान अशोक उकंडे म्हणतात की, ''आमचे पालक आम्हाला सहा-सात महिन्यांसाठी शाळेमध्ये सोडून जायचे. त्यामुळे गित्ते ताईंची प्रेमाची सावली आम्हाला जास्त लाभली. दहा वर्षांचा माझा शैक्षणिक पाया याच विद्यालयात मजबूत झाला,''

◆ akshaykende73@gmail.com

लघुकथा

■ चारुशीला बिडवे

# आयुष्याचा कोरा कॅनव्हास



शहराच्या एका जुन्या वसाहतीत मृणालचं छोटंसं घर होतं. घर छोटं असलं तरी भिंतींवर मात्र मोठमोठी स्वप्नं टेकून उभी होती. मृणालला लहानपणापासून चित्र काढण्याची विलक्षण आवड. वहीच्या शेवटच्या पानावर, वर्तमानपत्राच्या मोकळ्या जागेत, जुन्या पाकिटांच्या मागे जिथे जागा मिळेल तिथे तिची पेन्सिल रंगांची दुनिया उभी करायची. पण लग्न झालं आणि तिच्या हातातली पेन्सिल हळूहळू कपाटाच्या एका कोपऱ्यात जाऊन पडली.

''चित्रं काढून काय मिळणार?'' नवरा अमोल नेहमी म्हणायचा.

मृणाल हसायची. ''काही नाही... मनाला आनंद मिळतो.''

''आनंदाने घर चालत नाही.'' त्या एका वाक्याने तिच्या मनातली अनेक दारं बंद होत गेली.

दिवस घरकामात, मुलांच्या अभ्यासात आणि जबाबदाऱ्यांमध्ये सरत गेले. कधी कधी रात्री सगळे झोपल्यावर ती कपाट उघडायची. जुन्या वहीतली आपली चित्रं पाहायची आणि अलगद वही बंद करायची.

एकदा तिच्या मुलीने सईने ते पाहिलं. ''आई, तू एवढी सुंदर चित्रं काढतेस?'' मृणाल दचकली.

''अगं... ती खूप जुनी आहेत.''

''मग आता का नाही काढत?'' मृणाल काहीच बोलली नाही. सईने पुन्हा विचारलं,

''आई, तुझ्यातली चित्रं काढणारी मृणाल कुठे गेली?'' हा प्रश्न साधा होता; पण तो तिच्या मनाच्या अगदी खोलवर जाऊन भिडला.

त्या रात्री मृणालला झोप आली नाही. खिडकीतून येणाऱ्या चंद्रप्रकाशात तिने कपाटातून ती जुनी वही बाहेर काढली. पहिल्या पानावर तिचीच अक्षरं होती. ''मला एक दिवस माझ्या नावाने ओळखलं जावं.''

ती ओळ वाचताना तिच्या डोळ्यांत पाणी आलं. ''मी स्वतःला कुठे हरवून बसलये?'' तिने स्वतःलाच विचारलं.

दुसऱ्या दिवशी सकाळी घरातली कामं उरकून तिने पुन्हा पेन्सिल हातात घेतली. पहिलं चित्र काढताना हात थरथरत होता. रेषा चुकली. तिने कागद फाडला. दुसऱ्या दिवशी पुन्हा प्रयत्न केला. पुन्हा चूक. तिसऱ्या दिवशी मात्र तिच्या हाताला जुनाच आत्मविश्वास मिळू लागला. सई तिच्या बाजूला बसून म्हणाली, ''आई, ही तू आहेस... जी मला आधी कधी दिसलीच नव्हती.'' मृणाल हसली.

''कदाचित मलाही नाही.''

काही दिवसांनी सईनं तिच्या आईचं एक चित्र मोबाइल फोनवर काढून समाजमाध्यमावर टाकलं.

चित्र साधं होतं. पावसात छत्री घेऊन चालणारी एक स्त्री. त्या स्त्रीच्या चेहऱ्यावर थकवा नव्हता; तिच्या डोळ्यांत पुढे जाण्याची जिद्द होती. चित्राला अनपेक्षितपणे खूप प्रतिसाद मिळाला. मग अनेक चित्रे समाज माध्यमांवर झळकत राहिली. काही दिवसांनंतर एका स्थानिक कला संस्थेने तिच्याशी संपर्क साधला.

''आम्हाला तुमची चित्रं आमच्या प्रदर्शनात ठेवायला आवडतील.''

मृणाल काही क्षण गप्प राहिली. ''पण... माझं काही यात व्यावसायिक प्रशिक्षण नाही.''

समोरून उत्तर आलं, ''कलेला नेहमी प्रमाणपत्राची गरज नसते. कधी कधी फक्त मनाची सही पुरेशी असते.''

मृणालने होकार दिला.

प्रदर्शनाचा दिवस जवळ आला. घरात मात्र वातावरण वेगळंच होतं. अमोलने चित्रांकडे पाहिलं.

''यासाठी एवढा वेळ घालवतेस? लोक हसतील.''

मृणाल शांतपणे म्हणाली, ''पूर्वी लोक काय म्हणतील म्हणून मी थांबले. आता मी काय म्हणतेय तेवढंच मी ऐकणार आहे.'' अमोल तिच्याकडे पाहतच राहिला. हा ठाम आवाज त्याने पहिल्यांदाच ऐकला होता.

प्रदर्शनाच्या दिवशी मृणालची सर्व नवी-जुनी चित्रं लावली गेली. एका चित्रासमोर एक वृद्ध स्त्री बराच वेळ उभी होती. चित्रात एक आई आपल्या मुलाच्या हातात पतंगाची दोरी देत होती.

तिने मृणालला विचारलं, ''हे चित्र कुणाचं?''

''माझं.''

''खूप काही सांगतंय.'' मृणाल हसली. ''कदाचित माझीच गोष्ट आहे.''

त्या दिवशी तिची तीन चित्रं विकली गेली. रक्कम मोठी नव्हती. पण तिच्यासाठी ती रक्कम नव्हतीच. तो तिच्या हरवलेल्या ओळखीचा पहिला मोबदला होता. घरी परतल्यावर तिने ती रक्कम कपाटात ठेवली नाही. तिने एक नवीन वही घेतली. पहिल्या पानावर लिहिलं, ''चित्रकार - मृणाल.'' सईनं ते वाचलं आणि आईला मिठी मारली.

''आई, आज तू स्वतःची स्वाक्षरी केलीस.''

मृणालच्या डोळ्यांत अश्रू होते.

''हो गं... इतकी वर्षं मी सगळ्यांच्या आयुष्यात रंग भरत राहिले. पण माझ्या आयुष्याचा कॅनव्हास मात्र कोराच राहिला होता.''

ती थांबली. ''आता तो कोरा राहणार नाही.''

काही महिन्यांनी मृणालने घराजवळच्या मुलांसाठी चित्रकलेचा छोटा वर्ग सुरू केला. पहिल्या दिवशी फक्त दोन मुलं आली. दुसऱ्या महिन्यात दहा. आणि वर्षभरात तिच्या छोट्याशा वर्गात तीस मुलं चित्रं काढू लागली. एक दिवस अमोल त्या वर्गाबाहेर उभा होता. त्याने आत पाहिलं.

मृणाल मुलांना सांगत होती, ''रेषा चुकली म्हणून चित्र फेकून द्यायचं नसतं. कधी कधी चुकीच्या रेषेतूनच सुंदर चित्र तयार होतं.'' अमोलच्या चेहऱ्यावर हलकंसं स्मित आलं. मृणालने त्याला पाहिलं. दोघांच्या नजरा भेटल्या. यावेळी तिच्या नजरेत परवानगी मागणारी स्त्री नव्हती. स्वतःची ओळख शोधून काढलेली एक व्यक्ती होती...

त्या रात्री मृणालने आपल्या वहीत एक ओळ लिहिली, ''माझ्यातली ती कधीच हरवली नव्हती; फक्त इतरांच्या आवाजाखाली तिचा आवाज दडून गेला होता. ती निश्चल झाली होती... पण ती संपली नव्हती. आज पुन्हा तिला नव्यानं ऐकलं, आणि कळलं स्वतःला शोधण्यासाठी जग बदलण्याची गरज नसते; कधी कधी फक्त स्वतःकडे परतण्याची गरज असते.''

◆ charusheelabidwe@gmail.com










